# माणूस

शनिवार । २३ सप्टेंबर १९७८
७५ पैसे

**प्रत्यक्ष संबंधित व्यक्तींना भेटून मिळविलेल्या माहितीवर आधारित कादंबरी**

## जौळ

□ □

## जौळ

**रत्नाकर मतकरी**

**माणूस दिवाळी अंक**

धूळभरल्या डोळ्यांनी आणि कपड्यांनी आम्ही दोघे एस.टी.तून उतरलो. धुळीचीच वाट पाचदहा मिनिटं तुडवल्यावर एका भिंतीजवळ उभा केलेला लाकडी रथ दिसला. चांगला वीस फूट उंच. माझा मित्र मला म्हणाला " घर जवळ आलं–"
देवळाला वळसा घालून आम्ही एका दिंडीदरवाजाशी आलो. आत गेलो. पुढेच नळ – त्याला लागून दगडी पायऱ्या. पायऱ्या चढून वर गेलो. ओसरीवर झोपाळा बांधलेला. दाराची लाकडी चौकट नक्षीदार. मध्यभागी गणपती. बाजूला लहानशी नावाची पाटी.
एका नामांकित प्रवचनकारांचं हे घर. गाव लहानसं. पण प्रवचनकार यांची ख्याती मोठी. पुण्या-मुंबईपर्यंत आणि गोवा-बेळगावपर्यंत.

मी शूज् काढले आणि झोपाळ्यावर बसलो. प्रवचनकारांच्या पत्नीनं आमचं स्वागत केलं. म्हणाल्या – " आलांत, फार आनंद झाला ! "
मी मनात म्हटलं – " आनंद झाला असेल, पण आमच्या येण्यानं तुमच्या दुःखावरची खपलीच निघायची आहे. "
एवढ्यात आतून एक वीस-बाविशीची लहानखुरी मुलगी बाहेर आली. रूपानं रेखीव, मध्यम वर्णाची. मुंबई फॅशननं साडी नेसलेली. अत्यंत नाजुक, कोवळी, लग्नाची स्वप्नं पाहाणारी निष्पाप मुलगी !
तिनं न्हाणींतून बादली पायरीवरच्या मोरीत ठेवली.
" हात-पाय घ्या धुऊन. मी चहा ठेवतेय्." असं म्हणून तिच्या आई आत गेल्या. तिनं आम्हाला साबण दिला, प्रसन्नपणे हसली आणि माडीवर निघून गेली.

" हीच ती. " मित्र हलकेच म्हणाला.
मला धक्काच बसला !

– ही प्रसन्न हसणारी, स्वप्नाळू – जिच्यावर लग्नानंतर सहाच महिन्यांत माहेरी परतण्याचा प्रसंग आला – ती ?

– जिच्या लग्नानंतर चारच महिन्यात पतीनं धावत्या गाडीतून उडी टाकली – ती ?

– जिनं पतीला मृत्यूच्या दारातही सोबत केली – ती ?

– जिनं सक्तीच्या गर्भपातानंतरही हातपाय हलवणारं आपलं बाळ हळूहळू मृत्युमुखी पडत चाललेलं पाहिलं – ती ?

– आणि मुख्य म्हणजे, जी स्वतःच प्रत्यक्ष मरणाच्या जबड्यातून परत आली – ती ?

**–विश्वास बसायलाही कठीण, पण जो खरोखरच घडली, अशी करुण कहाणी.**

**जौळ**

# साप्ताहिक माणूस

वर्ष अठरावे–अंक सतरावा

२३ सप्टेंबर १९७८

मूल्य ७५ पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४४३४५९


## सप्रेम नमस्कार

◻ 'माणूस'चा दि. २ सप्टेंबरचा कुटुंब-नियोजन विशेषांक वाचला. सर्व अंक सर्वच दृष्टींनी उत्तम झाला आहे. एका मोठ्या राष्ट्रीय स्वरूपाच्या प्रश्नावर काढलेल्या या अंकाची एक नवीन आवृत्ती काढून महाराष्ट्र सरकारने तो अंक महाराष्ट्राच्या खेडोपाडी पोचविला पाहिजे एवढ्या महत्त्वाचा हा अंक आहे.

कोल्हापूर — ग. रं. भिडे

◻ आपल्या कुटुंब नियोजन विशेषांकावर आपण खूष झालो. 'माणूस'च्या परंपरेस साजेसाच अंक. वाचून माझी प्रतिक्रिया आपणाकडे पाठवीत आहे.

कुटुंब नियोजन विशेषांक ह्यात श्री. विजय परुळकर ह्यांनी अतिशय महत्त्वाच्या आणि ज्वलंत प्रश्नाला सध्याच्या बदलत्या राजकारणाच्या परिस्थितीत चालना देण्याचा प्रयत्न केला, ही अतिशय चांगली गोष्ट आहे. सुदैवाने मा. शंकरराव चव्हाण, मा. निहाल अहमद आणि श्री. विनायकराव पाटील ह्यांच्यासारख्या निःस्पृह वृत्तीच्या, समाजाविषयी आस्था बाळगणाऱ्या नेत्यांचा आणीबाणीच्या काळात बदनाम झालेल्या ह्या चांगल्या देशहिताच्या, जनहिताच्या कार्यक्रमाला उत्स्फूर्त आणि उघड पाठिंबा मिळतोय ही त्यात आणखी समाधानाची गोष्ट.

डॉ. बानू कोयाजी ह्यांनी सांगितल्याप्रमाणे खरोखरच आपण ह्या पंधरा महिन्यांच्या कारकीर्दीत ह्या कार्यक्रमाकडे दुर्लक्ष केल्यामुळे लोकसंख्यावाढीला आळा घालण्याच्या बाबतीत पंधरा वर्षांनी मागे गेलो, हे आपल्याला नवीन 'बर्थरेट इंडेक्स' वाचल्यावर कळते आणि हा इंडेक्स असाच वाढत गेला तर आणखी पाच वर्षांनी मा. शंकरराव चव्हाण ह्यांनी म्हटल्याप्रमाणे खरोखरच माणूस माणसाला खायला उठेल!

मी स्वत: १९७१ ते १९७४ ह्या तीन वर्षांच्या कालावधीत महाराष्ट्र शासनाच्या गुहागर आणि पनवेल येथील प्राथमिक आरोग्यकेंद्राचा प्रमुख वैद्यकीय अधिकारी म्हणून काम केले आहे. त्या वेळेस आणीबाणीचा तो 'हिटलरी' प्रकार अस्तित्वात नव्हता. तरीदेखील एकंदरीत अनुभव फारच तापदायक होता. त्यात जास्त त्रास नसबंदीयोग्य माणूस निवडताना होत असे. कारण आमच्यावर नियम वगैरेंचे वैद्यकशास्त्राच्या दृष्टिकोनातून बंधन असे. त्यानुसारच 'केस'ची निवड करीत असू. अयोग्य 'केस' असल्यास परत पाठवीत असू; परंतु ती 'केस' आणणारा प्रमोटरनामक भयंकर माणूस बरेच वेळी आरोग्यकेंद्राचा सॅनिटरी इन्स्पेक्टर, रेव्हेन्यूचा तलाठी किंवा गटविकासाकडचा ग्रामसेवक असे. तो नाराज होत असे. कारण त्यांचा इष्टांक पुरा व्हायला वेळ लागे; परंतु केवळ इष्टांक पुरा करणे मला पटत नसे. 'केस' नाकारण्याची अनेक कारणे होती. ती लिहिणे हा स्वतंत्र विषय होईल म्हणून टाळतोय. शेवटी गोष्टी इतक्या विकोपाला गेल्या की त्या सर्व प्रमोटर्सनी (खास करून वर सांगितलेल्या) माझ्यावर बहिष्कार टाकला. म्हणजे मला ऑपरेशन करण्यास मनाई केली. अर्थात ते त्यांच्याच अंगाशी आले. कारण पेशंट्सना मी ऑपरेशन करण्याकरिता पाहिजे होतो. त्या महाभागांनी चिडून कलेक्टरसाहेबांना टेलिग्रॅम केला की, डॉ. भगत हे ह्या राष्ट्रीय मोहिमेत व्यत्यय आणतात. साहजिकच त्वरित फर्मान सुटून C. E. O. मार्फत चौकशी सुरू झाली आणि शेवटी निष्पन्न काय, तर त्या महाभागांना दोषी ठरवून त्यांच्या बदल्या झाल्या. कारण माझा दोष नव्हताच; परंतु स्थानिक वार्तापत्रात माझ्याविषयी वाईट मजकूर देखील प्रसिद्ध केला. कारण नंतर कळले की, ती प्रमोटर्स बडी मंडळी होती म्हणून.

शेवटी एका महत्त्वाच्या मुद्द्यावर लक्ष द्यावेसे वाटते. कोणत्याही राजकीय पक्षाने ह्या कार्यक्रमाकडे पक्षस्वार्थाकडे पाहून त्याचा बट्ट्याबोळ न करता सर्वांनी सुसंवाद साधून हा एक अत्यंत महत्त्वाचा राष्ट्रीय कार्यक्रम आहे, तो यशस्वीरीत्या अमलात आणलाच

पाहिजे, मग राज्य कोणत्याही पक्षाचे असो, असा दृष्टिकोन ठेवला पाहिजे. तरच तरणोपाय आहे.

मुंबई डॉ. एन्. एम्. भगत

◻ कुटुंब नियोजन अंकातील मा.ना. निहाल अहमदजी यांची मुलाखत वाचली. योगायोगाने ते आमच्या भागात दिनांक १० सप्टेंबरला आले. युवा जनतासमोर भाषण देण्यासाठी उभे राहिल्यावर मला वाटले की, निहालजी कुटुंब नियोजनाविषयी दोन शब्द बोलतील; पण तसे घडले नाही. मला खूप वाईट वाटले. त्यांनी आपल्या मुलाखतीत सांगितले होते की, आणीबाणीच्या आधी आणि नंतर लोकांसमोर जाहीर सभांतून लोकांना कुटुंब नियोजन हा विषय मी सांगतो. मग आमचा भाग आदिवासी होता आणि त्यातल्यात्यात म्हणजे युवा जनतासमोर तर हा विषय आवर्जून बोलायला पाहिजे.

जर आपण कुटुंब नियोजन विषयावर सामान्य लोकांना समजतील असे काही कार्यक्रम सुरू करणार असाल तर त्याची सुरुवात सातपुड्याच्या पायथ्यापासून करायला हवी. मी आपल्या कार्यक्रमात सक्रीय भाग घेण्यास तयार आहे.

शहादे विनोदचंद्र धनजी पेंढारकर,

◻ आपला दि. ३१९ चा 'कुटुंबनियोजन' विशेषांक खरोखर अत्यंत उद्बोधक व माहितीपूर्ण आहे. या गंभीर विषयाचे महत्त्व पन्नास वर्षांपूर्वी कै. र. धों. कर्वे यांनी द्रष्टेपणाने जाणून त्या काळातील सनातनी धर्ममार्तंडांच्या प्रखर विरोधाला एकनिष्ठेने तोंड देत जीवन संपविले होते. श्रीमती शकुंतला परांजपे यांनीही तळमळीने या कार्यात लक्ष घातले. त्यांचा ओझरता उल्लेख अनवधानाने राहिला असावा. असो.कुटुंब नियोजनकार्याचे महत्त्व, त्यामागील भूमिका, व्यावहारिक अडचणी, ते कार्य गतिमान करण्यासाठी विविध व्यक्तींनी केलेल्या सूचना जशा मोलाच्या आहेत, त्याचप्रमाणे श्री. विजय परुळकरांनी स्वतः सर्वांच्या मुलाखती घेऊन व स्वतःचे अनुभव शब्दांकित करून जनजागृती साधण्यासाठी खास अंक काढण्याचे जे तळमळीने परिश्रम घेतले त्याबद्दल त्यांना, अर्थात आपणासही मनःपूर्वक धन्यवाद.

एकंदरीत संपूर्ण अंक एक उत्कृष्ट अभ्यासू प्रबंध आहे. ही काळाची निकड शासनाने जाणून युद्धपातळीवर नियोजन केले पाहिजे. पण ते घडेल काय ?

सांगली श्री. ग. सबनीस

◻ आणीबाणीत बदनाम झालेल्या व नंतर संपूर्ण बंद पडलेल्या 'कुटुंब नियोजन' या सर्वांत महत्त्वाच्या राष्ट्रीय समस्येकडे, कुटुंब नियोजन विशेषांक काढून जनजागृतीची सुरवात 'माणूस' नाही तर कोण करणार?

यापुढेही जाऊन या विषयावर प्रश्नावली, मुलाखती तयार करून निरनिराळ्या मान्यवर व्यक्ती, डॉक्टर, वाचक, सामान्य लोक यांची मते मागवून झोपलेल्या आपल्या जनता सरकारला जागे करण्यास योग्य वेळ आहे. नाही तर मा. श्री. शंकरराव चव्हाण यांच्या इशाऱ्याप्रमाणे खरोखरच भयानक दारिद्र्य येऊन माणूस माणसाला खाल्ल्याशिवाय राहणार नाही.

केंद्र सरकार ६०० कोटी रु. ची प्रौढ शिक्षण योजना ऑक्टोबरपासून सुरू करीत आहे. यामध्ये 'कुटुंब नियोजन' हा विशेष विषय मानून आठवड्यातून दोन तास तरी जनतेला याविषयी फायदे-तोटे, समज-गैरसमज समजावून सांगण्याचा प्रयत्न करावा. जनता (प्रौढ) त्याला निश्चितच प्रतिसाद देईल.

या विशेषांकाबाबत 'माणूस'चे मित्र श्री. विजय परुळकर विशेष अभिनंदनीय आहेत.

महत्त्वाची विनंती–

'माणूस' प्रत्येक खेडोपाडी वाचावयास मिळाला पाहिजे. निश्चित लोकप्रियता मिळेल.

खोपोली विलास भिकू दबडे

◻ आपण कुटुंबनियोजन विशेषांक काढल्याबद्दल आपले हार्दिक अभिनंदन. ह्या विषयाचं महत्त्व भारतातील प्रत्येक वयात आलेल्या स्त्री-पुरुषांना समजणे व त्याप्रमाणे वागणे, हे अत्यंत महत्त्वाचे आहे.

मी 'माणूस'चा ग्राहक व वाचक आहे. मी एक जनतेने विसरलेला ७३ वर्षांचा वृद्ध डॉक्टर आहे व १९३४ सालापासून कुटुंब नियोजन ह्या विषयाचा पुरस्कार करण्यासाठी दवाखाना (गिरगावात) सुरू केला, व्याख्याने दिली, समाजस्वास्थ्य मासिकात लेख लिहिले. कै. र. धों. कर्वे हेच कार्य अविरत करता करता गेले. कुटुंब नियोजन ह्या विषयावर Space Your Children हे पुस्तक इंग्रजीत व 'पाच वर्षांचा पाळणा' हे मराठीत, ही माझी पुस्तकं प्रसिद्ध झाली आहेतच.

त्या काळी म्हणजे ४०–४४ वर्षांपूर्वी मी अशा विषयात कार्य करतो म्हणून माझी मित्रमंडळीसुद्धा मला टाळू लागली व ह्याचा विपरित परीणाम माझ्या व्यवसायावर झाला व मी माझ्या दवाखान्यात निष्कामच बसून राहात होतो.

१९५१ पासून मी कॉन्टॅक्ट लेन्सेस व हुबेहुब डोळे बनवून बसविण्याचं कार्य करीत आहे व १९५४ पासून बुटक्या मुलांमुलींना उंच करण्याचे माझे प्रयोग यशस्वी झाले आहेत. अशा प्रकारे भारतातील आद्य प्रवर्तक (Pioneer) म्हणून मी नाव मिळविले आहे.

कुटुंब नियोजनविषयापासून जरी मी व्यावसायिकदृष्ट्या निवृत्त झालो असलो तरी एकच गोष्ट सांगावीशी वाटते की, भारतात चालू झालेला कुटुंब नियोजनाचा त्रिकोण विशेष यशस्वी दिसत नाही. भारताची लोकसंख्या ३० कोटींची ७० कोटी झाली आहे व कितीही औद्योगिक प्रगती आपण केली तरी कोटचवधी निरुद्योगी तरुण प्रतिवर्ष वाढतच आहेत. कितीही पंचवार्षिक योजना आखल्या तरी कुटुंबनियोजनाचे कार्य, कितीही लोकजागृती करून फलदायी होणं अशक्यच दिसते व २००० साली आपली लोकसंख्या इतकी वाढण्याची भीती आहे की, ज्ञाते लोक म्हणू लागले आहेत की, लोकसंख्येच्या मानाने अन्न–धान्य नेहमीच कमी कमी वाढत राहील व माणूस माणसालाच खाऊ लागेल ! अशी वेळ येऊ नये असं वाटत असेल तर सुप्रजाजननशास्त्र (Eugenics) सांगते त्याप्रमाणे,

१) अर्धवट, वेडे, अशा लोकांचा सक्तीने निर्वंश करणे. शस्त्रक्रियेने संभोगेच्छा व संभोगसुख कायम ठेवून केवळ निर्वंश करणे.

२) सर्वच लोकांनी दोन मुले झाल्यावर स्वेच्छेने शस्त्रक्रिया करून न घेतल्यास सक्तीने करणे.

३) ज्यांना मूल होतच नसेल, त्यांनी आपला वंश चालू रहात नसल्याबद्दल नाराज होऊ नये–कारण अशा कोणा मोठ्या हुषार लोकांची मुले तरी आपल्या पालकांची नावे राखतात ? क्वचितच.

येत्या ५-७ वर्षांत आपल्या सरकारला जर असे करणे शक्य होईल तर ठीकच. नपेक्षा २००० साल भयंकर उजाडणार अशी भिती सार्थ होईल. तो दुर्दिन आपले भारतीय लोक स्वतःच्या हाताने ओढवून घेतील हे प्रत्यक्ष पहायला मी नसेन. व्यासमहर्षींनी म्हटल्याप्रमाणे 'ऊर्ध्वबाहुः विरौम्येष नहि कश्चित् श्रृणोति मे' हा अनुभव पुन्हा प्रत्ययाला येणार !

१० सप्टेंबर डॉ. शंकर हरि मराठे,मुंबई

□ आपला शनिवार दि. २ सप्टेंबर १९७८ चा कुटुंब नियोजन विशेषांक आज म्हणजे 'शिक्षक दिनी' वाचला. आपण महाराष्ट्रात विधायक कार्य जोपासण्याचे आणि गतिशील करण्याचे महान कार्य करीत आहात त्याचा पुरावा म्हणजे हा विशेषांक. आपल्या ह्या अंकामुळे ह्या कार्याला ( विषयाला नव्हे ) चालना मिळो ही इच्छा. श्री. विजय परूळकर ह्यांना धन्यवाद.

श्री. परूळकर हे केवळ पोसण्याची क्षमता हाच आधार का घेतात ? कुटुंबात अधिक मुले असणे हा प्रश्न ( problem ) केवळ आर्थिक बाजूचाच विचार करून सोडवून चालणार आहे काय ? ह्या प्रश्नाचे अनेक पैलू आहेत असे मला वाटते.

आपल्या ( भारतीय ) समाजात मुलगा हवा असणे हा एक प्रतिष्ठेचा विषय बनतो. आम्ही मित्रमंडळी ज्याला लागोपाठ दोन मुली होतात तो जेव्हा तिसऱ्यांदा चान्स (?) घेतो तेव्हा त्याला आशीर्वाद देतो की तुला तिसरी मुलगीच होणार आणि होतेही तसेच! तीन मुली झाल्यानंतरही तो जेव्हा मुलगा व्हावा म्हणून चवथ्यांदा प्रयत्न करतो तेव्हा त्याला म्हणतो, 'तुझ्या ह्या अस्सल गाढवपणाला फळ म्हणून चवथी मुलगीच होणार!' सहसा हा अंदाज चुकत नाही. आजूबाजूला पाहिल्यानंतरही लक्षात येते की,मुलगा व्हावा ह्या महान ध्येयासाठी ही स्वतःला शहाणी म्हणविणारी माणसे आपले दुःख किती वाढवितात ! माझा विरोध मुलींना नाही, तर मुलींपेक्षा मुलाला आपण देत असणाऱ्या अवास्तव महत्त्वाला आहे.

आपल्या ह्या विशेषांकात जर 'कुटुंब लहान, सुख महान' समजून ज्यांनी नियोजन केले त्यापैकी काहीजणांचे विचार आणि नियोजनाच्या भानगडीत न पडणाऱ्या आणि परमेश्वराची देणगी दर वर्षी घरी आणणाऱ्या काहीजणांचे अनुभव दिले असतेत (विशेषतः सचित्र ) तर फार बरे झाले असते.

महाराष्ट्रात तरी कुटुंब नियोजनाची टिंगल, कुचाळी फारशी झाली नाही (कै. र. धों कर्वे यांचे बलिदान व्यर्थ गेले नाही ) पण उत्तर वा मध्यप्रदेशात असा प्रचार झाल्याचे ऐकले आहे. 'पहेला बच्चा अभी अभी, आठके बाद कभी कभी.' खरे-खोटे तो आठवा पुत्र ( देवकीचा ) जाणे !

ह्या प्रश्नाचा पाठपुरावा करण्यासाठी आपण जर नियमितपणे 'माणूस'मध्ये एक-दोन पाने मजकूर दिलात तर फार बरे होईल.

हा देश सुखी समृद्ध होण्यासाठी आपण जे कार्य करीत आहात ते असेच घडत रहावे ही इच्छा.

ह्यापुढेही असेच विशेषांक वाचावयास मिळावे अशी अपेक्षा.

डोंबिवली चंद्रशेखर र. राजे

# अवती-भवती

शिरीष सहस्रबुद्धे

## □ ताजमहाल : यमुनाकाठी की यमद्वारी ?

यमुनेच्या ताज्या महापुराचा दणका आग्रा शहराला बसल्याची बातमी कळली, तेव्हाच 'यमुनाकाठी ताजमहाल' म्हणणाऱ्या रसिक मंडळींना ताजची चिंता वाटली होती. अपेक्षेप्रमाणे 'ताज गार्डन्स'ला पुराचा वेढा पडल्याची बातमी पाठोपाठ आलीच. १९२४ नंतर यंदा प्रथमच, एरवी ताजचं सौंदर्यनिधान असणाऱ्या यमुनेनं ताजमहालला असा धोका उभा केला होता. सुदैवानं दुसऱ्याच दिवशी ताजचा धोका टळल्याची आणि यमुना धीरेधीरे का होईना, पण ओसरायला लागल्याची बातमी आली आणि ताजमहालवर शहाजन इतकं नसलं तरी औरंगजेबापेक्षा बरंच जास्त प्रेम करणाऱ्या मंडळींनी सुटकेचे निःश्वास टाकले.

अर्थात ताजची झालेली ही सुटका किती तात्कालिक आणि अपुरी आहे, याची कल्पना आपल्यापैकी किती जणांना असेल ? ताजमहाल आज यमुनेच्या नैसर्गिक कोपापासून बचावला असला तरी, त्यापेक्षाही तीव्रतर अशा विनाशकारी मानवी शस्त्रास्त्रांपुढे यापुढे त्याची खैर नाही ही जाणीव अनेकांना भयंकर वाटेल; पण ती वस्तुस्थिती आहे, हे समजूनच घेतलेलं बरं. जगातलं एक आश्चर्य आणि भारतातलं एक सर्वोत्कृष्ट सौंदर्यस्थळ (अधिक परकीय चलनोत्पादक पर्यटनस्थळ !) असलेली ही वास्तू क्षणाक्षणाला विद्रूप होत जाण्याची शक्यता यापुढे आहे, या भीतीची पडछाया ताज्या 'मिरर'मध्ये ठळकपणे पडलेली दिसते.

ताजमहाल खऱ्या अर्थानं परिपूर्ण झाला तो १६५८ मध्ये, वृद्ध बादशहा शहाजहाननं मृत्यूनंतर आपल्या प्रियेशेजारीच चिरविश्रांती घेतली तेव्हा आणि विचित्र योगायोग असा की, ताजमहालची खराबी होण्याची प्रक्रिया सुरू झाली, तीही जवळपास याच काळापासून ! म्हणजे असं की, शहाजहानची कबर पूर्ण झाल्यानंतर त्या दोन्ही कबरींभोवती अस्सल सोन्याचे भरीव-भक्कम कठडे चौफेर बांधण्यात आले होते आणि या सोन्यात मूल्यवान रत्ने जडविली

होती. तथापि लवकरच कर्तबगार चिरंजिवांनी सोनं काढून घेऊन संगमरवराचे कठडे घातले. अठराव्या शतकात मोगल साम्राज्याचा दरारा जसजसा घटत गेला, तसतसा ताजची लूटमार करण्याच्या चोरट्या कारवायांना रंग चढला. १९०७ मध्ये भरतपूरच्या जाट राजांनी दोन चांदीची दारं, कबरीवरचे सोन्याचे पत्रे आणि संगमरवरात जडवलेले मूल्यवान खडे नेले. थोडयाच काळानंतर मुमताजमहालच्या कबरीवरच्या मोत्यांच्या अवगुंठनावर हुसेन अलि खान सैद याची वाकडी नजर गेली. वर दक्षिणा म्हणून उरलीसुरली रत्न-माणकंही तो घेऊन गेला.

ब्रिटिशांच्या अमदानीत ताजच्या लूटमारीला एक नवीच दिशा मिळाली. महाल बांधण्यासाठी कामी आणलेल्या संगमरवराच्या अखंड शिलाखंडाची निर्यात, ब्रिटिश लॉर्ड्सचे प्रासाद आणि लेडीजचे महाल सजविण्यासाठी करण्यात येऊ लागली. ठग–पेंढाऱ्यांचा बंदोबस्त करण्याबद्दल प्रसिद्ध असलेला गव्हर्नर जनरल लॉर्ड विल्यम बेंटिक यानं तर ठगांच्या बादशहालाही सुचणार नाही अशी योजना मांडली. दिल्ली–आग्रा शहरातली सगळीच मोगलकालीन स्मारकं पद्धतशीरपणे भग्न करायची– त्यातला सलग संगमरवर काढून तो इंग्लंड–युरोपात विक्रीसाठी निर्यात करायचा, अशी ही योजना. आपल्या आणि सगळ्या जगाच्याही सुदैवाने ती फसली. अशा 'चोरीच्या' संगमरवराच्या पहिल्या हप्त्याचा जो लिलाव इंग्लंडमध्ये झाला, तो काही फारसा किफायतशीर ठरला नाही आणि ही बातमी वेळेवर भारतात पोचल्यानं ही विनाशमालिका थोडक्यावरच थांबविण्यात आली. अर्थात एव्हाना पाडापाडीचं काम करणारी यंत्रसामग्री आणि तज्ज्ञ पथक ताज गार्डन्समध्ये येऊन दाखलही झाली होती आणि काम सुरू करायच्या तयारीतच होती. ताज थोडक्यातच बचावला. नंतर असं कळलं म्हणे की, ताजचे हे पत्थर अशा तऱ्हेनं इंग्लंडमध्ये विकून येणाऱ्या किमतीत, ताजमहाल सुटा करण्याचा खर्चसुद्धा भागला नसता !

विशेष म्हणजे बेंटिकच्या या पापाची भरपाई केली तीही एका ब्रिटिशानच– एरवी बदनाम असलेल्या लॉर्ड कर्झन यानं. पुरातत्त्वशास्त्राचा चाहता असलेल्या या व्हाइसरॉयनं दिल्ली–आग्रा परिसरातली जुनी स्मारकं दुरुस्त करण्यासाठी ५०,००० पौंड खर्ची घातले. 'ताज'कडे तर खास लक्ष पुरविण्यात आलं– इमारतीची डागडुजी झाली, पडझड / लूटमार यामुळे झालेलं नुकसान भरून काढलं गेलं, ताज-उद्यान पुन्हा पूर्वीसारखं जिवंत होऊन उठलं आणि यमुनेचं पाणी त्यातल्या कारंजातून पुन्हा अखंड तुषारलं जाऊ लागलं. ११३७ मध्ये संगमरवरात तडे गेल्याचं दृष्टोत्पत्तीस आलं, तेव्हा सुमारे ५३,००० रुपये खर्च करून ते भरून काढले गेले. १९४१ मध्ये ताजच्या उत्तर दिशेला यमुनेकडे तोंड करून एक संरक्षक भिंत बांधण्यात आली, संगमरवराची झीज थांबविण्यासाठी. ताजच्या सर्वसाधारण 'राहणी'चा खर्च आजही दर वर्षाला एक लाख रुपये, इतका सरकारवर पडतो.

ताजमहालच्या हानी-नुकसानीचा आणि भरपाईचा इतिहास आजपर्यंत तरी इथंच संपत होता. १९७३ मध्ये मात्र त्यात एक नवं पान लिहिलं जायला सुरुवात झाली– असं पान जे या इतिहासाचं शेवटचं पान ठरणं अशक्य नाही ! ताजपासून फक्त ४० कि. मी. अंतरावर, मथुरा इथं, एक रिफायनरी बांधण्यात आली. साठ लाख टनांची क्षमता असलेली ही रिफायनरी थोडेथोडके नव्हेत, तर दोनशे कोटी रुपये खर्चून बांधली जात्येय – जवळजवळ पूर्ण होत आलीय. या रिफायनरीतून बाहेर सोडल्या जाणाऱ्या दूषित वायूंपैकी एक सल्फर-डाय-ऑक्साइड असणार आहे. आता रसायनशास्त्राचं प्राथमिक ज्ञान असणाऱ्या एखाद्या शाळकरी पोरालासुद्धा हे कळेल की, या सल्फर डाय ऑक्साइडचा पावसाच्या पाण्याशी संयोग झाला की, तीव्र सल्फ्युरिक ॲसिड – गंधकाम्ल – बनेल – म्हणजे यापुढे ताजवर पावसाळ्यात वर्षाव होईल तो साध्या पावसाचा नव्हे, अनेकदा त्याला गंधकाम्लाच्या 'शॉवर बाथ'ची जळती चव चाखायला मिळेल! या गंधकाम्लाचा संपर्क ताजमहलच्या संगमरवराशी ( रसायनशास्त्रात – कॅल्शियम कार्बोनेट ! ) आला की त्यातून विद्राव्य कॅल्शियम तयार होईल – थोडक्यात ताजच्या संगमरवराची झीज होत जाईल ! तेव्हा यापुढे होणारी ताजची लुटालूट आणि पडझड, ही पूर्वीप्रमाणे क्रूर-दृश्य मानवी हातांनी होणार नाही, तर अदृश्य रासायनिक प्रक्रियेनं होत राहील आणि तेच अधिक भयंकर आहे ! कारण त्याचा धोका मान्य करायला लोक सहजासहजी तयारच होत नाहीयेत, सरकार सुद्धा !

रिफायनरीचा हा खास 'मथुरा'प्रसाद कमी पडला असता म्हणूनच की काय, आग्रा शहरानंही ताजला हानिकारक ठरणाऱ्या वातप्रदूषणातला आपला वाटा उचलला आहे ! आज आग्रा परिसरात सुमारे २५० नाना प्रकारच्या फाउंड्रीज आहेत, दोन औष्णिक विद्युत्केंद्रे आहेत आणि एक रेल्वे शंटिंग यार्डही आहे, ज्यातनं निघणारा कोळशाचा फर्मास धूर वाऱ्यावरून जमनापार वाहात जाऊन ताजच्या उत्तर पृष्ठभागाशी विद्रूप लगट करीत असतो ! आणि हा सारा त्रास एकट्या ताजलाच होतो असं नाही – फत्तेपूर सिक्री, भरतपूरचं पक्ष्यांचं अभयारण्य आणि मथुरेतली जुनी मंदिरं यांनाही या प्रदूषणाचा राक्षस सतत भेडसावीत असतोच. या प्रश्नाकडे सरकारचं लक्ष वेधण्याचे प्रयोग हे प्रत्येक वेळी एखाद्या नव्या 'पाहणी प्रकल्पा'ला किंवा अभ्यासगटाला जन्म देण्याइतपतच यशस्वी ठरलेले आहेत. अशा तीन तरी समित्या आजवर निरीक्षण–अभ्यास करून गेल्या. पुढं हालचाल काही नाही! तेअनेको नावाच्या इटालियन कंपनीच्या तज्ज्ञसमितीनं 'रिफायनरीपासून ताजला धोका नसल्या'चा निर्वाळा दिला खरा; पण त्याचं कारण देताना सगळा दिलासा नाहीसा केला. त्यांच्या म्हणण्यानुसार आग्र्यातली प्रदूषणविषयक स्थिती आताच इतकी बिकट आहे की, रिफायनरी वातावरणात आणखी फक्त एखादा टक्का सल्फर-डाय-ऑक्साइड वाढवू शकेल आणि त्यामुळे एकूण परिस्थितीत फारसा फरक पडणार नाही ! आहे की नाही मासलेवाईक तज्ज्ञता ? आणि इटालियन तज्ज्ञसमितीनं प्रश्नाचं गांभीर्य मोजण्यात चूक केलेली आहे, असं भारतीय पुरातत्त्वशास्त्रविभागाच्या अभ्यासकांचं मत असतानाही सध्याचे केंद्रीय पेट्रोलियम–रसायनमंत्री बहुगुणाजी इटालियन्सच्याच निष्कर्षाचा हवाला देऊन स्वस्थ आहेत! माजी केंद्रीय शिक्षणमंत्री प्रा. नुरुल हसन यांचं मत त्याविरुद्ध होतं म्हणे. अर्थात तरीसुद्धा त्यांनाही हात-पाय हालवले नाहीतच, ही बाब अलाहिदा !

रिफायनरीचा एक संभाव्य धोका सध्या सोडून द्या. ताजला

सध्याचं घेरून टाकणारं प्रदूषण कमी करण्यासाठी सरकार काय करू शकतं ? रेल्वे शंटिंग यार्ड आणि फाउंड्रीज दूर हलवू शकतं ? ते तर शक्य दिसत नाही. अशा परिस्थितीत उद्या रिफायनरी सुरू झाली आणि त्यातून निघणारे गॅसेस ताजला हानिकारक आहेत असं सिद्धच झालं तर हे सरकार काय करील ? रिफायनरी हलविणं त्यांच्या आटोक्याबाहेरचं असणार नाही काय ? जाता जाता एवढं लक्षात घ्यायला हरकत नाही की, या रिफायनरीतून बाहेर पडणाऱ्या वायूंच्या प्रदूषकतेचा अभ्यास करण्यासाठी यूनोनं आपल्याला एक कॉम्प्युटर कर्जाऊ दिलेला आहे आणि तसा अभ्यास करणारी चार केंद्रं आग्रा-मथुरा परिसरात उभारण्यात आली आहेत. रिफायनरीचं काम १९८० मध्ये सुरू होईल आणि कॉम्प्युटर आपलं संशोधनकार्य सुरू करील !

सरकार त्यानंतर काय करील ?

बहुधा काही नाही. प्रदूषणाची आजचीच धोकादायक पातळी कमी करण्यासाठी ज्या सरकारला काही करता येत नाही, ते दोनशे कोटी रुपयांच्या रिफायनरीचं नुकसान थोडंच सोसू शकणार आहे ? शक्यता अशी दिसते की, पोल्यूशन-कॅन्सरनं ग्रासलेल्या ताजमहालला यमुनाकाठी तसंच झिजून, मरणाच्या दारात सोडून दिलं जाईल–ताजच्या मालकाची झाली होती तीच दुर्दशा त्याच्या कबरीच्याही वाटयाला आली, तर नवल कसलं ?

या प्रश्नाकडे गंभीरपणानं पाहणं एका सरकारखेरीज अन्य कुणाच्याच कर्तव्यकक्षेत बसण्यासारखं नाहीये का ?

नसेल तर–कुणास ठाऊक, दूरच्या भविष्यकाळातली एखादी भारतीय पिढी, भारतीय वन्य प्राणिजीवनाप्रमाणेच ताजबद्दलही, कदाचित भूतकालाच्या मदतीनंच बोलेल ! ◻

# ◻ कोणार्क : सूर्यमंदिरावर सूर्यास्त !

ताजमहालची खराबी, ही झाली एक दूरची शक्यता. ओरिसातल्या कोणार्कच्या सुप्रसिद्ध सूर्यमंदिराचा भाग्यसूर्य अस्ताला जाण्याची वेळ मात्र अगदी नजीकच आलेली दिसते आहे. त्याची हकीकतही पुन्हा 'सन्डे'मध्येच यावी हा आणखी एक दैवविलास वगैरे.

बऱ्याच काळापूर्वी– २२४ फूट उंचीचं भव्य मंदिर जेव्हा जमीनदोस्त झालं तेव्हा, कोणार्कची दुरावस्था पाहून विषण्ण झालेले प्रसिद्ध उडिया कवी डॉ. मायाधर मानसिंग यांनी 'कोणार्क, तुझं तारुण्य आता ओसरून गेलंय,' अशी व्यथित कविता लिहिली होती; पण तरीही त्या वेळी सूर्यमंदिराच्या प्रवेशद्वारी असलेलं एक जगमोहन मंदिर का होईना, पण शिल्लक होतं. कोणार्कची आजची दुःस्थिती पाहायला डॉ. मानसिंग हयात असते तर मात्र त्यांनी कळवळून लिहिलं असतं– 'कोणार्क, तुझा दिवसच मावळला आहे !' आणि खरोखरच, १ ऑगस्टच्या दिवशी उर्वरित मंदिराच्या भव्य दगडी छताचा मोठा भाग कोसळला, तेव्हा तसंच वाटलं खरं ! कारण १९०४ मध्ये या मंदिराला शासकीय संरक्षण मिळालं, तेव्हापासून दिसलेली त्याच्या विनाशाची ही पहिलीच खूण !

झालं असं की, त्या दिवशी– १ ऑगस्टला– सकाळपासनंच धुवांधार पाऊस कोसळत होता. दुपारी जरा उशिरानंच काम सुरू केलेल्या मजुरांना देवळातून कानठळ्या बसविणारा तो आवाज ऐकू आला आणि ते धावले तेव्हा त्यांना ही कोसळून तुकडे झालेली ही रलॅब दिसली. १·७६ मीटर्स लांबी, एक मीटर रुंदी आणि पाऊण मीटर जाडीची ही शिला, मंदिराच्या वायव्य कोपऱ्यातल्या पुढे आलेल्या छताची होती. म्हटलं तर, एक शिला कोसळणं ही बाब तशी किरकोळ; पण कोणार्कचं आयुष्यच तर विझत आलेलं नाही ना, अशी शंका मात्र ती जरूर निर्माण करते.

आपल्या संस्कृतीशी निगडित असलेल्या मंदिरांपैकी कोणार्कचं सूर्यमंदिर महत्त्वाचं असलं, तरी त्याचा इतिहास पुष्कळांना ठाऊक नसेल. इ. स. १२५५ मध्ये बांधून पुऱ्या झालेल्या या मंदिराला १२०० मजुरांचा हातभार लागला होता आणि बांधकाम चाललं होतं सतत बारा वर्षं ! राजा लांगूल नरसिंहदेव हा याचा करविता कर्ता ! दोनदोनशे फूट उंचीपर्यंत वर चढविलेल्या या मंदिरातल्या कित्येक टन वजनाच्या शिळा, सुमारे ६० कि. मी. अंतरावरच्या एका खाणीतून आणवल्या होत्या, हे विशेष. या भव्य वास्तूचे जेवढे अवशेष आज शिल्लक आहेत, तेवढेसुद्धा राखण्याचं श्रेय पुन्हा ब्रिटिशांकडेच जातं. १९०३ मध्ये बंगालचा गव्हर्नर सर जॉन वुडबॉर्न याची नजर या भग्न वास्तूकडे गेली आणि तत्कालीन स्थापत्यतज्ज्ञ टी. ब्लॉक याला बोलावून मंदिराच्या डागडुजीची व्यवस्था करायला सांगण्यात आलं. मंदिर कोसळण्यापासून वाचाव यासाठी त वाळू आणि चुनखडीन पूर्णतः भरून काढण्याचा निर्णय ब्लॉकने घेतला. १२० फूट उंचीच्या त्या जगमोहन मंदिरात वाळू भरायला पूर्ण एक वर्ष लागलं आणि काम लवकर व्हावं यासाठी मंदिराच्या छताचा मोठा भाग साडवून काढून त्यातून वाळू भरण्यात आला. दुर्दैव असं की, काम पूर्ण झाल्यानंतर ठरल्याप्रमाणं छताचा हा भाग पुनःस्थापित करायला ही तज्ज्ञमंडळी चक्क विसरून गेली आणि त्याहीपेक्षा कहर म्हणजे ही चूक ध्यानात यायला तब्बल ५४ वर्षं लागली. १९५८ मध्ये भारतीय पुरातत्त्वशास्त्रसर्वेक्षण विभागानं मंदिराला 'अभयदान' दिलं तेव्हा ही घोडचूक लक्षात आली– अर्थात दरम्यान पावसाचं पाणी आत मोठ्या प्रमाणावर झिरपून व्हायचं ते नुकसान होऊन गेलेलं असणार. त्यानंतर करण्यात आलेल्या रासायनिक प्रक्रिया आणि आखण्यात आलेल्या कागदी योजना या दोहोंनाही मंदिराचा सावकाश पण निश्चितपणे होणारा ऱ्हास थांबवता आलला नाही. मूर्ती–शिल्पाकृती खराब होण्याचे सहा ठळक प्रकार तरी आतापर्यंत घडलेले आहेत. अलीकडे पडलेला शिलाखंड मंदिराच्या छताच्या पहिल्या टप्प्यात आहे, दुसरे आणि तिसरे निमुळते टप्पे अजून सुरक्षित आहेत; पण पुरेशी काळजी घेतली नाही, तर तेही फार दिवस तग धरणार नाहीत. छताच्या पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या प्रभागांमध्ये उभ्या असणाऱ्या नर्तिका, अप्सरा, नायिका वगैरे मूर्ती केवळ शोभेच्या नाहीत, त्या त्या टप्प्यांना आधार देण्याचं, तोलून धरण्याचं कामही त्या करतात. तथापि हे मूळ आधारही भेगाळून– चिराळून लटके पडत चालल्याचं बारकाईनं पाहणाऱ्याला सहज जाणवतं. छताला खास आधार दिला जाणं निकडीचं झालं आहे, हेही लक्षात येतं.

ए. एस्. आय्. (आर्किऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया) या बाबतीत किती त्वरेनं दखल घेणार हा प्रश्नच आहे. एक ऑगस्टच्या या घटनेनंतर त्यांचा एखादा महत्त्वाचा प्रतिनिधी कोणार्कला पोचायला एक आठवडा लागला. या घटनेचा तपशील बाहेरच्या जगाला माहीत व्हायला जिथं सप्टेंबरचा पहिला आठवडा उजाडतो, तिथं ओरिसातलं ए. एस्. आय्.चं तुटपुंजं माणूसबळ काही उजेड पाडण कठीण दिसतं. 'देवळांचा प्रदेश' म्हणून प्रसिद्ध असलेल्या ओरिसातल्या जगन्नाथपुरी मंदिराचा व्याप त्यांना आटपला नाहीच, आता कोणार्कच्या सूर्यमंदिरावर सूर्य मावळायला आला आहे. आपण काय करू शकू ? निदान कोसळण्यापूर्वी मंदिर पाहून / चित्रित करून तरी घऊ शकू ? ◻

मुंबई वार्ता

विनय सहस्रबुद्धे

## □ शांती पटेल यांचे डावपेच

मुंबई महापालिकेच्या निवडणुका ८ नोव्हेंबरला होणार, हे अधिकृतपणे जाहीर झाल्यामुळे राजकीय हालचालींना गती मिळाली आहे. राजकीय पक्षांची मोर्चेबंदी सुरू आहे, महापालिकेचे अधिकारी व्यवस्थेची आखणी करण्यात गुंतले आहेत, राजकीय कार्यकर्ते हळूहळू फॉर्मात येत आहेत आणि यापैकी कशाचेच सुखदुःख नसलेले हजारो सामान्य जन ८ नोव्हेंबर ही सार्वजनिक सुट्टी जाहीर झाल्याच्या समाधानात आहेत.

निवडणूक म्हटली की डावपेच आलेच आणि मुंबई जनता पक्षाचे अध्यक्ष शांती पटेल अशाच डावपेचांची आखणी करीत असावेत, अशी सर्वसाधारण समजूत असल्यास नवल वाटू नये. प्रत्यक्षात मात्र, प्रसिद्ध झालेल्या बातम्या आणि विश्वसनीय सूत्रांनी पुरविलेल्या माहितीनुसार शांतीभाईंचे हे डावपेच पक्षांतर्गत पैलवानांना पाडण्यासाठीच होते, असा निष्कर्ष काढावा लागतो.

काही महिन्यांपूर्वी शांती पटेल यांची पक्षाध्यक्षपदावर नेमणूक करण्यात आली तेव्हा अध्यक्ष चंद्रशेखर यांनी एकाकी घेतलेला हा निर्णय अनेकांना दुखावणारा ठरला. डावी प्रतिमा असलेला आणि कामगारांमध्ये वावरणारा असा मुंबई शाखेचा अध्यक्ष असावा, या विचारातून ग. भा. कानिटकरांच्या जागी शांती पटेलांची नेमणूक झाली त्यावेळी ग. भा. कानिटकरांची अशी अलगद उचलबांगडी झाल्याने माजी जनसंघाच्या जवळजवळ सर्वांनीच या निर्णयाला विरोध केला. काही समाजवादी मंडळी सुद्धा या निर्णयाला अनुकूल नव्हती; पण कोणत्याही कारणामुळे का होईना, चंद्रशेखरांचा हा निर्णय मानला गेला.

तरी देखील दैवाने दिलेल्या या देणगीच्या आड शांती पटेलांचे 'कर्म' येणार की काय अशी परिस्थिती आता उद्‌भवत आहे. सहकाऱ्यांशी विचारविनिमय न करता, अनेकदा ज्येष्ठ नेत्यांना डावलून आणि एकाधिकारशाही पद्धतीने काम करण्याची शांती पटेलांची पद्धत आणि समाजवादी, जनसंघ व संघटना काँग्रेस या पक्षांचं वाजवी वर्चस्व कमी करण्यासाठी त्यांनी खेळलेले डावपेच आता उघडकीला आले आहेत.

अलीकडचं प्रकरण म्हणजे शांतीभाईंनी नेमलेली निवडणूक समिती. गेल्या मे-जूनमध्येच १४ सदस्यांची महापालिका निवडणूक समिती शांतीभाईंनी स्थापन केली. या समितीवर आणखी ११ जण मागाहून 'निमंत्रित' म्हणून घेण्यात आले. आश्चर्य म्हणजे 'मुंबई जनता'चे सर्वच सरचिटणीस मताधिकार नसलेले निमंत्रित' म्हणून नेमले होते. निर्णय घेणाऱ्या १४ सदस्यांमध्ये अनंत नामजोशी, जयंती पारेख, दत्ता प्रधान, नारायण बाटिया असे ६ जण पटेलांची माणसे म्हणून ओळखली जावीत, अशी मंडळी होती. माजी संघटना काँग्रेसचे एक ज्येष्ठ नेते प्राणलाल व्होरा, झोपडपट्टी संघाचे नेते माजी जनसंघाचे वामनराव परब, के. ए. खान, बलवंत देसाई अशा अनेक महत्त्वाच्या पदाधिकाऱ्यांचा समितीत समावेश नव्हता, मुंबईत यापूर्वी खूप चांगले काम करून दाखविणाऱ्या संघटना काँग्रेस, समाजवादी आणि जनसंघाच्या प्रत्येकाच्या सदस्यसंख्येपेक्षा आपला गट वरचढ ठरावा, या हेतूनेच पटेलांनी हा डाव रचला; पण गेल्या महिन्यातच प्राणलाल व्होरा, रामनाईक, बाबुराव सामंत, सोमनाथ सिंग इ. नी दिल्लीत पक्षाध्यक्ष व पक्षनेत्यांकडे एक निवेदन देऊन शांतीभाईंचे हे डावपेच उधळून लावले आहेत. जनता पक्षाच्या केंद्रित समितीने केलेल्या दुरुस्तीमुळे पूर्वीच्या ११ निमंत्रितांनाही आता निवडणूक समितीचे सदस्यत्व देण्यात आले आहे. २५ सदस्यांच्या या निवड समितीत आता शांती पटेलांचे सहा, समाजवादी व जनसंघाचे प्रत्येकी पाच, संघ-काँग्रेसचे चार आणि पाच इतर अशी विभागणी आहे.

शांती पटेलांच्या कार्यपद्धतीविरुद्ध दाखल झालेल्या निवेदनातली दुसरी तक्रार म्हणजे शांतीभाई सहकारी मंडळींना अजिबात विश्वासात घेत नाहीत. वानगीदाखल एकच प्रकरण पुरेसं आहे. श्री. नारायण तावडे हे मुंबई जनताचे एक सरचिटणीस होते. विधानसभा निवडणुकीच्या वेळी बंडखोरी केल्यामुळे त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई झाली. त्यांच्या जागी दुसऱ्या सरचिटणिसाची नेमणूक आवश्यक होती. एप्रिलमध्येच पटेलांनी श्री. दादा नाईक यांना सरचिटणीस नेमलं; पण ही नेमणूक गुप्त ठेवण्यात आली. मुंबई जनताच्या इतर पदाधिकाऱ्यांनी वारंवार चौकशी करूनही पटेलांनी नवी नेमणूक केल्याबद्दल अधिकृतपणे काहीही सांगितलं नाही. परवा दिल्लीत केंद्रीय समितीकडे राज्यशाखेचे सरचिटणीस पन्नालाल सुराणा यांनीही शांती पटेल 'गुपचुप नेमणुका' करतात, असा स्पष्टच आरोप केला. इतरांचं एक जाऊ द्या; पण ज्यांची नेमणूक झाली त्या दादा नाइकांना सुद्धा नेमणुकीचं अधिकृत पत्र शांती पटेलांनी दिलं नव्हतं. दादा नाइकांचं काम आपल्याला परवडलं तर ठीकच, नाही तर त्यांची अधिकृत नेमणूक न झाल्याने दुसरा एखादा त्यांच्या जागी सहज आणता येईल, या सोयिस्कर विचारातून दादा नाइकांची नेमणूक अनधिकृत ठरवली गेली की काय ?

शांती पटेलांच्या कार्यपद्धतीचा आणखी एक आक्षेपार्ह भाग म्हणजे मुंबई आणि दिल्लीत त्यांनी सुरू केलेली 'हॉट लाइन !' मुंबई शाखा एक स्वायत्त किंवा स्वतंत्र शाखा आहे, अशा समजुतीत शांतीभाई वावरतात त्यांची मागणी अशी होती की, मुंबई निवडणूक मंडळाने उमेदवारांची निवड केल्यानंतर त्यावर महाराष्ट्र शाखेकडे तर नाहीच, पण दिल्लीकडेही अपील होऊ शकणार नाही. ही मागणी मान्य करणं म्हणजे शांती पटेलांना डावपेच खेळण्याचा परवाना देण्यासारखंच. साहजिकच 'मुंबई जनता'तील ज्येष्ठ नेत्यांनी ह्या मागणीला तीव्र विरोध दर्शविला आणि अपिलाची मागणी मान्य करून घेतली. शांती पटेल सहकाऱ्यांना विश्वासात न घेता परस्पर निर्णय घेतात, ते गुपचुप दिल्लीला कळवितात आणि महाराष्ट्र जनता पक्षाशी मुंबईचा काही संबंध नाही, अशा थाटात वावरतात. मुंबईला वेगळी प्रदेशसमिती देण्याच्या प्रश्नावरून एस्. एम्. जोशींनी तर राजीनामा देण्याची तयारी दाखविली आहे. या प्रश्नावर चर्चा करण्यासाठी परवा मुंबईत रामकृष्ण हेगडे यांच्या निरीक्षणाखाली एक मुंबई–महाराष्ट्र संयुक्त बैठक झाली. हे वार्तापत्र प्रसिद्ध होईल तेव्हा ह्या वादाचा बहुतेक सोक्षमोक्ष लागलेला

असेल. मुंबईत ही बैठक झाली. तेव्हा अनुशासनसमितीने नारायण तावडे, रुस्तुम तिरंदाज प्रभृती विधानसभा निवडणुकीत बंडखोरी करण्याबाबत केलेल्या कारवाईवर चर्चा झाली. या समितीने या कार्यकर्त्यांना काही वर्षे कोणत्याच निवडणुकीचे तिकीट न देण्याची सूचना केली आहे. याबाबत केंद्रीय नेत्यांनी एस्. एम्. जोशींना त्यांचं मत विचारलं तेव्हा एस्. एम्. जोशी म्हणाले की, 'माझं मत मी कार्यकारिणीशी विचारविनिमय करून प्रकट करीत असतो. माझी व शांती पटेलांची कार्यपद्धती निराळी आहे!' एस्. एम्. जोशींचे हे उद्‌गार शांती पटेलांना चांगलेच झोंबले व पुढे, किंचित शाब्दिक चकमक झाली, असं बैठकीला हजर रहाणाऱ्यांनी सांगितलं.

शांती पटेलांच्या या कार्यपद्धतीला विरोध करण्यासाठी कोणत्याही एका नव्हे तर सर्वच घटकपक्षांचे नेते एकत्र आले आहेत. केंद्राच्या हस्तक्षेपामुळे शांती पटेलांचे बरेच डावपेच उधळले गेले आहेत. निदान यापुढे तरी सर्वांना बरोबर घेऊन शांती पटेल काम करतील अशी आशा असली तरी त्यांची चंद्रशेखरांनी अध्यक्षपदी केलेली नेमणूक फारशी शहाणपणाची ठरली नाही, हेच यावरून सिद्ध झाले आहे.

मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत कोण कोणत्या पक्षात युती होणार, हे अद्याप स्पष्ट झालेलं नाही. शिवसेनेशी युती करण्यास कोणीच उत्सुक नाही. शरद पवार गटाची भूमिका अद्याप अस्पष्टच आहे. सांगण्यासारखी अशी बातमी एकच व ती म्हणजे सुधीर आणि मनोहर जोशी, प्रमोद नवलकर हे शिवसेनेचे बुजुर्ग नेते पालिकेची निवडणूक लढविण्यास सध्या तरी उत्सुक नाहीत! □

## □ गणेशोत्सव – काही उल्लेखनीय

'गणेशचतुर्थीला'ला सार्वजनिक उत्सवाचं स्वरूप येऊन खूप वर्षे लोटली असली तरी गणेशोत्सवातले कार्यक्रम किंवा सजावट इ. कोणत्याच बाबतीत जाणवावेत असे गुणात्मक बदल घडलेले नाहीत. पुणं काय नि मुंबई काय! त्याच त्या मिरवणुका, तेच ते बेहोष नाच, कानठळ्या बसविणाऱ्या त्याच त्या रेकॉर्डस् अशा जुन्या स्वरूपात, मागील पानावरून पुढे, असाच सगळा प्रकार! त्यात पुन्हा अलीकडे गणेशोत्सवांच्या 'बजेट'चा प्रश्न प्रतिष्ठेचा बनला आहे. त्यामुळे प्रचंड खर्च करून आरास करण्यात गणेशोत्सव मंडळांची अहमहमिका असते. कमी खर्चाचे गणेशोत्सव हे फक्त काही झोपडपट्ट्यांतूनच आढळले.

सजावटीच्या बाबतीत उल्लेखनीय गणपती लालबाग, माटुंगा रेल्वेस्टेशन, घाटकोपर, चिंचपोकळी या भागात आढळले. सर्वच ठिकाणी भपकेबाज रोषणाई होती तर एके ठिकाणी केवळ मूर्तीसाठीच दहा हजार खर्च केल्याचं समजलं. लालबाग मार्केट गणेशोत्सवानं मात्र पहिले पाच दिवस ऐतिहासिक आणि नंतरचे पाच दिवस राजकीय देखावे सादर करून नाविन्यपूर्णता आणली होती. ग. दे. आंबेकर मार्गावरील एका गणेशोत्सवात, 'सत्यम् शिवम्...' मधील एक दृश्य दाखविण्यात आलं होतं. राजकीय, ऐतिहासिक देखाव्यांची जागा आता चित्रपटदृश्ये घेणार याचीच ही चाहूल!

गणेशोत्सवातल्या सजावटीत जसे नाविन्य कमी तसंच कार्यक्रमातही. त्यातल्या त्यातं उल्लेखनीय असा कार्यक्रम म्हणजे आदर्श नगर वरळी गणेशोत्सवात वक्तृत्वोत्तेजक सभेने सादर केलेला चक्री व्याख्यानाचा कार्यक्रम. प्रभादेवीच्या महापालिका वसाहतीत व्यंग चित्रांच्या प्रात्यक्षिकाचा कार्यक्रमही नाविन्यपूर्णतेमुळे गाजला. फार थोड्या ठिकाणी परिसंवाद, कथाकथन, असे कार्यक्रम झाले. अशापैकीच एक म्हणजे गिरगावातील मेहेंदळे बिल्डिंगमध्ये पत्रकार अप्पा पेंडश्यांनी रंगविलेल्या, 'आमच्या वेळची मुंबई' या विषयावरील गप्पा!

पुण्यातल्या केसरीवाडा किंवा दगडू हलवाई गणेशोत्सवाची आठवण करून देईल असा गणेशोत्सव म्हणजे मुंबईच्या ब्राह्मणसभेचा. १८८८ साली ह्या संस्थेची स्थापना झाली आणि १९१८ पासून इथे गणेशोत्सव सुरू आहे. चालू वर्ष या संस्थेच्या हीरक-महोत्सवी गणेशोत्सवाचे! गिरगावात या संस्थेची स्वतःची इमारत आहे. गणेशोत्सवाखेरीज संस्कृत नाटकांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी संस्कृत नाट्यमहोत्सव, एक समृद्ध ग्रंथालय, एक व्यायाममंदीर, एरवीच्या महिला मंडळांपेक्षा खूप चांगलं काम करणारी महिला शाखा, एक सुसज्ज दवाखाना आणि सूतिकागृह असा मोठा व्याप या संस्थेचा आहे. गेल्या साठ वर्षांत गणेशोत्सवातही काही चांगल्या प्रथा-परंपरा या संस्थेने निर्माण केल्या आहेत. गणेशोत्सवाच्या उद्‌घाटनाला नेहमी महापौरांना बोलावण्यात येतं. बृहन्मुंबईत या संस्थेचे नऊ हजार सदस्य आहेत. त्यांपैकी दूर अंतरावर रहाणारे साडेचार हजार सोडले तर संस्थेचे कार्यकर्ते अन्य सर्वांना घरी जाऊन गणेशोत्सवाची निमंत्रणे समक्ष देतात. साधारणतः सकाळपासून रात्रीपर्यंत इथे दिवसभर कार्यक्रम होत असतात. सकाळी लहान मुलांसाठी व्यायामप्रकार आणि पाठांतरांच्या स्पर्धा होतात. दुपारी महिलांसाठी चर्चा, भाषणं किंवा गायनाचे कार्यक्रम होतात. संध्याकाळी सर्वांसाठी म्हणून भाषणांचे जाहीर कार्यक्रम आणि रात्री नाट्य–गायनादि मनोरंजन असं सर्वसाधारण वेळापत्रक असतं.

पं. मदनमोहन मालवीय, न. चिं. केळकर, श्री. कृ. कोल्हटकर, स्वातंत्र्यवीर सावरकर, माधवराव अणे, डॉ. आंबेडकर, काकासाहेब गाडगीळ अशा नामवंतांनी ब्राह्मणसभेच्या व्यासपीठावर हजेरी लावली आहे. संगीताच्या क्षेत्रातील पाध्येबुवा, विनायकराव पटवर्धन, बालगंधर्व, मा. कृष्णराव, पं. बखले, नारायणराव व्यास इ. पासून राम मराठे, रजनी जोशी इ. पर्यंत अनेकांचे कार्यक्रम ब्राह्मणसभेच्या गणेशोत्सवात झाले आहेत. यांपैकी बहुतेक कार्यक्रम आम जनतेसाठी खुले असतात, हे आणखी एक विशेष!

ब्राह्मणसभेच्या या वर्षीच्या कार्यक्रमपत्रिकेत रा. सू. गवई यांचं आंबेडकरांवरील भाषण, 'क्रिकेटक्षेत्रातील तीन पिढ्या' या विषयावर बापू नाडकर्णी, चंदगडकर, सुरेश सरैय्या, पॉली उम्रीगर इ. नी रंगवलेला परिसंवाद, महापालिका, बेस्ट, मध्य आणि पश्चिम रेल्वे व एस्. टी.च्या जनसंपर्क अधिकाऱ्यांची जनतेशी चर्चा आणि आकाशवाणीच्या 'पुन्हा प्रपंच'च्या कलाकारांचा एक कार्यक्रम असे खूपच विविधतापूर्ण कार्यक्रम होते.

ब्राह्मणसभेच्या कार्यक्रमांसाठी व्यवस्थाही अगदी चोख असते. श्रोत्यांच्या पादत्राणांची काळजी घेण्यासाठी स्वयंसेवकांची फौज

नेहमी तयार असते. हाच चोखपणा हिशेबाच्या बाबतीत. 'ज्या दिवशीचा हिशेब त्याच दिवशी ९·३० च्या आत पूर्ण झाल्याशिवाय कार्यकर्ते झोपत नाहीत,' असं संस्थेच्या एका पदाधिकाऱ्यानं सांगितलं.

ब्राह्मणसभेसारख्या ज्ञातिसंस्थांचे कार्यक्रम जसे गाजतात तसेच बोरिवली, अंधेरी, कुर्ला, मुलुंड या उपनगरांतले सार्वजनिक कार्यक्रमही उदंड उत्साहात पार पडतात. कानडी, तामिळी, गुजराती, बंगाली सगळे लोक आरतीपासून विसर्जनापर्यंत सगळ्या कार्यक्रमांत मराठी मंडळींइतकाच उत्साह दाखवतात. फार काय, पण जुहू–पार्ले भागात एका गणेशोत्सवमंडळाच्या अध्यक्षपदी एक मुस्लीम नागरिकही आहे ! सोसायट्या, चाळी आणि झोपडपट्ट्या सर्वच ठिकाणी सारख्याच उत्साहात पार पडलेला असा हा खराखुरा 'लोकोत्सव !' □

## □ एअर इंडियाची पंचवीस वर्षे

'टाटा एअरलाइन्स' या नावानं १९३२ मध्ये सुरू झालेल्या भारतातील पहिल्या हवाईवाहतूक कंपनीच्या राष्ट्रीयीकरणाला म्हणजेच 'एअरइंडिया' या सरकारी कंपनीच्या स्थापनेला गेल्याच महिन्यात २५ वर्षे पूर्ण झाली आहेत.

भारतातील हवाईवाहतुकीचा इतिहास १९११ पासून सुरू होत असला तरी, १९३२ मध्ये जे. आर. डी. टाटा यांच्या प्रयत्नांनी सुरू झालेल्या टाटा एअर लाइन्स या कंपनीच्या स्थापनेनंतरच नियमित हवाईवाहतूक सुरू झाली. सुरुवातीच्या काळात देशातील विमानतळांची स्थिती भयानक असताना आणि आधुनिक साधनांचा अभाव असताना कराची–अहमदाबाद आणि मुंबई–मद्रास मार्गावर विमानसेवा सुरू करून टाटांनी मोठा धाडसी निर्णय घेतला. ह्या काळात–उदाहरणार्थ १९३३ साली– विमानवाहतुकीला खूप कमी प्रतिसाद मिळाला आणि वर्षभरात विमानाने प्रवास करणारांची संख्या एकूण १५५ पेक्षा जास्त भरली नाही ! मात्र सरकारी टपालवाहतुकीसाठी विमानसेवा बहुमोल कामगिरी बजावत होती. १९३३ या एका वर्षात १०·१७ टन टपालाची ने–आण टाटा एअर लाइन्सने केल्याची नोंद आहे.

१९३३ साली टाटांनीच इंडियन नॅशनल एअरवेज नावाची आणखी एक कंपनी सुरू केली. १९३८ साली ब्रिटिश सरकारने सरकारी हवाई-टपालसेवा सुरू केल्यामुळे या दोन्ही कंपन्यांना पुरेसं काम सहज उपलब्ध झालं.

दुसऱ्या महायुद्धात मात्र या दोन्ही कंपन्यांची परिस्थिती खूपच खालावली. या कंपन्यांची विमानं सरकारने युद्धासाठी ताब्यात घेतल्यामुळे कंपनी मालकांना आर्थिक तोशीस सहन करावी लागली. महायुद्धानंतर सबंध जगातच विमानवाहतुकीचा व्यवसाय तेजीत सुरू झाल्याचा फायदा या दोन भारतीय कंपन्यांना मिळतो न मिळतो तोच १९४६ मध्ये एकवीस विदेशी कंपन्यांनी भारतात हवाईवाहतूक सुरू केल्याने पुन्हा एकदा देशी कंपन्यांना स्पर्धेत टिकून राहण्यासाठी आर्थिक तोटा सहन करावा लागला.

महायुद्धानंतर कंपनी सार्वजनिक स्वरूपाची करण्यात आली; पण तरीही आर्थिक स्थिती सुधारण्याची चिन्हे नव्हती. याच वेळी, १९५३ मध्ये भारत सरकारने ह्या कंपनी ताब्यात घेऊन एअर इंडिया आणि इंडियन एअर लाइन्स या अनुक्रमे आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रांतर्गत विमानवाहतूक कंपन्यांची स्थापना केली.

राष्ट्रीयीकरणाच्या वेळी ह्या कंपनीची, नैरोबी आणि लंडन, या ठिकाणीच फक्त विमानसेवा सुरू होती. आज मात्र हाँगकाँग, न्यूयॉर्क, मॉस्को, टोकियो, सिडने, कुवेत, मॉरिशस, जेद्दाह, बगदाद या सर्व प्रमुख शहरांसाठी 'एअर इंडिया'ची सेवा उपलब्ध आहे.

राष्ट्रीयीकरणापूर्वी 'एअर इंडिया'ची जगात केवळ चार कार्यालयं होती. आज ही संख्या दीडशेपेक्षा अधिक आहे. १९५३ मध्ये विमानांची संख्या अवघी चार होती, आज 'एअर इंडिया' कडे विविध जातींची बावीस विमानं असून त्यातील सहा बोइंग ७४७ विमानांचा ताफा, हे 'एअर इंडिया'च्या प्रवाशांचं विशेष आकर्षण ठरलं आहे. आंतरराष्ट्रीय विमानसेवा म्हणजे जगातील मुख्यतः व्यापारी उलाढालींच्या नाड्या बनल्यामुळं राष्ट्रीयीकरणानंतर 'एअर इंडिया'ची आर्थिक स्थिती उत्तरोत्तर सुधारत गेली आहे. आज 'एअर इंडिया'चे वार्षिक आर्थिक व्यवहार सुमारे १३३ कोटी रुपयांचे असून २१२ कोटी रुपयांची मालमत्ता 'एअर इंडिया' बाळगून आहे.

'एअर इंडिया'च्या अंदाजपत्रकातील नफ्याचे आकडे देखील प्रतिवर्षी फुगत गेले आहेत. अलीकडच्या चार-पाच वर्षांत तर नफ्यामधील ही वाढ वेगानं होत आहे. १९७६–७७ मध्ये कंपनीला १७·५९ कोटी रु. नफा झाला, तर १९७७–७८ मध्ये नफ्याचा आकडा २८·४५ कोटींवर गेला. हवाईवाहतूक करणाऱ्या जगातील फार थोड्या कंपन्यांना एवढा नफा होत असतो. ही वस्तुस्थिती लक्षात घेतली तर, 'एअर इंडिया'च्या आर्थिक यशाचं महत्त्व अधिकच पटतं.

देशात सरकारी मालकीच्या (सार्वजनिक क्षेत्रातील) ज्या काही कंपन्या काम करीत आहेत त्यांच्याशी तुलना करता 'एअर इंडिया'ची ही प्रगती विशेष नजरेत भरणारी ठरते. राष्ट्रीयीकरणानंतरही एखाद्या कंपनीच्या कामाचा दर्जा सुधारू शकतो याचं उदाहरण म्हणजे 'एअर इंडिया' ! अर्थात, एअर इंडियाच्या या प्रगतीला अनुकूल परिस्थिती हे एक महत्त्वाचं कारण आहे.

भारतातील पर्यटकांच्या संख्येत वाढ होण्यासही एअर इंडिया मुख्यत्वे कारणीभूत आहे. जगाच्या विविध भागांतील पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी 'ऑपरेशन युरोप'सारख्या मोहिमा आखून आणि 'हॉटेल कॉर्पोरेशन ऑफ इंडिया' या सहयोगी कंपनीची स्थापना करून एअर इंडियाने, भारताच्या विदेशी चलनाच्या गंगाजळीत मोलाची भर टाकली आहे.

केंद्रीय हवाईवाहतूक मंत्रालय देशांतर्गत विमानवाहतुकीत छोटी शहरे जोडण्याकरिता आणखी एका छोट्या विमानकंपनीच्या विचारात आहे. मध्यंतरी दुष्काळी कामाचा एक भाग म्हणून धुळे, कोल्हापूर आणि इतरही काही शहरांतून विमानांसाठी धावपट्ट्या बांधण्यात आल्या होत्या. सध्या ही तिसरी विमानकंपनी अस्तित्वात आली तर, या धावपट्ट्या जरूर उपयोगात येतील. महाराष्ट्रात मुंबई–रत्नागिरी विमानवाहतूक करणाऱ्या 'गोल्डन एव्हिएशन' या कंपनीला या व्यवहारात कल्पनातीत फायदा झाला आहे. नाशिक, सोलापूर, कोल्हापूर, औरंगाबाद, नागपूर, नांदेड या औद्योगिकदृष्ट्या विकसनशील शहरांनाही या तिसऱ्या विमानकंपनीचा निश्चितच फायदा होईल. शिवाय महाराष्ट्र पर्यटनाच्या दृष्टीने विकसित होईल ते वेगळच ! □

# पक्षांतर

## बिल मागे घेतले पण प्रश्न कायम

वा. दा. रानडे

पक्षांतरबंदीचे बिल जनता सरकारला मधु लिमये यांच्यासारख्या स्वपक्षीय प्रमुख नेत्यांनीच विरोध केल्याने मागे घ्यावे लागले; पण बिल मागे घेतले म्हणून प्रश्न संपत नाही हे गोवा आणि पाँडिचरीतील अलीकडच्या घटनांनी पुनः एकदा स्पष्ट झाले आहे. आपल्या लोकशाहीला लागलेली ही कीड समूळ नष्ट करायला हवी; पण या प्रश्नाबद्दल तेवढी आस्था आणि निकड जनता पक्षाच्या नेत्यांना वाटत आहे असे दिसत नाही. तसे असते तर आम्ही लवकरच दुसरे बिल पुढे आणू असे आश्वासन सरकारने दिले असते. आता हे बिल नजीकच्या भविष्यकाळात संसदेपुढे येण्याची शक्यता दिसत नाही.

बिल मागे घण्याची नामुष्की सरकारला पत्करावी लागली याला जबाबदार कोण ? मधु लिमये यांच्यासारख्या प्रमुख नेत्याने विरोध केला नसता तर बिल गृहापुढे सादर झाले असते हे उघड आहे. बिलाला विरोध करताना केलेल्या भाषणात लिमये यांनी दोन महत्त्वाचे मुद्दे उपस्थित केले.

"हुकूमशाहीविरुद्ध आणि पक्षश्रेष्ठींच्या हुकमतीविरुद्ध ( बॉसिझमविरुद्ध ) आमचा लढा आहे" असे त्यांनी सांगितले. त्यांचा रोख बिलातील मुख्यतः एका तरतुदीविरुद्ध होता. पार्लमेंटपुढे किंवा राज्यविधिमंडळापुढे चर्चेसाठी आलेल्या बिलावर किंवा त्यातील काही कलमांवर पक्षनेत्याच्या आदेशाविरुद्ध मतदान करणे याचाही समावेश पक्षांतरात करून त्याबद्दल त्याचे सभासदत्व रद्द करण्याची तरतूद या बिलात केलेली होती. मधु लिमये यांनी या तरतुदीला केलेला विरोध योग्यच होता. एखाद्या पक्षाच्या तिकिटावर निवडून येऊन नंतर त्या पक्षाचा राजिनामा देणे हे पक्षांतर यात वाद नाही; पण एखाद्या बिलाला किंवा त्यातील काही कलमांना पक्ष-आदेशाविरुद्ध विरोध करणे याला पक्षांतर कसे म्हणता येईल ? पक्षातील शिस्तीचा हा प्रश्न असून त्याबद्दल पक्षाच्या शिस्तपालन-समितीने कारवाई करणे योग्य ठरेल. पक्षात शिस्त हवी याबद्दल वाद नाही. बेशिस्ती-विरुद्धही कारवाई करायला हवी; पण एखाद्या बिलातील तरतुदीबाबत पक्षात मोठे मतभेद असतील तर सभासदांना मतस्वातंत्र्य मिळायला हवे. ब्रिटनमध्ये मजूर पक्षाने सामुदायिक बाजारपेठेच्या प्रश्नावर आपल्या सभासदांना मतस्वातंत्र्य दिले होते. महत्त्वाच्या प्रश्नांच्या बाबतीत सभासदांना असे मतस्वातंत्र्य मिळायला हवे. मतस्वातंत्र्य आणि पक्षशिस्त यात योग्य तोल राखण्याचा हा प्रश्न आहे. पक्षाच्या योग्य विकासासाठी या दोन्ही गोष्टी आवश्यक आहेत; पण दोन्ही बाबतीत अतिरेक टाळायला हवा. त्यासाठी पक्षांतर्गत लोकशाही रुजायला हवी.

काँग्रेसमध्ये पक्षांतर्गत लोकशाहीच्या प्रथा डावलल्या गेल्याचे पर्यवसान आणीबाणीत आणि इंदिरा गांधींच्या हुकूमशाहीत झाले; पण जनता पक्षात तरी अंतर्गत लोकशाही पाळली जात आहे का ? मधु लिमये यांनी अंतर्गत लोकशाहीचा उल्लेख केला नाही; पण त्यांचा दुसरा मुद्दा या संबंधातच होता. पक्षांतर बंदी बिल लोकसभेत मांडले जाण्यापूर्वी त्यावर चर्चेची संधी जनता पक्ष सभासदांना मिळायला नको होती का ? बिल ज्या दिवशी मांडले जाणार त्याच दिवशी सकाळी घाईघाईने कार्यकारिणीची बैठक बोलावून बिलास मंजुरी घेण्यात आली. मधु लिमये कार्यकारिणीत अल्पमतात असले तरी संसदीय पक्षातील बहुसंख्य सभासद आपल्या बाजूला आहेत याची त्यांना खात्री होती म्हणूनच लोकसभेत त्यांनी बिलास विरोध केला व सरकारला ते मागे घेणे भाग पडले.

सरकार आणि विरोधी पक्षनेते यांच्या बैठकीत पक्षांतर बिलाबाबत एकमत झाले होते असे सरकारतर्फे सांगण्यात आले. याबाबत वस्तुस्थिती काय होती ? सरकार व विरोधी पक्षनेत्यांच्या बैठकीची जी बातमी वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाली होती त्यात एकमत कोणत्या गोष्टीवर झाले आणि बिलाच्या मुख्य तरतुदी काय असतील हेही दिलेले होते. प्रश्न असा उपस्थित होतो की, लिमये यांनी त्याच वेळी या तरतुदींना आपला विरोध का दर्शविला नाही ? बिलाला विरोध करण्याची जी भूमिका त्यांनी घेतली ती पक्षातील नंतरच्या घटनांमुळे घेतली असावी काय असाही विचार मनात येतो. बिलावर एकमत झाले या बातमीबद्दल विरोधी पक्षनेत्यांनीही त्या वेळी विरोधी प्रतिक्रिया व्यक्त केली नव्हती हे लक्षात घेतले पाहिजे.

महाराष्ट्रात शरद पवार गटाला काँग्रेसमधून फोडून दोन्ही काँग्रेस पक्षांच्या आघाडीचे मंत्रिमंडळ पाडण्याचा बनाव जनता पक्षनेत्यांनी घडवून आणला. त्यानंतर पक्षांतर बंदी बिलाबाबत इंदिरा काँग्रेसने आपली भूमिका बदलली व या बिलाला आम्ही पाठिंबा देणार नाही असे स्टीफन यांनी जाहीर केले. बिलाला तत्त्वतः आमचा पाठिंबा आहे; पण प्रत्यक्ष तरतुदी पाहून पक्षाचे धोरण ठरवू अशी भूमिका यशवंतराव चव्हाणांनी घेतली आणि जरूर तर विरोधाचा मार्ग मोकळा ठेवला.

बिलाला पक्षात जोरदार विरोध आहे याची कल्पना पंतप्रधान मोरारजीभाईंना नव्हती असे कसे म्हणता येईल ? तरीही बिल आणण्याचा निर्णय त्यांनी का घेतला ? या अधिवेशनात बिल मांडण्याचे आश्वासन त्यांनी दिलेले होते व म्हणून बिल मांडले हे खरे; पण त्यातील तरतुदी पक्षसभासदांपुढे विशद करून त्यांचा पाठिंबा मिळविण्याचा प्रयत्न का केला गेला नाही ? की बंडखोर सभासदांना शिस्त लावून पक्षात राखण्यासाठी बडग्यासारखा उपयोग त्यांना या बिलाचा करावयाचा होता ? इंदिरा गांधींनी पक्षांतर बंदीचे बिल ज्या उद्देशाने आणले होते त्याच उद्देशाने मोरारजीभाईंनीही ते आणले काय ? अशी शंकाही यासंबंधात व्यक्त केली गेली. दोन्ही बिलांतील तरतुदी या दृष्टीने एकमेकांशी बऱ्याच जुळत्या आहेत. पक्षांतराची व्याख्या दोन्ही बिलांत जवळजवळ सारखीच आहे. पक्षनेत्याचे आदेशाविरुद्ध मतदान करणे याला दोन्ही बिलांत पक्षांतर ठरविले आहे आणि पक्षांतरित सभासदांचे लोकसभेचे किंवा विधानसभेचे सभासदत्व रद्द करावे ही तरतूदही दोन्ही बिलांत आहे. काँग्रेसमध्ये बंडखोरी वाढत चालली होती तेव्हा विरोध केलात तर तुमची आमदारकी-खासदारकीच रद्द होईल असा बडगा दाखवून बंडखोरांना पक्षात राखावे हा इंदिरा गांधींचा त्या वेळी उद्देश होता. जनता पक्षामध्येही बंडखोरी वाढत आहे. ती रोखण्यासाठीच विरोधी मतदान करणे म्हणजे पक्षांतर ही तरतूद या बिलात करण्यात आली होती काय ?

बिलाचा फेरविचार करताना ही तरतूद काढून टाकायलाच हवी आणि समजा या तरतुदीसह बिल पास झाले तरी त्याच्या कायदेशीरपणास कोर्टात आव्हान केले गेल्यास ते कितपत टिकेल याची शंका आहे. कारण मतस्वातंत्र्याच्या हक्कावरच तो घाला आहे. पक्षांतर करणाऱ्या सभासदाने राजिनामा देऊन नव्या पक्षाच्या तिकिटावर निवडून येणे, नव्या पक्षात त्याला एक दोन वर्षे कोणतेही महत्त्वाचे अधिकारपद किंवा मंत्रिपद न देणे, मंत्र्यांची संख्या मर्यादित करणे हेच पक्षांतराला आळा घालण्याचे खरे परिणामकारक मार्ग आहेत. □

# चीनशी मैत्री 'गृहीत' धरणे आत्मघातक ठरेल

राजन दातार

जनता पक्षाच्या एकंदर भोंगळ कारभारात जी काही थोडी खाती खरोखरच व्यवस्थित काम करीत आहेत, त्यात परराष्ट्रखाते आहे. श्री. बाजपेयी व श्री. समरेन्द्र कुन्डू हे दोघेही आपापले काम व्यवस्थित रीतीने हाताळताना दिसतात. पाकिस्तानला दिलेल्या यशस्वी भेटीने परराष्ट्रमंत्र्यांकडून अपेक्षा उंचावल्या आहेत; परंतु त्यांच्या मुत्सद्देगिरीची खरी कसोटी लागणार आहे ती त्यांच्या चीन-भेटीच्या वेळी.

चीन भारताचा सर्वांत मोठा शेजारी. लाल क्रांतीनंतर चीनने केलेली प्रगती वाखाणण्याजोगी आहे. नुसत्या आर्थिक बाबतीतच नव्हे, तर सामाजिक व सैनिकी बळसुद्धा चीनने फारच वाढविले आहे. काही वर्षांपूर्वीचे अफूच्या नशेत गुंग असलेले चिनी व आजचे सकाळी नऊच्या भोंग्याला कामासाठी बाहेर पडणारे चिनी ते हेच का, अशी शंका उत्पन्न करणारी शिस्त आज त्या देशात पाहावयास मिळते.

चीनच्या सैनिकी सामर्थ्याची चुणुक आपल्याला आलीच आहे. १९६२ च्या युद्धाच्या वेळी आपले सैन्य किती तुटपुंजे आहे व जुनाट शस्त्रास्त्रांनी लढते आहे याची जाणीव झाली. आज लाल सैनिक जगाच्या दृष्टीने जरी अत्याधुनिक शस्त्रांनी सुसज्ज नसला, तरी भारताला निश्चितच शह देऊ शकतो. आज चीनचे जवळजवळ दहा कृत्रिम उपग्रह अवकाशात भ्रमण करीत आहेत. चीनजवळ स्वत:चा अणुबॉम्ब व हायड्रोजन-बॉम्बसुद्धा आहे. अणुविज्ञानाच्या बाबतीत चिनी सरकार कोणाच्या दडपणाखाली येणार नाहीच, शिवाय मध्यम पल्ल्याची क्षेपणास्त्रेसुद्धा आता चीनजवळ आहेत. अशा परिस्थितीत भारतासमोर दोन पर्याय राहतात : (१) शांततामय सह-अस्तित्व व (२) स्वत: शक्तिशाली होऊन या बलाढ्य शेजाऱ्यापासून स्वत:चे संरक्षण करणे.

## शांततामय सह-अस्तित्व-काही अडथळे

भारताने पंचशीलच्या तत्त्वावर चीनशी संबंध-सुधारणा केली असली तरी, त्यामध्ये बऱ्याच अडचणी आहेत. पहिली अडचण म्हणजे चीनची सैनिकी शक्ती. वर म्हटल्याप्रमाणे चीनकडे आता अचूक मारा करणारी, मध्यम पल्ल्याची, कित्येक अण्वस्त्रे घेऊन जाणारी (Multiple Warhead) क्षेपणास्त्रे आहेत. ह्या क्षेपणास्त्रांचे वाहक-तंत्रज्ञान (Delivery System) अत्यंत प्रगत राष्ट्रांइतके प्रभावशाली आहे. याचाच अर्थ असा की, भारताची अत्यंत सुपीक अशी गंगेची सपाटी ह्या क्षेपणास्त्रांच्या पल्ल्यात येते. म्हणजेच भारताचे जीवन काही क्षणांत विस्कळित करण्याचे सामर्थ्य आज चीनपाशी आहे. शिवाय, असा हल्ला झालाच तर त्यापासून संरक्षण मिळण्याचे काहीही उपाय आपल्याकडे केलेले नाहीत. याउलट चीनमध्ये नागरी संरक्षणाची कवायत प्रत्येकास अनिवार्य असते. अण्विक अस्त्रांचा हल्ला झाला तरी काही मिनिटांतच खंदकात जाण्याची सोय सर्व प्रमुख चिनी शहरांत उपलब्ध आहे.

चीनच्या पायदळाच्या शक्तीची गणना न केलेलीच बरी. 'समुद्र-युद्ध' खेळण्याची पाळी त्यावर आली तरी चीनकडे आज तेवढी माणसे आहेत. त्यांच्याकडील शस्त्रास्त्रे जरी फारशी आधुनिक नसली तरी त्यावर सुधारणा करण्याचे काम वेगाने सुरू आहे. अशा परिस्थितीत, चीनशी मैत्री गृहीत धरणे आत्मघातक ठरेल.

पाकिस्तानशी चीनचे संबंध नेहमीच सलोख्याचे राहिलेले आहेत. भारत-पाक-युद्धाच्या वेळी चीन पाकिस्तानच्या मागे खंबीरपणे उभा राहिलेला आहे. आता तर काराकोरमच्या 'रेशमी धाग्यामुळे' ही दोन राष्ट्रे एकमेकांच्या अधिकच जवळ आली आहेत. काराकोरमचा ८०५ कि. मी. हा हमरस्ता रावळपिंडी व चीनच्या सोनकी-आँग प्रदेशांना जोडतो. हा मुख्यत: एक सैनिकी हमरस्ता आहे. त्याचा उपयोग जड वाहनांकरितासुद्धा करता येऊ शकेल. पाकिस्तानचे मुख्य मार्शल लॉ प्रशासक मुहम्मद झिया उल् हक् यांनी या रस्त्याचे व्यापार व आर्थिक फायदा वाढविण्यास उपकारक, असे वर्णन केले असले तरी ती निव्वळ धूळफेक आहे. चीनमध्ये झालेल्या प्रचंड भूकंपानंतरचे पुनर्वसनाचे काम अजूनही अपुरे असताना चीनला एवढा मोठा उपद्व्याप करण्याचे एकच कारण असू शकते काराकोरमच्या संपूर्ण २००० चौरस कि. मी. प्रदेशामध्ये मुक्त प्रवेश. तत्कालीन विचार करता एवढा त्रास घेण्याचे चीनला काहीच कारण नव्हते; परंतु भविष्यात चीन-रशिया युद्धाची शक्यता दोन्ही देश नाकारीत नाहीत. अशा परिस्थितीत रशिया विरुद्ध पाकिस्तानला केव्हाही उभे करून भारताला शह द्यावयाचा असा दूरगामी विचार चिनी नेत्यांनी केलेला असणार. विशेष महत्त्वाची बाब म्हणजे हा रस्ता मुख्यत: पाकव्याप्त काश्मीरमधून मार्गक्रमण करून खशगर (चीन) व गिलगिट यांना जोडतो. यामुळे चीनला अरबी समुद्राला थेट रस्ता मिळाला आहे. या रस्त्याचे वैशिष्टच म्हणजे हा सर्व हवामानांमध्ये खुला राहणार आहे. म्हणजेच जेव्हा हवाई वाहतूक शक्य नसेल तेव्हा या रस्त्याचा उपयोग अत्यंत प्रभावशालीपणे करता येईल.

हा रस्ता पाकव्याप्त काश्मीरमधून जात असल्याकारणाने त्याबाबत भारताने दखल घेणे स्वाभाविकच होते. जरी औपचारिक निषेध नोंदविला नसला, तरी चिनी राजदूत चेन चाड युआन व पाकचे चार्ज दि अफेअर्स शहीद जमीन यांना परराष्ट्र मंत्रालयात बोलावून सचिव श्री. जगत मेहता यांनी 'या रस्त्याचे काम भारता-

वर कोणत्याही–नैतिक, कायदेशीर वा आर्थिकदृष्ट्या बंधनकारक राहणार नाही,' अशी स्पष्ट कल्पना दिली. पाकिस्तानने या निषेधाचा स्पष्ट शब्दांत अस्वीकार केला आहे. चीनने तर तो अव्हेरलाच आहे. आजपर्यंत त्यांच्याकडून सरकारीरित्या पोचसुद्धा मिळालेली नाही.

## अधिक शक्तिशाली होणे हाच मार्ग

अशा परिस्थितीत भारताने नुसता निषेध करून स्वस्थ बसणे म्हणजे पश्चात्तापाला निमंत्रण देण्यासारखेच आहे. आजचे आपले सैनिकी बळ जरी पाकिस्तानचा विचार करता जेमतेम पुरेसे असले तरी निःपक्षदृष्टीने पाहिले असता चीनशी युद्ध झालेच तर ते आपल्याला फार महागात पडेल यात शंका नाही.

आज भारतापाशी असलेले विमानदल मिग–२९ च्या स्क्वाड्रन सोडता फारच जुनेपुराणे झाले आहे. १९६५ व १९७१ च्या युद्धांमध्ये आपला हवाईयुद्धात विजय होण्याचे मुख्य कारण म्हणजे आपल्या वैमानिकांची कमाल! नॅट् हे विमान तर आता मोडीत काढण्याच्याच लायकीचे झाले आहे. कारण जर डी. पी. एस्. ए. ( Deep Penetration Strike Aircraft ) विकत घ्यायचा निर्णय झालाच तर नॅट् विमानांचा उपयोग शैक्षणिक कामाकरिता करणेसुद्धा अशक्य आहे.

डी. पी. एस्. ए. च्या बाबतीत अजून काहीही निर्णय झालेला नाही. जनता पक्षातील अंतर्गत भांडणामुळे मंत्रिमंडळाच्या संरक्षणखात्यासाठी असलेल्या उपसमितीची बैठक अजून होऊ शकलेली नाही व श्री जगजीवनराम तर हल्ली, 'महत्त्वाच्या' कामात इतके व्यग्र आहेत की, विभागीय कमांडर्सच्या बदल्या करण्याचे कागद दोन महिन्यांपासून त्यांच्या सहीची वाट पहात बाजूला पडले आहेत. तरी, डी. पी. एस्. ए.च्या बाबतीत भारतासमोर चार विमानांमधून पसंती करण्याचा पर्याय होता. अँग्लो–फ्रेंच 'जाग्वार, फ्रेंच 'मिराज,' स्वीडिश 'विगेन' व रशियन 'फ्लॉगर' या विमानांचा तुलनात्मक अभ्यास केला असता स्वीडिश 'विगेन,' रशियन 'फ्लॉगर' व अँग्लो – फ्रेंच 'जाग्वार' ही विमाने अधिक शक्तिशाली ठरतात. या यादीतून स्वीडिश विगेन आता आपोआपच गळले आहे. कारण विगेन विमानांमध्ये अमेरिकन पेटंटने बनविलेले इंजिन आहे व अमेरिकन परराष्ट्रखात्याने त्याच्या भारतास निर्यातीवर आक्षेप घेतला आहे. अमेरिकेच्या दुटप्पी धोरणाचा हा आणखी एक नमुना. ब्रिटिश रोल्स रॉइस कंपनीने काही महिन्यांपूर्वीच चीनला शंभर जेट इंजिने विकली, तेव्हा अमेरिकन परराष्ट्रखात्याने त्याला अजिबात आक्षेप घेतला नाही. रशियन 'फ्लॉगर' विमान घेतल्यास एकच फायदा आहे. आपल्याकडे मिग–२१ विमाने बनविण्याची सोय आहेच. त्यामुळे, जवळजवळ ७५ कोटी रुपयांची नवी यंत्रसामुग्री लावावी लागेल. ही रक्कम इतर विमानांच्या तुलनेने जवळ जवळ १५० कोटी रुपयांनी कमी आहे. 'फ्लॉगर' घेण्यामध्ये एक मोठी जबाबदारी आहे. आज चीन–रशिया या दोन कम्युनिस्ट राष्ट्रांचे संबंध चांगले नसले तरी त्यांना मार्क्सवाद व लेनिनवादाचा केव्हा पुळका येईल हे सांगता येत नाही. अशा परिस्थितीत भारताची अडवणूक करण्यास रशिया मागे–पुढे पहाणार नाही हे इजिप्तला १९७३ मध्ये आलेल्या अनुभवावरून आपण शिकले पाहिजे. अँग्लो–फ्रेंच 'जाग्वार' खरेदी करण्यास हरकत नाही; परंतु त्याची किंमत भारतासारख्या एका विकसनशील राष्ट्राला विचार करायला लावणारी आहे. एच्. ए. एल्.मधील काही मॅनेजर्सनी असा विश्वास व्यक्त केला आहे की, 'जर जाग्वार प्रकल्पाच्या रकमेची अर्धी किंमत आम्हाला दिली तरी येत्या चार–पाच वर्षांत जाग्वारएवढे चांगले विमान आम्ही बनवू.' ही शक्यता जरूर पडताळून पहावी. कारण भारताला आतापर्यंत अनेक वेळा तंत्रज्ञानाकरिता अडविण्यात आले आहे. थोडा अधिक खर्च होऊन सुद्धा जर स्वतःचे तंत्रज्ञान विकसित होणार असेल तर तो मार्ग स्वीकारणे अर्थातच अधिक शहाणपणाचे आहे.

दुर्दैवाने पंतप्रधानांनी आपल्या आण्विक धोरणाच्या बाबतीत उलटसुलट वक्तव्ये करून अपूर्व गोंधळ निर्माण केला आहे. पोखरणचा स्फोट जरी श्रीमती गांधींनी राजकीय उद्देशाने केला होता, तरी त्यांचे धैर्य मान्यच करावे लागेल. हा धोरणात्मक गोंधळ जर वेळेवर संपला नाही तर राष्ट्राची अतोनात, अक्षम्य हानी होईल. शिवाय, चीन व पाकिस्तान ह्यांचे अण्विक क्षेत्रातील सहकार्य वाढणार अशी चिन्हे आहेत. न्यूट्रॉन बॉम्ब बनविण्याचे पाप अमेरिका करीत असताना, आपल्याला शहाणपण शिकविण्याचा नैतिक अधिकार त्यांना पोचत नाही. आपल्याकडे अणुबॉम्ब असल्यावरच आपण त्याच्या प्रसारास निर्बंध घालण्याचा प्रभावशाली प्रयत्न करू शकतो. शक्तीच्या समतोलानेच शांतता टिकू शकते. म्हणूनच आपल्याकडे अणुबॉम्ब असल्यास चीनशी वाटाघाटी करताना आपली स्थिती अधिक मजबूत होईल.

चीनने आपला प्रचंड प्रदेश बळकावला आहे. महत्त्वाची बाब अशी की, बांगलादेश व ब्रह्मदेश यांच्याशी असलेला सीमावाद चीनने एकतर्फी चांगुलपणा दाखवून कायमचा निकालात काढला आहे; परंतु भारताशी वाटाघाटी करताना चीन अतिशय सावधतेने पावले टाकताना दिसतो. या पार्श्वभूमीवर भारतास सीमावाद कणखरपणाने हात ळावा लागणार असे दिसते.

म्हणूनच, परराष्ट्रमंत्र्यांची आगामी चीन–भेट त्यांची कसोटीच ठरणार आहे!

□

पुस्तके

## जनांचा प्रवाहो चालिला

# विचार करायला लावणारे प्रसन्न, प्रांजळ निवेदन

'जनांचा प्रवाहो चालिला–' या पुस्तकाचे अंतरंग म्हणजे लेखकाने आणीबाणीच्या कालखंडात घेतलेल्या अनेकविध अनुभवांचे एक सलग निवेदन आहे. 'सगळं खरं सांगायचं, मोकळेपणाने सांगायचं आणि त्याचा विचार करायचा–' ही हर्डीकरांची त्रिसूत्री आहे. त्यामुळे आपल्या निवेदनाला कोणत्या तरी रूढ वाङ्मयप्रकाराच्या साच्यात बसविण्याच्या प्रयत्नापेक्षा त्यातील अनुभवांचा स्वच्छपणा, स्पष्टपणा जोपासण्याकडे हर्डीकरांनी अधिक लक्ष पुरविल्याचे दिसते.

### रेखीव चित्रण

सत्याग्रहामध्ये प्रत्यक्ष उतरण्यापूर्वीच्या समाजस्थितीचे चित्रण हर्डीकरांनी पहिल्या भागात केले आहे. जून १९७५ च्या सुमारास परिस्थितीच्या कचाट्यात सापडलेले, दिशाहीन, अगतिक जीवन जगणाऱ्या समाजाचे चित्रण हर्डीकरांनी 'खिसे कापणाऱ्यांपासून तो थेट एकएक कागद गोळा करून तो विकून पोट भरणाऱ्यापर्यंत सगळे जगत होते. सगळ्यांनाच 'आज'चा कंटाळा येत होता; पण 'उद्या'ची वाट पहायची सवय लागली होती–' एवढ्याच मिताक्षरीने केली आहे. प्रबोधिनीसारख्या संस्थेशी स्वतःच्या भावना-विचारांचा सहकंप न साधल्यामुळे हर्डीकरांनी सत्याग्रहाचा– प्रत्यक्ष कृतीचा–मार्ग अनुसरला आहे. त्या निमित्ताने आलेले अनुभव सांगताना पोलिस कस्टडी, यरवडा, सत्याग्रही, स्थानबद्ध अशा एक निवेदनक्रम त्यांनी सांभाळलेला दिसतो. 'भरपूर अंधार, जेथळजवळ पंचवीस फूट उंच छप्पर. पिचकाऱ्यांनी, ढेकूण चिरडण्याच्या, थुंकण्याच्या डागांनी रंगविलेल्या भक्कम दगडी भिंती. कोपऱ्यात एक हवा... त्या गळक्या डबक्यातून आमच्या बसायच्या जागेपर्यंत आलेले ओघळ...... शेजारच्या मोरीत पोलिसांचे निरनिराळे विधी... त्याचे नाना आवाज...' हे पोलिस-कस्टडीचे आणि 'थंड कोरडी हवा, चांगलं पाणी, मोकळ्या माळावरचा वारा, चिंचा, लिंबे, काही ठिकाणी कैऱ्या यांची झाडं. डोकं आणि सौंदर्यदृष्टी दोन्ही वापरून बांधलेल्या बरॅक्स...' हे येरवड्याच्या 'छान' तुरुंगाचे वर्णन, हर्डीकरांच्या रेखीव वर्णनाचे दोन नमुने. सत्याग्रही व स्थानबद्ध यांच्या तुरुंगातील राहणीमानातील फरक त्यांनी स्पष्ट केला आहे तो 'स्थानबद्धांचा हेवा करण्यासाठी ह्याची नोंद केलेली नाही–' हे त्यांनी नमूद केले आहे. नारायणगावचा एक मध्यमवर्गीय सत्याग्रही, ६५ वर्षांचे एक सुखवस्तू वकील, कोडितचे समाजवादी म्हातारबुवा, सतत काळा चष्मा लावणारा, तांबडी लुंगी व हिरवा स्वेटर घातलेला व म्हणून खिलोनी कैद्यांसारखा दिसणारा मुलगा, 'आई-वडिलांनी माझा दंड भरला तरी तो स्वीकारू नये!' असे मॅजिस्ट्रेटला लेखी कळविणारा तरुण, बहिणीच्या लग्नाच्या जबाबदारीचे भान असूनही सत्याग्रहात उतरणारा तिचा कुटुंबप्रमुख भाऊ– अशी अनेकविध व्यक्तिदर्शने आपल्याला इथे होतात. विशेष म्हणजे, झोपडपट्टी, विडीकामगार– अशाही स्तरातील व्यक्तींचा यात सहभाग असल्यामुळे, आणीबाणीबद्दलच्या चिडीची धग किती खोलवर गेली होती, हे जाणवते. म्हणूनच, तुलनेने पहाता सत्याग्रहींचे एकत्रित जीवन अधिक एकात्म होते. वय, जात, व्यवसाय, विचार हे भेद तिथे उरले नाहीत. याच्याउलट, भांडणे मिसावाल्यांनी केल्याचे हर्डीकरांनी स्पष्ट सांगून टाकले आहे. गुन्हेगार कैद्यांच्या 'चातुर्वर्ण्या'चा परिचय करून दिल्यावर, सत्याग्रही व स्थानबद्ध यांच्या परस्परसंबंधांबद्दल हर्डीकरांनी विवेचन केले आहे. त्या संदर्भात, 'संघाची मुलंसुद्धा आपण समजतो तेवढी माठाड' नसल्याचे त्यांनी नमूद केले आहे. तसेच, समाजवाद्यांबद्दल सुरुवातीला असणारे गैरसमज पुढे निवळत गेले व कोणत्या तरी वैचारिक पातळीवर समाजवादी व संघ हे एकाच भूमिकेचे असू शकतात– आहेत, याचाही निर्देश त्यांनी केला आहे.

'वंदे मातरम्' प्रकरणाबाबत संघ व अन्य संघटनांच्या अनुयायांचा या गीताकडे पहाण्याचा दृष्टिकोणच स्वतंत्र होता. म्हणून संघ–संस्काराने बहुसंख्य अशा गर्दीत काही समाजवाद्यांनी ते गीत म्हणण्याच्या वेळी निषेधाच्या घोषणा देऊन सभात्याग केला. प्रकरण अर्थातच चिघळले. सारवासारवी झाली, प्रतिखुलासे झाले, परस्परांच्या राष्ट्रनिष्ठेबद्दलही चर्चा झाली. अशा वैचारिक, काही अंशी भावनात्मक पेचप्रसंगांचे वर्णन हर्डीकरांनी अचूक पण कमालीच्या तटस्थपणे केले आहे. मतभेदाच्या प्रसंगी देखील, केवळ बहुमताने होणाऱ्या विजयापेक्षा, तात्त्विक अधिष्ठान न सोडता मिळालेला विजय अधिक श्रेयस्कर मानावा, असे ते सुचवितात.

### अस्वस्थ करणारी प्रकरणे

या प्रसंगाच्या निमित्ताने, संघपरिवाराशी असलेल्या आपल्या गेल्या १८–१९ वर्षांतील संबंधांचे सिंहावलोकन हर्डीकरांनी विस्ताराने केले आहे. इतर अनेक मुलांप्रमाणेच 'संध्याकाळी काय करतोस,' हा प्रश्न आपल्यालाही कसा केला गेला व डिसें. १९५८ पासून मुलुंडच्या शाखेत आपण कसे जाऊ लागलो, वसंतराव काण्यांसारख्या उमद्या– व्यक्तिमत्त्वाचा आपल्यावर झालेला परिणाम व त्यांचे वैचारिक ऋण मान्य करूनही, संघविचारसरणीशी आपण तादात्म्य न पावल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. याउलट, पायगावकरांसारख्या, 'माणूस म्हणून जगायला जास्तीत जास्त लायक बनवायचं–' हा ध्यास घेतलेल्या शिक्षकाचा स्वतःवरील प्रभाव सांगताना, '(त्यांनी) खरं म्हणजे विचार दिलाच नाही, आचार दिला. त्यातून विचार आपोआपच जागा झाला, रुजत गेला, फोफावत गेला,' असे ते सहजपणे लिहून जातात.

दोन महिन्यांच्या तुरुंगवासातील अनुभव, त्याबद्दलच्या लेखकाच्या वैचारिक प्रतिक्रिया हा वास्तविक या पुस्तकाचा गाभा; परंतु त्याच्यापुढील दोन प्रकरणे वाचकांना अस्वस्थ करणारी आहेत, विचार करायला लावणारी आहेत. आणीबाणी संपली, आतले बाहेर आले; पण ज्याच्यासाठी हे सारे घडले, त्या समाजाची ही मूल्ये जोपसण्याची कुवत आहे काय– याचा धांडोवा घेत असताना हर्डीकरांनी नको तिथे डोकावून पाहिले आहे व जे सांगितले आहे, ते खरोखर अस्वस्थ करणारे आहे. ' आणीबाणी असताना किंवा ती शिथिल झाल्यावरही जो पैसा आला, साधने आली, वाहने आली तीही जनतेकडूनच आली. तरी कुठं तरी घोटाळा होता. हे सगळं लोकांनी दिलं; पण पाठिंबा दिला नाही. प्रत्येक घरातून निदान एक माणूस तुरुंगात जायला हवा होता, तो गेला नाही. किती तरी लोक 'येतो येतो' म्हणाले; पण आले नाहीत.' हे त्यांचे भाष्य आक्रस्ताळेपणाचे नाही. संस्कार करणे हा समाजकार्याचा फक्त एक भाग झाला, त्याला उत्पादक कार्याची जोड देणे आवश्यक आहे व याबाबतीत विद्यार्थी परिषदेसारख्या संघटनेने हाती घेतलेल्या सामुदायिक विहिरींच्या पहाणी–प्रकल्पाच्या मर्यादा त्यांनी निर्भीडपणे मांडल्या आहेत. खऱ्याखुऱ्या जनतंत्राबद्दल समाजातील कोणत्याच स्तरावर काही मूल्ये, काही जाणीवा पोटतिडकीने जपण्याची धडपड चाललेली नाही, ही गोष्ट त्यांना जिव्हारी लागली आहे.

## साहित्यिक आणि समाज

म्हणूनच 'काही तरी वेगळं केल्यावर जणू काही झालंच नाही असं दाखवीत लहान मुलं मुद्दाम मोठ्या माणसांसमोर जातात' तसे हर्डीकर सुटून आल्यावर काही प्रथितयश साहित्यिकांची गाठ घ्यायला गेले आहेत, प्रत्येकाजवळ केलेली चर्चा त्यांनी थोडक्यात मांडली आहे. आणीबाणीच्या संदर्भातील त्यांची मते अजमावण्यासाठी त्यांच्याशी निर्भीड, रोखठोक चर्चा केली आहे. 'सकाळी गेलेला माणूस संध्याकाळी आला नाही तर आता दादफिर्यादसुद्धा करता येणार नाही; याचा विसर माणूस म्हणून, लेखक म्हणून पडतोच कसा–' या प्रश्नाने हर्डीकरांना पछाडलेले आहे. कुणाची स्पष्टोक्ती, कुणाची सारवासारवी, कुणाची उदासीनता; तर कुणाची द्विधा वृत्ती– या सर्वांची हर्डीकरांनी नोंद घेतली आहे व त्यानिमित्ताने काही प्रश्न आपल्यासमोर ठेवले आहेत. 'आणीबाणी उठली म्हणजे समाजपरिवर्तनाचं काम यशस्वी झालं, संपलं असं का मानायचं? दोन महिन्यात सामाजिक क्रांती आणि ती भारतात घडेल असं समजायचं का?... परत एकदा कुठं तरी हस्तिदंती मनोऱ्यात जाऊन बसण्याची अवास्तव इच्छा यात कुठं तरी डोकं वर काढते आहे असा भास होतो– परत एकदा काळाशी दुवा (relevance) नसलेलं वाङ्मय निर्माण करण्याची ही नांदी तर नाही ना?'

लेखकाच्या निर्मितिस्वातंत्र्याबद्दल 'आणीबाणीत तोंड उघडणारे तेवढे निर्भय व गप्प बसणारे तेवढे भित्रे–' अशी बालबोध कसोटी लावण्यातील धोका हर्डीकर नेमका स्पष्ट करतात, 'गांधींच्या खुनाचे समर्थन करणारेच वाङ्मय छापून एकटेपणानं सरकारचा रोष ओढून घेणं, खटल्यांना तोंड देणं हेच आविष्कार-स्वातंत्र्यांचं एकमेव चिन्ह आहे, अशा थाटात बोललं जात आहे, लिहिलं जात आहे–' ही बाब त्यांना चिंताजनक वाटते. साहित्यिकांच्या आविष्कार-स्वातंत्र्याबद्दलचे हर्डीकरांचे विचार कोणत्याही 'वादा'शी संलग्न नाहीत, ते त्यांचे तळमळीचे आत्मनिवेदन आहे. 'समाजाबद्दल स्वारस्य' ही त्यांच्या मते या बाबतीत महत्त्वाची बाब आहे. '(हा) मनःपूर्वकतेचा प्रश्न आहे, अनुभवाचा प्रश्न आहे. सामाजिक अनुभवांना सामोरं जाऊन, पत्करून, पचवून मग कलावंत म्हणून स्वतंत्रपणे निर्मिती करण्याचं स्वातंत्र्य असलंच पाहिजे,' हा त्यांचा मुद्दा आहे. या अनुभवांचे आविष्करण होत असताना, कोणत्याही बाह्य बंधनापेक्षा, सामाजिक जाणिवेतून शुद्ध अनुभवातून एक प्रकारची enlightened censorship निर्माण होत असते, लेखकाच्या आविष्काराचे नियमन करीत असते व विशेष म्हणजे त्याबरोबरच खुद्द लेखकाचे व्यक्तित्व अधिकाधिक समृद्ध होत असते, हा त्यांचा विचार आजच्या लेखकांना वस्तुपाठ ठरावा, एवढ्या तोलामोलाचा आहे.

## निवेदनाचा नवा आविष्कार

सुटका–निवडणुका आणि विजय हा निवेदनातील अखेरचा भाग. बाहेर आल्यावर निवडणुकीच्या प्रचाराच्या रणधुमाळीत हर्डीकरांनी स्वतःला झोकून दिले आहे. प्रचारतंत्रातील गमती, बदलती लोकमने (आणि मतेही) यांचे दर्शन त्यांनी निवेदनातील गतिमानता कायम ठेवून घडवलेले आहे. मात्र, अखेरीच्या विजयघोषाच्या वेळीही, सत्ताधारी पक्षाच्या 'विदारक उच्छेदाचे' चित्र पाहून हर्डीकर विमनस्क होतात आणि अंतर्मुख होऊन स्वतःलाच प्रश्न करतात, 'काँग्रेसचं जे काही झालं, इंदिरा गांधींनी जे काही केलं, त्याला आम्ही समाज म्हणून मुळीच जबाबदार नव्हतो, असं कसं म्हणणार आहोत?' निवडणुकीतील विजयामुळे सूडाचे समाधान मिळाले किंवा देशाच्या अनेकविध समस्यांना उत्तर सापडले, असे हर्डीकरांना वाटलेले नाही, तुरुंगवासातून बाहेर पडणाऱ्या बंदीने, तुरुंगात टाकणाऱ्याचा हा पराभव किती दिमाखाने सांगितला असता! परंतु या विजयक्षणीही हर्डीकरांची चिंतन-मननाची वृत्ती निष्कंप राहिलेली आहे. हळव्या भावुकतेची जोड देऊन आपले निवेदन गहिरे करण्याची आवश्यकता त्यांना वाटलेली नाही. याचे कारण, वाचकाला अंतर्मुख बनविण्याचे सामर्थ्य असलेले त्यांचे निवेदन सर्वार्थाने वैचारिकतेच्या पायावर आधारलेले आहे. त्यात कुणावर आगपाखड नाही, कुणाची भलावण नाही. हर्डीकरांची वैचारिकता 'अभ्यासे प्रकट' झाली आहे; परंतु ती शब्दजड नाही. उलट, अनुभव घेण्यातील सरळपणा व तो व्यक्त करण्याची उत्कट तळमळ यामुळे त्यांचे हे निवेदन वाचकांशी संवाद साधू शकते.

## समृद्ध कविमन

निवेदन सांगण्यामधील ताजेपणा तो लिहून काढताना उणावण्याची शक्यता असते; परंतु हर्डीकरांच्या निवेदनाबाबत तसे घडलेले नाही. त्यांनी उद्धृत केलेली एकनाथ–तुकारामांची वचने वगळली तर ज्ञानेश्वरी, दासबोध, शाकुंतल– यातील त्यांनी दिलेले संदर्भ सहजरीत्या आले आहेत. (गजस्तत्र न हन्यते' असा दाखला देऊन स्वतःला काव्याचे अंग नसल्याचे जरी त्यांनी सुचवले असले तरी, 'दोन भोंग्यांच्या कोलाहलात'– या ओळीने सुरू होणारी त्यांची दोन कडव्यांची कविता मला तरी प्रभावी वाटली.) संतवाङ्मय, संस्कृतसाहित्य, अर्वाचीन मराठी कविता– यांतील सौंदर्यस्थळांचा मार्मिक उपयोग त्यांच्या समृद्ध कविमनाचे दर्शन घडवतो. या

प्रवाही निवेदनात एक प्रकारचा आटोपशीर चटकदारपणा आहे. कुठे मिस्किलपणा, कुठे उपरोध, स्पष्टोक्ती तर आहेच आणि काव्यात्मताही आहे. सूक्तिवचनपर अशी वाक्ये हर्डीकर सहजपणे लिहून जातात. 'प्रत्येकाचंच आपापल्या परीनं खरं होतं, म्हणूनच सगळ्यांचं मिळून काही तरी नक्की चुकत होतं,' 'आपल्याला काही तरी म्हणायचंय आणि शब्द सापडत नाहीत, हा अनुभव तुरुंगवासासारखाच...,' 'अनुभवाची साथ नसेल तर शब्दही गुळगुळीत होतात,' 'भीती ही सहजप्रेरणा असते, निर्भयता शिकायची असते,' 'गावचा जोगडा, परगावचा सिद्ध–' अशी काही उदाहरणे देता येतील. तरीही अनुभवाचा सच्चेपणा हे हर्डीकरांच्या लेखनाचे बलस्थान आहे, असे मला वाटते.

### महत्त्वाचे प्रश्न

हर्डीकरांच्या या अनुभवविश्वाचे दर्शन प्रत्ययकारी तर आहेच; पण या निवेदनाच्या निमित्ताने त्यांनी उपस्थित केलेले प्रश्न अधिक महत्त्वाचे आहेत. मतदानाबाबत ग्रामीण जनतेच्या प्रतिक्रिया, तिचे अंतर्मन जाणण्याची आवश्यकता, लेखक व आविष्कार-स्वातंत्र्य, निवडणुकांचा अन्वयार्थ–याबाबतचे त्यांचे प्रश्न म्हणजे आजची–आणीबाणी-नंतरची परिस्थिती पाहिल्यावर मध्यमवर्गीय विचारवंतांच्या मनात उमटणाऱ्या प्रश्नांचे प्रतिरूप आहे. पुन्हा 'थंड गोळा' बनण्याकडे आपली वाटचाल होत नाही काय? कोळ्याच्या जाळ्याचे प्रश्नांकित चित्र या बाबतीत पुरेसे बोलके आहे. संपूर्ण वंदे मातरम् तर राहोच; परंतु 'जनगणमनअधिनायक' व 'भाग्यविधाता' या शब्दांच्या औचित्याबद्दलच आज विचारणा होऊ लागली आहे. आणीबाणीनंतरचा सूर्य नवा 'वाटला' तरी उपेक्षित जगाचे 'आंध्य' फिटलेले नाहीच. बिहार काय, उत्तर प्रदेश काय, सर्वत्र जैसे थे च आहे. इंग्लंडची अवस्था एके काळी 'a fen of stagnant waters' असल्याचे एका कवीने म्हटले होते. आपले आजचे चित्र त्यापेक्षा वेगळे आहे का? निवडणुका जिंकण्यासारख्या एखाद्या घटनेमध्ये 'इतिहास पालटून' टाकण्याचे सामर्थ्य असते, असा हर्डीकरांचा विश्वास आहे. तसे खरोखर घडत आहे का? अगदी वाङ्मयापुरताच विचार केला तरी 'सखोल सामाजिक जाणीव' असलेले वाङ्मय आणीबाणी-नंतरच्या काळात कितीसे निर्माण झाले? अशा वाङ्मयाला आपला असा वाचकवर्ग (clientage) तरी आहे का? चवपालट म्हणून आणीबाणीचा मसाला वापरलेले वाङ्मय विचारात घ्यायचे अर्थातच कारण नाही.

मध्यंतरी 'सोनार बाँगला'च्या निमित्ताने लिहिल्या गेलेल्या 'रेप स्टोरीज' कशा चविष्टपणे वाचल्या गेल्या!

अनेक संदर्भांनी सजलेले, प्रसन्न आणि प्रांजळ असे हे निवेदन 'एकल्यावर' विचार करायला लावते, हे त्याचे ठळक वैशिष्टय. एरवी तुरुंगवासातील जीवनाचे एक भडक, रोमांचकारी व्याज-काव्यात्म चित्रण एवढेच त्याचे मोल ठरले असते; (कदाचित ते अधिक लोकप्रियही झाले असते.) आत्मनिवेदनाचा हा आविष्कार हर्डीकरांनी रूढ लेखनशैली किंवा प्रचलित वाङ्मयप्रकार याबाबत फारसा विचार न करता स्वतःच्या तंत्राने केला आहे. प्रस्तुत निवेदनाचा प्रभाव जाणवण्यामध्ये अर्थपूर्ण रेखाचित्रे व सूचक अवतरणे यांचाही वाटा आहे, हे मुद्दाम नमूद केले पाहिजे. स्वतःचा वाचकवर्ग निर्माण करण्याची कुवत हर्डीकरांच्या लेखनामध्ये आहे, एवढा विचार निवेदनाच्या समाराधनेनंतर मनात उरतो.

–प्रा. प्रभाकर राजगुरु

जनांचा प्रवाहो चालिला
लेखक : विनय हर्डीकर
राजहंस प्रकाशन
पृष्ठे : २५०
मूल्य २० रुपये


## तीन राजहंस प्रकाशने

राजहंस प्रकाशन पुणे

१०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३०

**आणि ड्रॅगन जागा झाला**
लेखक : अरुण साधू । मूल्य : चवदा रुपये

**फिडेल, चे आणि क्रांती**
लेखक : अरुण साधू । मूल्य : सात रुपये

**पूर्णिया**
लेखक : अनिल अवचट । मूल्य : सहा रुपये

# विक्षिप्त कुबेर : हॉवर्ड ह्यूजेस

एक संपन्न राष्ट्र म्हणून अमेरिकेचा गौरव होतो. या संपन्न राष्ट्रातील माणसंही संपन्नच; पण म्हणून मानवी स्वभावातलं विक्षिप्तपण थोडंच लपणार! अशाच एका 'विक्षिप्त राजश्रीं'चा हा मनोरंजक परिचय.

**डॉ. श्रीकांत मुंदरगी**

सर्वसामान्य माणसाला आकर्षित करण्याचे सामर्थ्य लक्ष्मीपुत्रांच्या कथांमध्ये जितकं असतं तितकं इतरांच्या कथांमध्ये क्वचितच आढळेल. हेन्री फोर्ड, रॉक फेलर आणि ओनॅसिस या कुबेरांनी अमेरिका व युरोपच्या लोकांना अनेक वर्षं आपल्या आख्यायिकांनी गुंगवून टाकलं; पण आपल्या भोवती रहस्याचे जाळे विणून हॉवर्ड ह्यूजेस या अमेरिकेच्या उद्योगपतीने जेवढी प्रसिद्धी मिळविली तेवढी इतरांच्या वाटयाला क्वचितच आली असेल! वर्तमानपत्रांनी त्याच्याबद्दल जेवढे रकाने भरले असतील, रेडिओने जितक्या बातम्या प्रसारित केल्या असतील, टी. व्ही.ने जितका वेळ त्याच्यासाठी खर्च केला असेल, लेखकांनी त्याच्याविषयी जितकं लिहिलं असेल तितकं इतर कोणाही धनवंताच्या वाटयाला आलं नसेल! अर्थात आपल्या असामान्य बुद्धिमत्तेने आणि कर्तबगारीने त्याने लोकांना जेवढं दिपवून टाकलं त्याहूनही अधिक त्याच्या विक्षिप्तपणामुळे त्याने लोकांना चकित करून टाकलं. त्याच्या संपत्तीपेक्षा त्याच्या जगावेगळया मूर्ख वागणुकीनं त्याला अधिक प्रसिद्धी मिळवून दिली.

कल्पना करा, तुम्ही एक अतिशय श्रीमंत उद्योगपती आहात. आपल्या प्रचंड उद्योगसमूहावर देखरेख करण्यासाठी एका हुशार गृहस्थाची मॅनेजर म्हणून तुम्ही निवड केलीत. महिन्याच्या अखेरीस त्याचा पगार तुम्हाला द्यावयाचा आहे. तो तुम्ही कशा प्रकारे द्याल? एक तर तुम्ही लिफाफ्यात नोटा घालून द्याल किंवा मनीऑर्डरने त्याचा पगार त्याच्या घरी पाठवाल. हेही योग्य वाटत नसेल तर चेकने त्याच्या खात्यावर पैसे जमा करण्यास तुम्हाला काहीच अडचण वाटणार नाही; पण छे! यापैकी एकही कल्पना हॉवर्डला मंजूर नव्हती. शोऊनार्ड या नव्याने नेमलेल्या मॅनेजरला भर दुपारी बारा वाजता रोमेन स्ट्रीटवर दुसऱ्या मजल्याच्या खिडकीतून वाऱ्यावर सोडण्यात आलेल्या पगाराच्या चेकच्या मागे धावावं लागलं तेव्हा त्याच्या तोंडातून फेस आला आणि मेंदूत मुंग्या आल्या. चेकवर लिहिलेल्या प्रचंड आकड्यांकडे पाहूनच त्याने आपला अपमान गिळला. या जगावेगळ्या पगारवाटपाचं कारण काय तर त्याच्या हेल्थ रिपोर्टवर नोंद होती की, त्याला जंतुबाधेमुळे सर्दी झाली होती व ती हॉवर्डच्या ऑफिसच्या इमारतीत पसरण्याचा धोका होता.

हॉवर्ड ह्यूजेसची प्रमुख कचेरी एका चोवीस मजली इमारतीत थाटण्यात आली होती. रोमेन स्ट्रीटवरील या इमारतीला 'ऑपरेशन्स' असं नाव देण्यात आलं होतं; पण त्यात काम करणारे हजारो कर्मचारी त्याला 'रोमेन' या नावानेच संबोधीत. येथूनच अमेरिकाभर पसरलेल्या त्याच्या प्रचंड उद्योगसमूहावर देखरेख ठेवण्यात येत असे. स्वागतकक्षात समोर भितीवर लावलेल्या प्रचंड बोर्डावर हजारो टेलिफोन-कनेक्शनस् होती. बाहेरून येणाऱ्या प्रत्येक फोन-कॉलची तपशीलवार माहिती नोंदवून ठेवण्यासाठी तेथे तीस ऑपरेटर्स चोवीस तास काम करीत. बाहेर केल्या जाणाऱ्या प्रत्येक कॉलचीही नोंद ठेवण्यात येई हॉवर्डचा आपल्या अधिकारीवर्गावर व कर्मचाऱ्यांवर विश्वास नव्हता, हेच त्याचं खरं कारण.

दारू पिऊ नका, धूम्रपान करू नका, कांदा व लसूण खाऊ नका; सिनेमा पाहू नका, क्लबमध्ये जाऊन नाचू नका वा पत्ते खेळू नका आणि गर्दीत मिसळू नका अशा तऱ्हेचे विचित्र कायदे काटेकोरपणे पाळण्याचा आदेश साऱ्यांना दिला जाई; पण या सर्वांवर कडी म्हणजे सर्दी वा खोकला होऊ देऊ नका, अशी सक्त ताकीद असे. चुकून सर्दी किंवा खोकला झालाच तर त्या कर्मचाऱ्याला बिनपगारी रजा घ्यावी लागे.

सर्वात मजा म्हणजे त्या कचेरीत काम करणाऱ्या हजारो कर्मचाऱ्यांचे जेवण ह्यूजेस एअरक्रॉफ्ट कंपनीच्या भटारखान्यात तयार होत असे. रोमेनच्या दुसऱ्या मजल्यावरील एका गवाक्षातून नायलॉनच्या दोरखंडाने बांधलेल्या मोठ्या बादल्यांमध्ये ही पाकिटं ठेवण्यात येत व वर ओढून घेण्यात येत. हे जेवणाचे पदार्थ जंतुविरहित असतात, असा हॉवर्डचा दावा असे.

## पाऊण तासासाठी एक कोटी

१९४९ च्या हिवाळ्यात हॉवर्डला लास व्हेगास इथे एक घर विकत घ्यायची इच्छा झाली. झालं... त्या कामासाठी खास नेमण्यात आलेले दूत शोधार्थ निघाले. एका प्रचंड व महागड्या घराची निवड करण्यात आली. त्या घराला दहा एकरांचा बागबगीचा व शंभर एकरांचं गुरं व घोडे चरण्याचं कुरण जोडलेलं होतं. अडचण एकच

होती. त्या घराच्या परिसरात खूपच धूळ होती. ह्यूजेस एअरक्रॅफ्ट कंपनीच्या इंजिनियर्स व इतर तज्ज्ञांना ताबडतोब कळविण्यात आले की, त्यांनी थोड्या वेळात ते प्रचंड घर वातानुकूलीत बनवावं, तसंच धूळ व आर्द्रता नाहीसे करण्याची व्यवस्था करावी. काही महिन्यांतच सात-आठ लाख रुपये खर्चून नेवाडातील सर्वांत मोठं धूळ व आर्द्रता नाहीसं करून हवा गार करणारं मशीन त्या घरात बसविण्यात आलं. बागबगीच्याची सुधारणा करण्यात आली अन् कुरणात चरण्यासाठी गुरे व राइडिंगसाठी घोडे खरीदण्यात आले. घराच्या मूळ किमतीसकट खर्च साठ लाखाच्यांवर गेला !

हॉवर्डच्या आगमनाची तयारी झाली. आपल्या खास खानसाम्यांसह हॉवर्ड घरी आला. या ब्रुनो नावाच्या खानसाम्याने कोशिबीर, गाईचं मांस आणि टोमॅटोचा रस जेवणाच्या टेबलावर आणून ठेविला. हॉवर्डने कोशिबिरीचा घास घेतला आणि ब्रुनोवर तो जोरात ओरडला,

'ब्रुनो ! हा काय तमाशा! कसली शिळी, वातड कोशिंबीर आहे ही !'

'नाही सर ! ती अगदी ताजी आहे,' चाचरत ब्रुनोने उत्तर दिले.

'थापा मारू नकोस !' हॉवर्ड किंचाळला.

ब्रुनोने धावत पळत जाऊन परत शेगडीवरची ताजी कोशिंबीर आणली; पण टेबलावर येईतो ती अगदी कोरडी व घट्ट झाली होती. आर्द्रता नाहीशी करण्याच्या यंत्राचा तो प्रताप होता.

'असल्या गचाळ गावात आणि रटाळ घरात मला क्षणभरही राहायचं नाही!' असं म्हणून हॉवर्ड उठून चालू लागला. त्या घराला कुलुप लावण्यात आलं.

सात वर्षांनंतर हॉवर्डच्या आज्ञेवरून एक सेवक त्या घरी आला तेव्हा जेवणाच्या टेबलावर ठेवलेल्या त्या भरलेल्या बशा तशाच अवस्थेत होत्या. आणि गंमत म्हणजे घर वातानुकूलित बनविणारी तसंच आर्द्रता व धूळ नाहीशी करणारी सर्व यंत्रें सात वर्षं चालू होती. आतापर्यंत एक कोटीच्यावर त्या घराचा खर्च पोहोचला होता अन् ते घर हॉवर्डने फक्त पंचेचाळीस मिनिटं वापरलं...... (एवढ्या किंमतीत दहा हजार हेक्टर्सना पाणी देणारे धरण बांधता आलं असतं. जगातील एक कोटी अर्धपोटी वा उपाशी लोक एकदा पोटभर खाऊ शकले असते. सोन्याचा धूर डोळ्यात गेला की, डोळस माणसंसुद्धा आंधळी होतात हेच खरे !')

त्याच दिवशी सायंकाळी हॉवर्डनं आपला प्रमुख सुरक्षाधिकारी जेफ शोऊनार्ड याला फोन करून लॉस एंजेलिसहून ला व्हेगास येथे ताबडतोब येण्यास सांगितलं. आज्ञेप्रमाणे शोऊनार्ड एका विमानाने ला व्हेगासला पोहोचला. डेझर्ट इन् या हॉवर्डच्या मालकीच्या हॉटेलात येऊन त्याने हॉवर्डला फोन केला. कारण तो येताच मियामीला जाण्यास निघायचं, असं हॉवर्डने कळविले होतं.

"दोन तासातच मी तुला माझा निर्णय कळवितो. मात्र तू फोनपासून दूर जाऊ नकोस!" हॉवर्डने बजाविलं.

पुढे अकरा दिवस शोऊनार्ड फोनच्या आसपास घुटमळत होता. त्या दरम्यान हॉवर्डने अमेरिकेतील सात शहरे विमानाने पालथी घातली; पण आपला तऱ्हेवाईक बॉस आपल्याला याच हॉटेलच्या चौथ्या मजल्यावरील त्याच्या खोलीतून केव्हा फोन करील याचा नेम नाही, असं मनाशी म्हणत शोऊनार्डने अकरा दिवस अक्षरशः विलक्षण काळजीत काढले. त्या अकरा दिवसांत तो धड पोटभर जेवला नाही की सलग पाच-सहा तास झोपला नाही.

## रहस्यमय मालक

हॉवर्डचा प्रमुख सुरक्षाअधिकारी शोऊनार्ड असा दावा करतो की, आपल्या अठरा वर्षांच्या नोकरीत आपण हॉवर्डला जितकं जवळून पाहू शकलो वा ओळखू शकलो तितकं इतर कोणीही हॉवर्डच्याजवळ जाऊ शकलं नाही. असा दावा करणाऱ्या शोऊनार्डची ही दशा तर इतरांची काय कथा !

हॉवर्ड ह्यूजेसला मोठमोठ्या उलाढालीत पैशाची मदत करणाऱ्या नोआह डिट्रीचलासुद्धा सामान्य अमेरिकन माणसापेक्षा हॉवर्डच्या खाजगी जीवनाची अधिक माहिती नव्हती. न्यूयॉर्कला असणारा हॉवर्डचा कायदेशीर सल्लागार चेस्टर डेव्हिस याला हॉवर्डचं एकदाही प्रत्यक्ष दर्शन घडलं नाही. लॉस एंजेलिसच्या हावर्डच्या मुख्य कचेरीत रोमेन इथे प्रमुख व्यवस्थापक व संदेशवाहकांचा नियंत्रक म्हणून काम पाहणारा बील गे हॉवर्डच्या चमत्कारिक, अविश्वसनीय व मूर्खपणाने भरलेल्या आज्ञा व संदेश योग्य त्या ठिकाणी पोहोचविण्याचं काम बावीस वर्षं करीत होता; पण या काळात या विक्षिप्त मालकाला पाहण्याचा योग त्याला एकदाही आला नाही, हे तो प्रांजळपणे कबूल करतो. नादिल हेन्ले या त्याच्या एके काळच्या वैयक्तिक खाजगी चिटणिसानेसुद्धा पुढे वार्ताहराजवळ सांगितलं की, माझ्या पंधरा वर्षांच्या नोकरीत मला हॉवर्ड एकदासुद्धा दिसला नाही !

ह्यूजेस दस; T W A; ह्यूजेस एअरक्राफ्ट; RKO; द मेडिकल इन्स्टिटयूट ऑफ फ्लॉरिडा; हेलिकप्टर फर्म; T. V. station ला व्हेगास; ह्यूजेस एअरवेस्ट, टेक्सास बियर फॅक्टरी; झनाडू प्रिंसेस हॉटेल बहामास; आर्किटेक्ट अँड इंजिनियरिंग फर्म; सँडस, फ्रंटिअर, डेझर्ट इन् लँडमार्क आणि इतर अनेक हॉटेल्स व ला व्हेगासमधील जुगारीचे प्रचंड अड्डे आणि टेक्सासमधील तेलांच्या खाणी हे सारे हॉवर्ड ह्यूजेसच्या मालकीचं होतं; पण या सर्व कंपन्या वा हॉटेल्स वा कारखाने यांच्या प्रमुख मॅनेजर्सना हॉवर्डशी प्रत्यक्ष बोलण्याचं भाग्य कधीच लाभलं नाही.

१९४९ ते १९६८ च्या दरम्यान शोऊनार्डने हॉवर्डच्या आज्ञेवरून २८८ खाजगी गुप्त हेरांची नेमणूक केली. हॉवर्ड जिथे जाणार असे, तेथे अगोदर जाऊन त्याच्या सुरक्षेची व्यवस्था करणे, त्याच्यासाठी नवनवीन देखण्या तरुणींची व्यवस्था करणे आणि त्याच्या विक्षिप्त टाळक्यातून अचानक बाहेर पडणाऱ्या आज्ञांचे पालन करणे अशी या गुप्त हेरांचो कामं असत. या एकोणीस वर्षांत शोऊनार्डने या गुप्त हेरांना अडीच कोटी रुपये पगार दिला. एकशेआठ तरुणींची हॉवर्डच्या जनानखान्यासाठी निवड करण्यात आली.

सुरक्षाधिकारी, गुप्तचर वा गाड्यांचे ड्रायव्हर या गोंडस नावाखाली ज्या तगड्या व देखण्या जवानांची भरती करण्यात येत असे त्यांना हॉलीवूडला सिनेमात काम मिळविण्याच्या व नटी होण्याचे स्वप्न उराशी बाळगून येणाऱ्या अमेरिकन वा युरोपीय तरुणींना

गटवून त्यांना हॉवर्डच्या ' हारेम 'मध्ये पाठविण्याचं काम असे; पण हे गुलाबी काम करताना त्या तरुणीशी हवामान, सिनेसृष्टी वा खेळ या विषयावरच गप्पा मारायच्या, अशी या तरुण लोकांवर अट लादलेली असे. तसंच त्यांची एकमेकांशी ओळख करून देण्याचं टाळलं जाई. त्यामुळे एखाद्या हॉटेलात एका वेळी हॉवर्डची दलाली करणारे हे चार-पाच तरुण आपापल्या 'माला'ला घेऊन जेवण्याच्या व नृत्याच्या हॉलमध्ये दिसत असत. म्हातारा हॉवर्ड आपण साऱ्यांना मूर्ख बनवतो वा त्यांचा मामा करतो अशी गोड गैरसमजूत करून घेत असे. वस्तुस्थिती मात्र निराळी असे.

अशा गुलाबी दलालगिरीच्या कामगिरीवर असलेल्या एका तरुणाने व्हेरा माइल्स या तरुणीशी सूत जमवलं व तिला हॉवर्डच्या हारेममध्ये धाडण्याऐवजी स्वतःचं पत्नीपद बहाल केलं. हॉवर्डला हे कळताच तो भयंकर भडकला व त्याने या तरुणाला बडतर्फ केलं. असे घोटाळे परत होऊ नयेत म्हणून म्हाताऱ्याने एक नवीनच युक्ती शोधून काढली.

तरुणींना गटविण्यासाठी आता समसंभोगी तरुणांची निवड करण्यात आली. अर्थात अशा मंडळींना शोधून काढण्याची अवघड कामगिरी करताना शोऊनार्डला फार सायास झाले ही गोष्ट वेगळी! पण त्यातूनच गंमतीशीर प्रसंग घडले. या नव्या रिक्रूटांनी हळूहळू आपला मोर्चा हॉटेल्समधील देखणे वेटर्स, तिथे येणारे तगडे पुरुष व आसपास वावरणारे जवान पोलीसअधिकारी यांच्याकडे वळविला. त्यामुळे काही काळ एकच गोंधळ उडाला आणि ही प्रकरणं मिटविताना हॉवर्डला लाखो डॉलर्स खर्च करून शिवाय व्हाइट हाउसपर्यंत वशिला लावावा लागला. भीक नको पण कुत्रा आवर अशा सूज्ञ विचाराने हॉवर्डने अर्थातच समसंभोगी दलालांची ही कल्पना एकदम रद्दबातल करून टाकली, हे ओघाने आलेच.

## खुनशी पण कुशाग्र बुद्धी

हॉवर्डचा टेलिफोन हा एखाद्या राजमुद्रेसारखा होता. त्याच्या साहाय्याने तो आपल्या अफाट उद्योगसमूहावर सत्ता गाजवी. एखाद्याला बडतर्फ करणं, एखाद्याला बढती देणं वा एखाद्याला घाबरवून सोडणं असे नाना खेळ मोकळ्या वेळात तो खेळत असे.

पेरी लायबर या आपल्या एका व्यवस्थापकाला त्याने पहाटे दोनच्या सुमारास फोन केला. अनेक वेळा प्रयत्न करूनही फोन 'एंगेज' लागत होता त्यामुळे हॉवर्डचा पारा चढला. दुसऱ्या दिवशी सकाळी एक फोन लायबरच्या घरी बसवण्यात आला. त्याचा नंबर मात्र हॉवर्डशिवाय दुसऱ्या कोणालाच ठाऊक नव्हता. लायबरलासुद्धा तो नंबर शेवटपर्यंत अज्ञातच राहिला. मध्यरात्री फोन करून एखाद्याची झोप उडवून देऊन त्याचा खुनशी आनंद उपभोगणं हा हॉवर्डचा आवडता खेळ होता.

अर्ध्या झोपेतून उठणारा माणूस नेहमी खरं बोलतो, अशी हॉवर्डची प्रामाणिक समजूत होती, हेही यामागचं आणखी एक कारण होतं. एखाद्याची समोरासमोर गाठ पडली तर हॉवर्ड अतिशय सौजन्यशीलतेने बोलत असे; पण टेलिफोनवर मात्र त्याच्यातल्या शैलीचं वाघात रूपांतर होई. मध्यरात्री हॉवर्डचा फोन आला की, आता आपली चांगलीच तासंपट्टी होणार, हे फोन घेणारा गृहस्थ चांगलंच जाणून असे.

पगाराचे चेक वाऱ्यावर सोडणारा, पंचेचाळीस मिनिटांसाठी कोटचवधी रुपये मोजणारा वा समसंभोगी तरुणांना आपले दलाल नेमणारा हॉवर्ड ह्यूजेस हा मूर्खांचा शिरोमणी होता असं म्हणणं महामूर्खपणाचं ठरेल. कारण तरुण वयात व काही काही वेळांनंतरच्या काळातही त्याने आपल्या बुद्धिमत्तेची जी विलक्षण चमक दाखविली त्याने मी मी म्हणणाऱ्या बुद्धिवंतांना स्तिमित करून टाकलं आहे.

वयाच्या सोळाव्या वर्षी त्याने टेक्सासमध्ये पहिलं रेडिओस्टेशन बांधलं. त्याच्या वडिलाचा मृत्यू झाला तेव्हा तो धड अठरा वर्षांचाही नव्हता; पण मॅजिस्ट्रेटला व्यवस्थित गंडवून त्याने आपण सज्ञान असल्याचा दाखला घेतला व वडिलांनी उभ्या केलेल्या ह्यूजेस टूल कंपनीचा कायदेशीर ताबा घेतला.

ह्यूजेस ऑइल ड्रिलचं पेटंट असल्याने पाण्यासारखा पैसा हॉवर्डला मिळत होता. त्याने या पैशाच्या जोरावर हॉलिवूडमध्ये प्रवेश केला आणि Hell's Angels हा चित्रपट काढला. आजसुद्धा या चित्रपटाची सर्वोत्कृष्ट चित्रपटात गणना होते. १९३५ साली जेव्हा मोटारी शंभर मैल वेगाने धावू शकत नसत तेव्हा त्याने स्वतःची H1 ही रेसकार तयार केली. ती स्वतःच चालवून ताशी ३२५ मैल वेगाचा जागतिक विक्रम त्याने प्रस्थापित केला. आता ह्यूजेसच्या कल्पना आकाशात भराऱ्या मारू लागल्या. आपल्या विमानात योग्य ते बदल करून १९३८ साली त्याने पृथ्वीप्रदक्षिणा केली, ती अवघ्या ९१ तास १४ मिनिटात! त्या काळचा जागतिक विक्रम करणाऱ्या गृहस्थाला पृथ्वीप्रदक्षिणेला याच्याहून चार दिवस अधिक लागले होते हे या संदर्भात ध्यानात घेण्याजोगे आहे.

कर्तृत्वाच्या यशोगिरीवर असताना हॉवर्ड नेहमी मोठमोठ्या क्लबातून, नाटचगृहांतून, सभागृहांतून आणि गर्दीतून हसत-खेळत, गप्पा मारीत अन् लोकांशी हस्तांदोलन करीत वावरताना दिसे; पण दुसऱ्या महायुद्धाच्या काळात जर्मनीने सात बोटी पाण्यात सोडल्या आणि दोस्त राष्ट्रांच्या शेकडो बोटींना जलसमाधी दिली. या यू-बोटींना पायबंद घालण्यासाठी हॉवर्डने उडत्या बोटींची योजना मांडून ती स्वतःच अमलात आणण्यास सुरुवात केली. या उडत्या बोटींना ' डबक्यातली बदकं ' असं नाव देऊन वर्तमानपत्रांनी व अमेरिकन लोकांनी त्याची टिंगल उडविली. तसेच त्या काळात पोलादाची चणचण भासू लागल्याने त्याने या बोटींना लाकूड वापरले. त्यामुळे अमेरिकन सरकारने सहाय्य करण्याऐवजी त्यावर टीका केली. झालं! हॉवर्डचं माथं भडकलं. त्याच्या मनात कटुता निर्माण झाली. त्यानंतर त्याच्यामध्ये आमूलाग्र बदल झाला. सभा-समारंभातून तो दिसेनासा झाला. वर्तमानपत्रं, रेडिओ व टी. व्ही. यांनी सार्वजनिक जीवनातून अंतर्धान पावलेल्या हॉवर्डविषयी वाटेल त्या कंड्या पिकविण्यास सुरुवात केली आणि एका कुशाग्र बुद्धिमत्तेच्या व असामान्य कर्तृत्वाच्या उमद्या माणसाचं एका लहरी, वेडसर व हट्टी माणसात रूपांतर झालं!

## हॉवर्डचा जनानखाना

१९३० ते १९४० च्या दरम्यान हॉवर्ड ह्यूजेस हा हॉलिवूडचा 'हीरो' बनला होता. त्या वेळी प्रसिद्धीच्या शिखरावर असणाऱ्या

अनेक तारका त्याच्या हातात हात घालून फिरताना दिसत. कॅथेराइन हेपबर्न, लॅना टर्नर, अॅव्हा गार्डनर, अॅलिव्हिया डी हॅवीलॅन्ड, टेरी मूर, इडा लुपिनो व जीन हार्लो या त्यातल्या काही प्रमुख नटयांचे त्याच्याशी संबंध जोडले जात होते. टेरी मूरने तर हॉवर्डनं आपल्याशी लग्नच केलं आहे, असं वर्तमानपत्रात जाहीर केलं; परंतु हे तिला प्रत्यक्षात सिद्ध करता आलं नाही. जेन रसेलने मात्र सिनेसृष्टीत आपलं बस्तान बसविण्यासाठी हॉवर्डचा वापर केला; पण या अनेकींबरोबर प्रणयाचे खेळ खेळत असतानाच जीन पीटर्स या उदयोन्मुख नटीशी लग्न करून त्याने सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला. जीन पीटर्सची एका सौंदर्यस्पर्धेत सौन्दर्यसम्राज्ञी म्हणून निवड झाली. हॉवर्डच्या दूतांनी ताबडतोब तिला गाठलं व सिनेमात नायिकेचं काम मिळवून देतो, असं सांगून हॉवर्डच्या जाळयात खेचलं; पण या खेपेस हॉवर्डची दांडी उडाली अन् शिकारी स्वतःच शिकार बनला ... तिला खेळविण्याऐवजी हॉवर्डला तिने खेळविलं. एरवी लग्नाचा प्रश्न निघताच हजार कारणं पुढे करणारा हॉवर्ड जीन पीटर्सपुढे कसा काय नमला, हे एक रहस्यच आहे.

अर्थात लग्नानंतर काही दिवसच तो जीनशी एकनिष्ठ होता; पण मधुचंद्र संपताच त्याने परत आपला जुना खेळ सुरू केला. त्याच्या अफाट संपत्तीकडे पाहूनच जीननं त्याच्या चाळयांकडे कानाडोळा केला. हॉलिवूडला चित्रतारका बनण्याच्या महत्त्वाकांक्षेने पछाडलेल्या सुंदर तरुणींच्या टेहळणीवर हॉवर्डचे दूत असत. अशी एखादी पोरगी गटविली को, हॉवर्ड तिची एखाद्या मोठ्या शानदार हॉटेलात भेट घेत असे. त्याच वेळी हॉवर्डचे दुसरे सेवक त्या भागातला मोटारकार्सचा एखादा मोठा विक्रेता गाठत असत. त्याच्याकडे असलेल्या लेटेस्ट कॅडिलॅक व लिंकन कॉंटिनेंटल (या दोन गाड्या अमेरिकेत सर्वांत महागड्या आहेत. भारतात ज्या इंपालाचे वारंवार कौतुक केले जाते तिचा अमेरिकन दर्जाप्रमाणे पाचवा / सहावा क्रमांक लावला जातो. अमेरिकन बनावटीची नसलेली मर्सिडीज ही एकच गाडी कॅडिलॅक वा लिंकनच्या बरोबरीची समजली जाते.) यापैकी एखादी गाडी घेण्याची हॉवर्डची इच्छा आहे, असं त्याला सांगितलं जाई. हॉवर्डला गाडी घ्यायची आहे, हे ऐकून हुरळून गेलेला तो विक्रेता हॉवर्डच्या सेवकांकडे गाडी सुपूर्द करीत असे. अशा प्रकारे नव्या पोरीवर वजन मारण्यासाठी कोरीकरकरीत गाडी हॉवर्ड वापरीत असे. नंतर दोन-तीन दिवसात हा मधुचंद्र संपुष्टात येताच गाडी व पोरगी 'पसंत नाही' या सबबीवर हॉवर्ड त्यांच्याकडे पाठ फिरवीत असे.

जीना लालोब्रिजेडा हिला अभिनेत्री म्हणून प्रसिद्धी मिळण्यापूर्वी तिला हिरॉइनची भूमिका देतो, असं सांगून हॉवर्डच्या दूतांनी इटलीहून लॉस एंजेलिसला आणलं. तिला तेथील एका फाइव्ह स्टार हॉटेलात ठेवण्यात आलं. दोन–तीन दिवसांच्या बडदास्तीनंतर अखेर हॉवर्डने तिची भेट रात्री खूप उशीरा घेतली. एका कोऱ्या कॅडिलॅकमधून त्याने तिला दुसऱ्या एका प्रसिद्ध हॉटेलात नेलं. खूप उशीर झाल्याने हॉटेल जवळजवळ बंद होण्याच्या मार्गावर होतं; पण तसं त्या हॉटेलच्या मॅनेजरने सांगताच हॉवर्डनं त्या हॉटेलची डायनिंग रूम रात्रीच्या भाड्याने घेतली व तेथील वाद्यवृंदाला (Orchestra) दोन दिवसांचा पगार देऊन संगीत चालू ठेवण्यास फर्मावलं. केवळ जीनावर 'इंप' मारण्यासाठी त्याने सहा हजार डॉलर्स त्या दोन तासात खर्चले! पण जेवणानंतर जेव्हा त्याने आपली खरी इच्छा प्रकट केली तेव्हा अतिशय कडक शब्दात जीनाने त्याची हजेरी घेतली आणि त्याचा डाव त्याच्यावरच उलटवून तिनं हॉलिवुडचा व अमेरिकेचाही निरोप घेतला! सोफिया लॉरेनलाही असंच पकडून आणण्यात आलं होतं; पण पहिल्याच बैठकीत तिचं नाक प्रमाणाबाहेर लांब आहे, असं सांगून हॉवर्डनं नाक मुरडलं.

सोफिया लॉरेनने वैभवाच्या व प्रसिद्धीच्या शिखरावर असताना वार्ताहरांना दिलेल्या मुलाखतीत स्पष्ट कबुली दिली—

'उमेदवारीच्या काळात हॉलिवुडमध्ये काम मिळविण्याच्या आशेनं मी आले. त्या वेळी हॉवर्डचं नाव तिथं गाजत होतं. त्यामुळेच त्याच्याकडे मी ओढले गेले; पण प्रत्यक्ष भेटीत माझ्या असं लक्षात आलं की, हा जगातील सर्वांत विक्षिप्त अन् चमत्कारिक माणूस असावा!'

## 'लॉकहिड' प्रकरण

सुंदर स्त्रियांचं जसं हॉवर्डला वेड होतं तसंच त्याला विमानांचंही वेड होतं. त्याच्या स्वतःच्या मालकीच्या विमानबांधणीच्या व विमानवाहतुकीच्या कंपन्या होत्या. केवळ आवड म्हणून त्याने निरनिराळ्या तऱ्हेची अनेक विमानं खरेदी केली होती. अशी अनेक विमानं निरनिराळ्या शहरांत भाड्याने घेतलेल्या हँगर्समध्ये उडण्याच्या तयारीत सुसज्ज असत; पण गंमत म्हणजे त्यातील कित्येक विमानं हॉवर्डनं शवटपर्यंत पाहिलीसुद्धा नाहीत! या विमानांचा, त्यांच्या वैमानिकांचा अन् हँगर्सचा खर्च इतका अफाट होता की, त्यात लंका किंवा ब्रह्मदेशासारख्या एखाद्या देशाची पंचवार्षिक योजना पार पाडता आली असती! ह्यूजेस ॲअरक्राफ्ट व TWA या दोन्ही कंपन्या हॉवर्ड जिवंत असेपर्यंत नुकसानीतच चालत होत्या, असं म्हटलं जातं. एकंदरीत विमानधंद्यात तो तोट्यातच होता, असं म्हणतात; पण याच धंद्यात त्याने एकदा आपल्या चातुर्याने साऱ्यांनाच तोंडात बोटं घालायला लावली होती.

एके दिवशी त्याने आपल्या अधिकारीवर्गाला लॉकहिड जेट्स् विमानं विकत घेण्याचा हुकूम फर्मावला. वास्तविक लॉकहिड् कंपनीची जेटस इतर कंपन्यांच्या जेट्स्पेक्षा खूपच महाग होती. त्यामुळे आंतरराष्ट्रीय मार्केटमध्ये त्यांना मागणी नव्हती. ही गोष्ट हॉवर्डच्या निदर्शनास आणली गेली; परंतु कोणाचाही सल्ला न ऐकता त्याने ही जेट्स् विकत घेण्याचा सपाटा लावला. त्याच्या या मूर्ख वागणुकीला नावं ठेवण्यापलीकडे त्याचे अधिकारी काहीच करू शकत नव्हते; पण दोनच वर्षांत अचानक चित्र पालटलं आणि लॉकहिड्सच्या या जेट मॉडेल्सना विलक्षण मागण्या येऊ लागल्या. हॉवर्डने सारी जेट्स् विकून त्यावर प्रचंड नफा मिळविला व विमानधंद्यातील तज्ज्ञ समजल्या जाणाऱ्या उद्योगपतींना त्याने चकित करून सोडलं.

लहान मुलाचं जसं आपल्या खेळण्यावर प्रेम असतं तसं हॉवर्डचं विमानांवर प्रेम होतं, एवढंच नव्हे तर त्यांचं त्याला वेड होतं. मूल जसं आपलं खेळणं दुसऱ्याला देण्यास नाराज असतं तसंच हॉवर्डचंही असे. बोइंग 707 या नव्या जेट्सनी विमानवाहतुकीच्या

धंद्यांत क्रांती केली. साध्या विमानांची जागा आता जेट्स् घेत होती. हॉवर्डला ही जेट्स् विकत घ्यायची होती; पण त्यासाठी करायच्या करारासाठी ५०,००० डॉलर्सची रोख रक्कम त्याला ताबडतोब हवी होती. तेव्हा इतरत्र केलेल्या गुंतवणुकीमुळे इतकी रक्कम हॉवर्डजवळ नव्हती म्हणून त्याने क्लोव्हर फील्ड येथील आपलं एक राजेशाही विमान (Dc-6) हे सौदी अरेबियाच्या राजाला विकत देण्याचं ठरविलं व डिपॉझिट म्हणून त्याच्याकडून पन्नास हजार डॉलर्स घेतले. पुढे बरेच दिवस गेले व सौदीच्या राजाची माणसं उरलेली रक्कम घेऊन विमान ताब्यात घेण्यासाठी हॉवर्डच्या ऑफिसवर चकरा घालू लागली; पण हॉवर्ड काही केल्या दाद देईना. कारण आपलं लाडकं विमान दुसऱ्याला विकून टाकणं त्याच्या जिवावर आलं होतं व आता त्याची पैशाची नडही संपली होती. अखेर सौदी राजाने फारच जोर लावला तेव्हा हॉवर्डने व्याजासह ५०,००० डॉलर्सची रक्कम परत करून हात वर केले. सौदी राजाने मात्र कपाळाला हात लावला !

अवखळ मुलाप्रमाणे जियेतिथे नाक खुपसायची हॉवर्डला सवय होती. आपल्या युद्धोपयोगी इलेक्ट्रॉनिक साधनसामुग्री बनविण्याच्या कारखान्यात त्याने वाजवीपेक्षा जास्ती लक्ष घातल्याने तिथले उत्पादन घटू लागलं. त्याच वेळी अमेरिका कोरियन युद्धाच्या गडबडीत होती. अर्थातच ही गोष्ट त्या वेळचे अध्यक्ष आयसेनहॉवर यांच्या कानांवर घालण्यात आली व युद्धखात्याने त्याची गंभीर दखल घेतली. अध्यक्षांच्या खास सूचनेनुसार श्री. टॅलबोट या वायुखात्याच्या सचिवाने हॉवर्डची भेट घेण्याचा प्रयत्न केला.

'त्याची व्यवस्था लॉस एंजेलिसमधील सर्वोत्कृष्ट हॉटेलात करा अन् त्याला इतक्या 'मजत' ठेवा की त्याला इतर कसलीही आठवण होता कामा नये !' हॉवर्डने आज्ञा केली. हॉवर्डची ही नेहमीचीच पद्धत होती. तीन दिवस वाट पाहून कंटाळून अखेरीस टॅलबोट वॉशिंग्टनला परतला आणि तो कारखाना अमेरिकेच्या एअरफोर्सने ताब्यात घ्यावा, अशी त्याने शिफारस केली. त्याला उत्तर म्हणून हॉवर्डने तो कारखाना आपल्या मेडिकल फौंडेशनला एका दिवसात बक्षिसादाखल देऊन टाकला ! अमेरिकन सरकार अक्षरशः हात चोळीत गप्प बसले !

हॉवर्डला ला व्हेगासचे जितकं जबरदस्त आकर्षण होतं त्याहून अधिक तिटकारा त्याला ला व्हेगास व इतरत्र पसरलेली गुन्हेगार मंडळी व त्यांचे दादालोक यांचेविषयी होता. म्हणूनच त्या लोकांना शह देण्यासाठी त्याने एक नवीनच शक्कल शोधून काढली. ला व्हेगास येथे जुगारांचे प्रचंड अड्डे व दादालोकांच्या अनेक संघटना होत्या. ला व्हेगासजवळ विमानं तयार करण्याचा कारखाना काढण्याचं हॉवर्डनं ठरविलं. तशा हालचालीही सुरू झाल्या. या कारखान्यामुळं जुगाराच्या अड्ड्यांवर परिणाम होऊन आपला धंदा धोक्यात येईल, अशी साधार भीती त्या दादालोकांना वाटू लागली. त्यांनी विरोधी कारवाया करण्यास सुरुवात केली. त्यामुळं हॉवर्डला अधिकच आनंद झाला व तो दुप्पट वेगाने कामास लागला; परंतु कुठे तरी माशी शिंकली व अखेर हॉवर्डच्या दुर्दैवाने व दादालोकांच्या सुदैवाने ही योजना बारगळली !

१९५४ साली R K O स्टुडिओत झालेल्या संपात त्याने शिकॅगो येथील दोन 'दादा' लोकांना ओढून त्यांचं परस्परात भांडण लावून दिलं. दोघांकडूनही त्याने भरपूर पैसे घेतले व संप न मोडताच त्याने R K O हा स्टुडिओ जनरल टायर व रबर कंपनीला विकून टाकला. अशा रीतीने त्याने स्वतः लोणी मटकावून दोन्ही 'दादां'च्या टाळूवरून हात फिरवला.

मॅथ्यू व रोझेली या दोन अतिशय धाडसी व हुशार माणसांना हॉवर्डने आपल्या सेवेत रुजू करून घेतलं होतं. यापैकी मॅथ्यू हा पूर्वी FBI चा हस्तक होता तर रोझेली हा CIA चा हस्तक होता. या दोघांनी हॉवर्डच्या मरणानंतर वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीत स्पष्ट म्हटले आहे.

'अमेरिकन सरकार व हॉवर्ड ह्यूजेस यांच्यात मध्यस्थाची भूमिका आम्हाला नेहमी बजावावी लागे. बड्या प्रस्थांना लागणारी 'मदत' आम्हीच मिळवीत असू.' त्यामुळेच हॉवर्डच्या वेड्यावाकड्या वर्तनाचा अमेरिकन सरकार फार कसोशीने जाब विचारीत नसे. नेवाडातील अणुचाचण्या थांबविण्यासाठी हुबर्ट हॅम्प्री या तत्कालीन उपाध्यक्षांना हॉवर्डने ५०,००० डॉलर्सची लाच दिली होती, असं म्हटलं जातं. अध्यक्षपदासाठी पक्षातर्फे जाहीर झालेल्या उमेदवारांच्या यादीत हॅम्प्रीचं नाव सर्वांत वर होतं; पण या भानगडीमुळं उठलेल्या वादळात हॅम्प्रीने ती सुवर्णसंधी गमावली एवढं खरं. क्यूबाच्या कॅस्ट्रोला मारण्याचा जो कट होता त्यामागे हॉवर्डचे दूत होते, असंही म्हटलं जातं.

एका नव्या विमानाची चाचणी घेण्यासाठी हॉवर्ड रोज फोनिक्स ते लॉस एंजेलिस अशा त्या विमानातून वैमानिकासह फेऱ्या मारीत असे. याच विमानात शवपेटिकेसारखी दिसणारी एक अवजड, लांबरुंद पेटी असे. अर्थात ती कुलपं लावून व्यवस्थित बंद केली जात असे व प्रत्येक फेरीनंतर ती हॉवर्डबरोबरच खाली उतरविली जात असे. प्रथम लोकांना वाटलं की, तो एखादा विमानाचा नवा इलेक्ट्रॉनिक गिअर चाचणीसाठी बरोबर नेण्यात येत असावा; पण काही दिवसांनंतर अशी जोरदार अफवा पसरली की, हॉवर्डने आपल्या एखाद्या प्रेमपात्राचा खून करून तिचं प्रेत त्या पेटीत दडवून ठेवलं आहे. या अफवेने इतका जोर केला की, अखेर एकदा हॉवर्ड विमानतळावरील विश्रांतिगृहात गेल्याचे पाहून एका गुप्तहेराने चार लोकांना मदतीला घेऊन ती पेटी उघडली. आतून एखादा भयानक प्रकार बाहेर पडला तर आपण हॉवर्डला वाटेल तसं नाचवू शकू या स्वप्नात रंगलेल्या त्या गुप्तहेराने पेटीचे झाकण उघडलं मात्र...अन् त्याचा चेहरा फोटो काढण्यालायक झाला ! त्या पेटीतून कॉमिक्सची शेकडो मासिकं, पुस्तकं व चित्रं बाहेर पडली. हॉवर्डने घेतलेली ही फिरकी एकदम जालीम होती. कारण वर्तमानपत्रे, मासिके व टी. व्ही. यांना अनेक दिवस हा चर्चेचा व करमणुकीचा विषय होऊन बसला होता. झोपण्यापूर्वी कॉमिक्स वाचण्याचा त्याला नाद होता. त्याशिवाय त्याला झोप येत नसे.

## वाढती विकृती

हॉवर्डचा एक खास न्हावी होता. फेअरफॅक्स अॅव्हेन्यूवर त्याचं एक छोटंसं दुकान होतं. वास्तविक हॉवर्ड नेहमी फिरतीवर असल्याने प्रत्येक गावात न्हाव्याची सोय करण्यात येत असे; पण हा न्हावी

'स्टॅन्डबाय' म्हणून ठेवण्यात आला होता. त्याला पार्टटाइम जॉब देण्यात आला होता; पण पुढे पुढे हॉवर्डच्या मनात असं आलं की, आपल्या मनात येईल तेव्हा न्हाव्याने हजर झालं पाहिजे. म्हणून भरपूर पगारावर (महिन्याला २०,००० रु. ) त्याची कायम नेमणूक करून टाकण्यात आली. हा न्हावी सकाळी आठला हजर होई तो सायंकाळी परत जात असे. मधल्या वेळात कोडी सोडवणं, मासिकं चाळणं, टी. व्ही. पाहणं आणि फेऱ्या मारणं हेच काम तो करीत असे. पहिले काही महिने ठीक चाललं; परंतु नंतर नंतर हॉवर्डच्या मनात नवीनच भीती निर्माण झाली. आपल्या शरिरावरचा कोणताही भाग नाहीसा होणे वा काढून टाकणे म्हणजे मृत्यूला जवळ जाणे, अशा विचित्र भावनेनं त्याच्या मनात घर केलं. केस कापणं वा दाढी करणं हे त्यानं टाळायला सुरुवात केली. एवढंच नव्हे तर आपली नखंसुद्धा तो काढून घेईना. त्यामुळे न्हाव्याने विचारताच हॉवर्डचे खास सेवक वेगवेगळी उत्तरं देत. 'आज हॉवर्डची इच्छा नाही, आज त्याला वेळ नाही, आज एका खास मीटिंगला जायचं आहे,' अशा उत्तरांनी कंटाळून गेलेला तो न्हावी सहा महिन्यात हॉवर्डचे केसच काय पण नखही पहायला न मिळाल्याने अतिशय वैतागला अन् खाडकन् त्याने एके दिवशी राजीनामा दिला.

'जा. एखादा नवा न्हावी मिळतो का पहा आणि त्याला हॅवार्ड ह्यूजेस हे नाव सांगू नका. कारण आपण कोणासाठी काम करणार आहोत हे कळल्यावर तो उगीच जास्ती पैसा मागेल!' हॉवर्डने सेवकांना आज्ञा दिली. हॉवर्डचं नाव न ऐकलेला एक तरुण न्हावी मिळविण्यात अखेर त्याच्या सेवकांना यश आलं; पण तोही न्हावी सहा महिन्यांत कंटाळून निघून गेला!

वर्षभरानंतर दाढी अन् केस वाढलेला हॉवर्ड म्हणजे एक अवतारच होऊन बसला होता. जीन पीटर्स व इतर साऱ्यांनी विनवणी करूनही तो केशकर्तनाचं बिलकूल मनावर घेईना. तेव्हा एक दिवस अतिशय वैतागून जीनने स्वतःच त्याच्या खोलीत जाऊन त्याचे केस कापण्यास सुरुवात केली. हॉवर्डने तिला लाखोली वाहिली, विरोध केला अन् विनवण्याही केल्या; पण जीनने कशालाच दाद दिली नाही. हा हॉवर्डचा शेवटचाच 'हेअरकट' ठरला. कारण त्यानंतर मात्र त्याने कोणालाच आपल्या केसांना हात लावू दिला नाही.

वाढत्या वयाबरोबर त्याच्या मनाच्या विकृतीही वाढत होत्या. आता त्याच्या मनानं एक नवंच वेड घेतलं. केस, दाढी, नखं तर वाढविली होतीच; पण आता तो आपली लघवीही ड्रेनेजमध्ये जाऊ देईना. मोठमोठ्या प्लॅस्टिकच्या बाटल्यांमध्ये लघवी करून त्या तशाच साठवून ठेवण्याची त्याने आज्ञा केली. त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या तळघरात लघवीने भरलेल्या शेकडो बाटल्या सापडल्या. आपलं 'शौच' तो दररोज लॅबोरेटरीकडे पाठवून त्याची तपासणी करून घेत असे. त्यात काही बदल दिसून आला तर फोनवरून आपल्या आहारतज्ज्ञांशी चर्चा करून हॉवर्ड आहारात बदल करीत असे. तसंच आपल्या अंगावरचा मळसुद्धा जाऊ नये म्हणून तो महिनोंमहिने आंघोळीला फाटा देऊ लागला.

हॉवर्ड तासन्तास आपल्या खोलीत बसून राहू लागला. त्यातला बराच वेळ तो निरनिराळे सिनेमे छोटया पडद्यावर प्रोजेक्ट करून पहाण्यात घालवी. हा त्याचा एक आवडता छंद होता. काही वेळा कॉमिक्स वाचणं वा वर्तमानपत्रं चाळणं यात तो वेळ घालवी. त्याच्या खोलीत प्रवेश करण्याची फक्त त्याच्या बायकोला व काही खास सेवकांना परवानगी होती; परंतु काही दिवसांनी आपल्याला जंतु-बाधा होईल, या भीतीने त्याने सर्वांनाच खोलीत येण्यास बंदी केली. त्याचे जेवण, नाश्ता, चहा इत्यादि एका 'सर्व्हिस विंडो'तून आत पाठविण्यात येऊ लागले.

## जीनचा वियोग

एकदा जबरदस्तीने खोलीत घुसलेल्या जीनला त्याचं हे नवं रूप पाहून अक्षरशः वेड लागण्याची पाळी आली. हॉवर्डने अनेक दिवस आंघोळ न केल्याने त्या खोलीत उग्र दर्प पसरलेला असे. दिवसेंदिवस त्याचं वेड वाढत चाललेलं पाहून जीनने त्याचं घर सोडलं आणि आपल्या वकिलामार्फत घटस्फोटासाठी अर्ज केला. वार्ताहरांशी बोलताना तिनं सांगितलं,

'त्या दिवशी मी त्याच्या खोलीत प्रवेश केला अन् मला धक्काच बसला! दारं-खिडक्या बंद्र केलेल्या त्या खोलीत घाणेरडा वास पसरलेला होता. अनेक दिवस स्नान न केल्याने त्याच्या अंगाला दुर्गंधी येत होती. त्याचे केस कंबरेपर्यंत वाढले होते व दाढी पोटावर रुळत होती. त्याची नखं सहा-सहा इंच वाढली होती. कमरेभोवती छोटासा टॉवेल गुंडाळून ध्यानस्थ बसलेल्या एखाद्या योग्याप्रमाणे तो समोर रोखून पहात बसला होता. कित्येक दिवस खाणं कमी केल्यामुळे तो बराच वाळला होता.

'हॉवर्ड, या खिडक्या उघडून स्वच्छ व ताजी हवा आत घेऊ या. तुला जरा बरं वाटेल. काय अवस्था करून घेतलीस ही!' असं म्हणून मी खिडकीला हात घालताच तो आमच्या अकरा वर्षांच्या संसारात प्रथमच माझ्यावर जोराने ओरडला.

'थांब. थांब! त्या खिडक्या उघडण्याचं धाडस करू नकोस. नाही तर मी तुला बाहेर फेकून देईन! जा चालती हो इथून!' हॉवर्ड कितीही विचित्र वागत असला तरी त्याने माझ्याशी असं वर्तन कधीच केलं नव्हतं. त्यामुळे मी रडतच बाहेर पडले अन् त्याच क्षणी हॉवर्डपासून वेगळं व्हायचा निर्णय घेतला. अशा मूर्ख अन् विक्षिप्त माणसाबरोबर मी इतकी वर्षं कशी काय राहू शकले याचंच मला आश्चर्य वाटतं.'

'त्याच्या विक्षिप्तपणाचं आणखी एखादं उदाहरण तुम्ही सांगू शकाल का?' एका स्त्री-वार्ताहरानं जीनला विचारलं.

'हो. फारच मजेशीर गोष्ट आहे ती! हॉवर्डला मूळव्याधीचा त्रास अनेक वर्षं होत होता. डॉक्टर्सनी त्याला ऑपरेशन करून घेण्यास सांगितलं होतं; पण त्याने ऑपरेशनची भीती घेतली होती. ऑपरेशनच्या वेळी आपल्याला मारून टाकलं जाईल, अशी वेडी भीती त्याच्या मनात होती म्हणून त्यानं ह्या सल्ल्याकडे साफ दुर्लक्ष केलं; परंतु पुढेपुढे त्याला फारच त्रास होऊ लागला. मी त्याची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. मनधरणी केली. विनवण्या केल्या. अखेर मी हे घर सोडून निघून जाईन, अशी धमकी दिल्यावर त्याने ऑपरेशन करून घेण्याचे मान्य केलं. त्याप्रमाणे त्याने फोनवरून सर्व व्यवस्था केली व एके दिवशी सर्व तयारीने तो बोस्टनकडे रवाना झाला. मात्र मी बरोबर यायचं नाही, अशी त्याने अट घातली. नाइलाजाने मला

ती मान्य करावीच लागली. नंतर चार दिवसांनी मी त्याने दिलेल्या नंबरवर फोन केला. तेव्हा हॉवर्डच फोनवरून माझ्याशी बोलला. ऑपरेशन व्यवस्थित झालं, आपल्याला कोणताच त्रास झाला नाही, आता प्रकृति सुधारत आहे, असंही त्याने सांगितलं. ऑपरेशन करणाऱ्या सर्जनचं त्याने बरंच कौतुक केलं; पण नंतर मला काहीसा संशय येऊन मी बोस्टनला गेले. तिथे त्याने सांगितलेल्या क्लिनिकवर चौकशी करताच तेथे हॉवर्ड आलाच नाही असं कळलं. तेव्हा मी बोस्टनमधील आमच्या मालकीच्या हॉटेलवर गेले तिथे स्वारी कॉमिक्स वाचीत आणि सिनेमा पाहात वरच्या मजल्यावर आरामात दिवस घालवीत होती. कुठलं ऑपरेशन अन् कुठलं काय, साराच मामला बनवाबनवीचा ! माझ्या समजुतीखातर त्यानं हे नाटक केलं होतं.'

'यापुढं तुमचा विचार काय आहे ?' वार्ताहराचा उत्सुक प्रश्न.

'घटस्फोट मिळाल्यानंतरच मी या गोष्टीचा विचार करू शकेन!' जीन पीटर्स.

'तुमच्या नावे एखादी मोठी इस्टेट वगैरे करून घेण्याची व्यवस्था तुम्ही केली आहे काय ?' वार्ताहर.

'हॉवर्ड जगातील श्रीमंतांपैकी एक असला तरी त्याच्याइतका कंजूष व धोरणी मनुष्य दुसरा नसेल ! पाहिजे तिथे हात सैल सोडायचे आणि नको तिथे मुठी बंद ठेवायचं ज्ञान त्याला चांगलं आहे.' जीननं उपरोधिक उत्तर दिले.

'म्हणजे तुम्हाला नक्की काय म्हणायचं आहे ?' वार्ताहर.

'सुंदर स्त्रीवर तो वाटेल तेवढे पैसे उधळतो !' जीन.

'म्हणजेच तुमच्यावरही त्याने पैसे उधळलेच असणार...'

'हां... एके काळी उधळले... म्हणजे लग्न होण्यापूर्वी.' जीनने निश्वास टाकीत उत्तर दिलं.

'मग लग्न मोडल्यानंतर तो खर्च करील का ?' वार्ताहर.

'कायदा त्याला खर्च करण्यास भाग पाडील !' जीनने उत्तर दिलं व मुलाखत संपल्याचं सूचित केलं.

जीन पीटर्सने पुढे स्टॅन हॉफ या विधुराशी लग्न केले.

...जीन हॉवर्डला सोडून गेली आणि त्याचा जगाशी जोडणारा एकुलता एक धागा तुटला. हॉवर्ड आता अधिकच एकलकोंडा बनला.

याच काळात हॉवर्डने ला व्हेगासमध्ये इस्टेटी खरीदण्याचा सपाटा लावला. त्याने ला व्हेगास व आसपास इतकी मालमत्ता, जमिनी, कुरणे व इमारती खरीदल्या की तिथे विकण्यासाठी प्रॉपर्टीच शिल्लक उरली नाही! ला व्हेगासविषयी त्याला वाटणारं जबरदस्त आकर्षण हे एक न सुटणारं कोडं होतं !

त्याच वेळी तो राजकारणातही बराच रस घेऊ लागला. रिपब्लिकन पक्षाचा नेवाडाचा गव्हर्नर पॉल लेक्साल्ट याला अमेरिकेच्या अध्यक्षपदाचे तिकीट मिळवून देण्यासाठी त्याने पाण्यासारखा पैसा खर्च केला; पण त्याचा उपयोग झाला नाही. हुबर्ट हँफ्रीला अणुचाचण्यांचे स्फोट थांबविण्यासाठी दिलेली लाचही अशीच फुकट गेली. मग मात्र त्याने सुज्ञपणे राजकारणातून अंग काढून घेतलं.

या सुमारास क्लिफर्ड आयरविंगने प्रसिद्ध केलेलं हॉवर्ड ह्यूजेसचं आत्मचरित्र म्हणजे 'शुद्ध बनवाबनवीचा प्रकार आहे,' असं एक खास प्रेसकॉन्फरन्स बोलावून त्याने वार्ताहरांना सांगितलं. वास्तविक हॉवर्डनेच आयरविंगला आपले आत्मचरित्र प्रसिद्ध करायला सांगितलं होतं व त्यासाठी पैसेही दिले होते, असं म्हणतात. पुढे वर्षभर अमेरिकेतील वर्तमानपत्रांत ह्या आत्मचरित्राचा वाद गाजत होता. या पुस्तकाच्या लाखो प्रती खपल्यानंतर आयरविंगने एक खास प्रेस कॉन्फरन्स बोलावून टेपरेकॉर्डरवर ध्वनिमुद्रित झालेल्या हॉवर्डच्या अनेक टेप्स ऐकविल्यानंतर हे वादळ शमलं. हे आत्मचरित्र हॉवर्डच्याच प्रेरणेनं तयार केलं होतं, तरी ते खरं नाही असं म्हणण्यात हॉवर्डचा काय हेतू होता ? लोकांपासून दूर राहूनही प्रसिद्धीचे प्रकाशझोत आपल्याभोवती फिरत रहावेत, म्हणूनच हा स्टंट त्याने केला असावा, असा तर्क केला जातो.

## कामदेवाचा दैवदुर्विलास

...एक दिवस रेडिओ, T. V. आणि वृत्तपत्रांनी बातमी दिली. 'आपल्या राजेशाही विमानातून टेक्सासहून मेक्सिकोला जात असता हॉवर्ड ह्यूजेस मरण पावला !'

पण अमेरिकन लोकांचा त्यावर विश्वास बसला नाही. कारण त्याच्या अंत्यदर्शनाचे फोटो कुठेही पहावयास मिळू शकले नाहीत. त्यामुळे ही सुद्धा एक लोणकढी असावी, असं लोकांना वाटलं; परंतु तीन दिवसांनंतर जाहीर करण्यात आलं. 'या विमानातून जी व्यक्ती मृतावस्थेत बाहेर काढण्यात आली तिच्या हाताचे ठसे हॉवर्डच्या हाताच्या ठशांशी जुळणारे होते !' त्यानंतर करण्यात आलेल्या पोस्टमार्टेमचा अहवाल शेवटपर्यंत गुप्तच ठेवण्यात आला. त्याच्या जीवनाप्रमाणेच त्याचा मृत्यूही रहस्यमयच ठरला !

वयाच्या सत्तराव्या वर्षी हॉवर्डने या नश्वर जगाचा निरोप घेतला; पण त्याआधी कित्येक वर्षं त्याने भयानक असा एकांतवास पत्करला होता. आपल्या अफाट ऐश्वर्याकडे पाठ फिरविण्याचं त्याच्या जिवावर आलं असावं. समृद्धीच्या समुद्रात अखंड पोहत असणाऱ्या माणसाची जीवननौका शेवटच्या काळात अक्षरशः शीड तुटलेल्या जहाजाप्रमाणे सैरभैर झाली होती. देह नष्ट होण्याच्या वा मृत्यूच्या कल्पनेने त्याला जगावेगळ्या अनेक विकृतींनी पछाडलं आणि त्यांनी हॉवर्डचा भयानक रीतीने बळी घेतला! १९२४ साली केवळ ७५०,००० डॉलर्सवर सुरुवात करून त्याने आपल्या अफाट बुद्धिमत्तेने अडीच अब्ज डॉलर्सची संपत्ती गोळा केली. एवढ्या प्रचंड संपत्तीला, अफाट वैभवाला अन् अलोट ऐश्वर्याला पाठ दाखवून अनंतात विलीन होण्याची कल्पनाच त्याला असह्य झाली असणार ! म्हणूनच म्हणतात की, निष्कांचन भिकाऱ्याला मृत्यु सुसह्य होतो एवढंच नव्हे तर आनंददायी ठरतो. कारण त्याला त्याग करायचा असतो दारिद्र्याचा, दुःखाचा अन् दैन्याचा !

शेकडो वा हजारो स्त्रियांबरोबर वावरणाऱ्या या आधुनिक कामदेवाच्या अखेरच्या काळात एकही स्त्री त्याच्याजवळ नव्हती ! या दैवदुर्विलासाला काय म्हणावं ? कुबेराने हेवा करावा अशी अफाट संपत्ती असणारा हा माणूस बेवारशी मरावा हीही एक विचित्र विधिघटनाच म्हणावी लागेल ! तो गेला तेव्हा एकाही माणसाच्या डोळ्यात अश्रू आले नाहीत की एकाही माणसाला आनंद झाला नाही. त्याच्या मित्रांना त्याच्या मृत्यूचे दुःख झालं नाही किंवा त्याच्या शत्रूंना सुख झालं नाही. कारण हा जगावेगळा विक्षिप्त अन् चमत्कारिक लक्ष्मीपुत्र खऱ्या अर्थानं कुणाला कळूच शकला नाही ! त्याचं जीवन म्हणजे एक अफलातून अफवा होती की अद्भुत सत्यकथा होती हे जरी निश्चितपणे कोणाला सांगता आले नाही तरी त्याचा मृत्यू म्हणजे एक विदारक शोकांतिका होती हे मात्र खरे ! ☐

# पुरुषोत्तम करंडकाची तीन वर्षे

## एक धावता आढावा

यंदाच्या आंतरमहाविद्यालयीन पुरुषोत्तम करंडक एकांकिका स्पर्धेची चर्चा गेल्या आठवड्याच्या अंकात केली आहेच. प्रस्तुतच्या लेखात या स्पर्धेच्या गेल्या तीन वर्षांचा धावता आढावा घेण्याचा प्रयत्न करणार आहे. उद्देश असा की, महाविद्यालयीन तरुणांचं नाटचविषयक आकर्षण किती आणि कोणत्या प्रकारचं आहे आणि त्यांना त्याविषयीची प्रत्यक्ष समज किती आहे याचा काही तरी अंदाज यावा. तसंच, गेली दोन-तीन वर्षं ह्या दर्जा दुर्दैवाने खालावतच चालला आहे, असं मत सर्वसाधारणपणे व्यक्त होताना दिसतं. तेव्हा त्याची कारणंही या निमित्तानं शोधण्याचा हा एक प्रयत्न आहे.

### एकांकिकांची निवड

योग्य एकांकिकेची निवड ह्या कोणत्याही एकांकिका स्पर्धेतील अत्यंत प्राथमिक मुद्दा असतो. त्या दृष्टीने विचार केला तर असं दिसून येतं की, गल्या तीन वर्षांत या स्पर्धेमध्ये 'बळी', 'खलित्यांची लढाई', 'झुलता पूल', 'कुणी गोविंद घ्या' यासारख्या १९६३–६४ सालापासून सादर केल्या जाणाऱ्या एकांकिका अजूनही नव्या दमाने सादर केल्या गेल्या आहेत. तसच 'जनावर', 'सत्य', 'फोन करण्यापूर्वी', 'रक्तपुष्प' या एकांकिका महाविद्यालयीन तरुणांना वारंवार आकर्षित करताना दिसतात. 'रक्त पुष्प' ही एकांकिका तर एकाच वर्षी दोन सर्वांनी सादर केली. अर्थात या वर्षानुवर्ष चालणाऱ्या एकांकिकांबरोबरच विद्यार्थी-लेखकांच्या एकांकिकांनी गेल्या तीन वर्षांत एक वेगळंच वारं निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. बी. जे. च्या राजीव आडकरची 'अर्धावर्त्ती' (१९७६), प्रभाकर वाडेकरच्या 'अर्थ काय या बंबोंचा विश्वचक्री', (१९७६), 'हिरवा कोंब फुटण्यापूर्वी / नंतर अर्थात मंथन' (१९७७) आणि 'ओंडका' व 'अथपासून इतिपर्यंत' (१९७८), उमेश देशपांडेची 'भोलेश्वर नगरीचा भोलेनाथ राजा' (१९७७), फर्गसनच्या विद्यासागर महाजन आणि रेखा इनामदारची 'आदिताल' (१९७७), अजय क्षणकरची 'साहू ऽऽस्नवा ऽऽट' (१९७७) आणि रवींद्र सरदेसाईची 'स्ट्रे बर्ड्स' (१९७८) या त्यातील काही उल्लेखनीय एकांकिका. या एकांकिकांपैकी 'भोलेश्वर-नगरीचा भोलेनाथ राजा' आणि 'स्ट्रे बर्ड्स' या दोन एकांकिका वगळता इतर एकांकिकांचा दुर्बोधता हा एक महत्त्वाचा विशेष आहे. वाडेकर तर त्यासाठी प्रसिद्ध आहेच, पण त्याच्याच पावलावर पाऊल टाकून अजय क्षणकर आणि राजीव आडकरही जाताना दिसतात. किंबहुना या लेखकांच्या वर उल्लेखिलेल्या एकांकिका संपूर्णपणे समजल्याचा दावा कोणी करू शकेल (खुद्द लेखकांव्यतिरिक्त) असं वाटत नाही. अर्थात प्रेक्षकांसमोर नक्की काय आणि कस ठेवायचं हे न समजल्यामुळेच ही दुर्बोधता निर्माण झाली असेल, असं छातीठोकपणे म्हणता येणार नाही. कारण हल्ली बरेच तरुण लेखक किंवा कवीही, आपलं लेखन वाचणाऱ्याला किंवा ऐकणाऱ्याला पूर्णपणे समजणं, ह्या लेखनातला कमीपणाच मानीत असल्यासारखे दिसतात. 'भोलेश्वर-नगरीचा भोलेनाथ राजा' ही एकांकिका या पार्श्वभूमीवर एकदम उठून दिसली. कारण ती सुबोध तर होतीच, शिवाय तिचा आकृतिबंध वगाच्या अंगाने जाणारा होता. त्या दृष्टीने तिच्यामधील प्रयोगक्षमताही उल्लेखनीय होती. वग म्हटल्यावर येणारं काव्य, विनोद, यातही उमेश देशपांडे कमी पडला नव्हता. धंदेवाईक एकांकिका-लेखकांपैकी रत्नाकर मतकरी सर्वांत जास्त विद्यार्थीप्रिय दिसतात. गेल्या तीन वर्षांत त्यांच्या सहा एकांकिका (त्यांपैकी यंदा पाच!) सादर केल्या गेल्या. त्याखालोखाल विजय तेंडुलकरांचा नंबर लागतो – चार एकांकिका पण या निवडल्या जाणाऱ्या एकांकिकांमध्ये हाताळलेले बहुतेक विषय दैनंदिन जीवनातले, फारसे नाविन्य नसलेले असेच दिसतात. त्यातल्या त्यात मग वामन तावडेंच्या 'द कन्स्ट्रक्शन', 'पिंदी', प्रभाकर धोटेंची 'कैद', रत्नाकर मतकरींची 'अंधारवाडा', विजय कारेकरांची 'पुरुषराव', विजय तेंडूलकरांची 'रात्र' अशा काही थोड्याच एकांकिका त्यातल्या विषयाच्या वेगळेपणामुळे 'अपील' होतात.

### पात्रं – महत्त्वाचा फॅक्टर

एकांकिकेमधील पात्रं हाही एक महत्त्वाचा फॅक्टर. पात्रांची निवड जर योग्य नसेल तर एकांकिका फार मोठ्या प्रमाणावर अयशस्वी होते. विशेषत: पात्राचं वर्णन करणारी वाक्यं काही वेळा एकांकिकेत असतात. अशा वेळी प्रत्यक्षातलं पात्र जर त्या वर्णनाशी किमान साम्य राखून नसेल तर सबंध एकांकिका एका क्षणात विनोदी होऊन जाते. तसंच त्या रोलचा आणि पात्राच्या आकाराचा आवाजाचाही काळजीपूर्वक विचार करावा लागतो. हे सगळं जर नीट जुळून आलं तर एक सुंदर charcter उभं राहतं. १९७६ साली शाहू कॉलेजची 'द कन्स्ट्रक्शन', गेल्या वर्षी बी. जे. ची 'कैद', पुणे विद्यापीठाची 'रक्तपुष्प', अभिनव कलाची 'पिंदी' आणि यंदाच्या वर्षी स. प. कॉलेजची 'पुरुषराव', इंजिनिअरिंगची 'स्ट्रे बर्ड्स्' आणि शाहू कॉलेजचा 'नारदा, अवतार घ्यायलाच हवा' या एकांकिका त्या दृष्टीने निश्चितच उल्लेखनीय आहेत.

संवाद प्रेक्षकांपर्यंत प्रभावीपणे पोचविण्याची कलाही फारच थोड्या महाविद्यालयीन कलाकारांमध्ये दिसते. किंबहुना 'रात्र', 'अंधारवाडा' यासारख्या एकांकिका त्यातील कलाकारांकडे हा गुण नसल्यामुळे जास्त अयशस्वी झाल्या. पात्रांच्या संदर्भातील आणखी एक लहानसा मुद्दा इथेच विचारात घेतो. गेली तीन वर्षं असं लक्षात येतंय की, बहुतेक एकांकिकांमधील किमान एक तरी पात्र स्टेजवर एखादी तरी सिगारेट शिलगावून, धूर सोडीत डायलॉग टाकीत राहातं. आक्षेप त्याबद्दल नाही; पण बऱ्याच वेळा

असं वाटतं की, हे करत असताना स्टेजव-वरच्या प्रत्येक हालचालीला महत्त्व असतं, हे ही मंडळी विसरूनच गेलेली असतात. सिगरेट ओढण्याच्या पद्धतीबाबत असा एक संकेत आहे की, पात्र जर विचारात दंग आहे, अस्वस्थ आहे असं दाखवायचं असेल तर ते सिगरेटचा धूर सावकाश, जमिनीच्या दिशेने सोडीत राहातं आणि जर स्वभावातील किंवा वागण्यातील बेफिकिरी दाखवायची असेल तर ते वर तोंड करून हवेत धूर सोडीत राहातं. पण सर्वसाधारणपणे यांपैकी कोणतीच गोष्ट हल्लीच्या या सिगरेट ओढणाऱ्या पात्रांना सुचवायची नसते. ते आपला दोन संवादांमध्ये पॉज घेण्याऐवजी सिगरेटचा झुरका मारतात. फक्त १९७६ साली वाडिया कॉमर्स कॉलेजच्या 'क्रांतिदूत' या एकांकिकेत गांधीजींच्या पुतळ्यावर सिगरेटचा अर्थपूर्ण धूर सोडण्यात आला होता.

### निनावी पात्रं – सामूहिक हालचाली

निनावी पात्रं हा हल्लीच्या एकांकिकांमधील आणखी एक नवा बदल. त्याचा एक हेतू Impersonalization हा असू शकेल; पण त्याचबरोबर तथाकथित आधुनिक नाट्यतंत्रानुसार एकेका एकांकिकेत गट 'अ', गट 'ब' अशी मिळून १८–१८ पात्रं असण्याचाही हा परिणाम असेल. गेल्या वर्षी 'बूटपॉलिश' या एकांकिकेत एकूण २७ तर 'साहू ऽऽ स्नवाऽऽट'मध्ये २५ आणि १९७६ सालच्या वाडिया कॉलेजच्या 'क्रांतिदूत'मध्ये २३ पात्रं होती. शिवाय यातील निम्म्याहून अधिक पात्रांचं काम सामूहिक हालचालींचंच! अशी निनावी पात्रं १९७६ साली २२ होती; गेल्या वर्षी ही संख्या ८७ वर गेली; यंदा ती ६४ पर्यंत उतरली आहे. प्रथम प्रथम या सामूहिक हालचाली, एका वेळी २५–२५ पात्रं स्टेजवर वावरणं प्रभावी वाटायचं; पण आता त्यांच्यामध्ये तोचतोचपणा येत चालला आहे. स्टेजवरच्या प्रत्येक पात्राचं स्टेजवर असणं किंवा नसणं याला महत्त्व असतं; पण या वाढत्या संख्येबरोबर हे महत्त्व घटत चालल्यासारखं वाटतं. एका विशिष्ट नाटकात पंचवीसच पात्रं का घेतली, चोवीस का नाही किंवा सव्वीस का नाही, याचं पटेलसं स्पष्टीकरण किती दिग्दर्शक देऊ शकतील याची शंकाच आहे. सामूहिक हालचालींमध्ये नृत्य ('स्पर्धेतलं नाटक', 'भोलेश्वरनगरीचा भोलेनाथ राजा', 'चिऊताई, चिऊताई दार उघड', 'घेराओ') बस किंवा लोकलमधील प्रवासी ('अर्थ काय या बेंबीचा विश्वचक्री'), क्यूमध्ये उभे असणारे नागरिक ('तुमचे आमुचे गाणे', 'चिऊताई, चिऊताई...' 'वेटिंग फॉर घासलेट') श्रमिक ('अस अँड देम', 'इतिहास', 'अप टू द एंड') रस्त्याने जाणारे वाटसरू ('अर्थ काय...' 'बूटपॉलिश', 'ओंडका') एखाद्या व्यक्तीला केली जाणारी मारपीट ('अर्थ काय...', 'साहूऽऽ स्नवाऽऽ ट') यासारख्या हालचाली प्रामुख्याने आढळतात.

सामूहिक हालचालींबरोबरच miming आणि 'स्टील इफेक्टस्' हे एकांकिकांचं आणखी एक वैशिष्ट्य! चहा पिण्यापासून घमेलं डोक्यावर चढवण्यापर्यंतच्या बहुतेक क्रिया हल्ली miming द्वाराच व्यक्त केल्या जातात; पण काही वेळा त्या ठिकाणी प्रत्यक्ष वस्तू असत्या तर हालचाल कशी घडली असती, याचं भान सुटतं; उदाहरणार्थ यंदा बी. जे. च्या 'इतिहास' या एकांकिकेत एक पात्र जमिनीवरून घमेलं उचलून दुसऱ्या पात्राच्या डोक्यावर देतं; पण असं करीत असताना त्याचे हात अशा तऱ्हेने खालून वर जात होते की, त्याच्या हातात जर खरंच घमेलं असतं तर ते दुसऱ्या पात्राच्या डोक्यावर चढवता चढवता त्या पात्राच्या चेहेऱ्याला घासतच वर गेलं असतं. miming चा अगदी वस्तुपाठ म्हणता येईल असं प्रदर्शन इंजिनिअरिंग कॉलेजच्या अच्युत वाटवे आणि दिलीप कुलकर्णी यांनी १९७६ साली म्हें हें हें ऽऽ या एकांकिकेद्वारा घडवलं होतं. टी. व्ही. वर काही वेळा चित्राऐवजी येणाऱ्या वेव्हज्सुद्धा या जोडीने miming द्वारा अप्रतिम दाखवल्या.

'स्टील इफेक्टस्' हा या स्पर्धेतल्या एकांकिकांमध्ये फारसा विचार न करता miming सारखाच सर्रास वापरला जाणारा प्रकार! कधीही नाही तर किमान एकांकितेतील पात्र–परिचय विंगमधून करून दिला जात असताना तरी हा इफेक्ट हल्ली हमखास वापरला जातो. काही काही वेळा नवा सीन चालू झाल्यावर आधीच्या सीनमधील पात्रं उगीचच असतील त्या पोझिशनमध्ये जखडून ठेवली जातात. ('नारदा अवतार घ्यायलाच हवा', 'गारदी', 'सुरस आणि चमत्कारिक') अशा वेळी टायपिस्टने टाइपिंग करता करता एकदम हात थांबवून कुणाला तरी बोचकारण्याच्या आविर्भावात सज्ज होऊन बसणं त्रासदायक वाटतं. १९७६ साली 'वेटिंग फॉर घासलेट' मध्ये एक चिरंजीव तर सबंध पाऊण तास चौथऱ्यावर नेत्याच्या वेषात आणि आवेशात उभे होते. यामुळे होतं असं की, शरीराला रग लागायला लागली की ही पात्रं थरथरू लागतात आणि मग ते फारच विनोदी दिसतं.

### लेव्हल्स्

या सगळ्याबरोबरच लेव्हल्स्चा वापर हल्ली अतोनात वाढला आहे. बहुतेक एकांकिकांमधून अशा लेव्हल्स् टाकलेल्या असतात आणि त्यांचा वापर उगीचच चढून उतरायला केला जातो. भावनिक किंवा अन्य कोणत्या तरी स्थित्यंतराचं निदर्शक म्हणून या लेव्हल्स् वापरायच्या असतात, हे कित्येक दिग्दर्शकांना ठाऊकच नसतं की काय, असं बऱ्याच वेळा वाटतं. उदाहरणार्थ सिम्बॉयसिस लॉ कॉलेजच्या 'सत्य' या एकांकिकेत सबंध स्टेजवर या विंगेपासून त्या विंगेपर्यंत आरपार जाणारी लेव्हल टाकलेली होती. तिचा उपयोग एकांकिकेतील पात्रं उगीचच अधूनमधून एक पाय ठेवण्याकरिता करत होती. तसंच इंजिनियरिंगच्या 'चिऊताई, चिऊताई...'मधील गायक आणि वाद्यवृंद ज्या चौथऱ्यावर बसले होते त्याची स्पर्धेच्या प्रयोगाच्या वेळची उंची ही पारितोषिक वितरणाच्या दिवशी केलेल्या प्रयोगाच्या वेळच्या उंचीपेक्षा जवळ जवळ दुप्पट जास्त होती. हा फरक का? हे चूक सुधारणं होतं की Just for a change?

कोणतीही लेव्हल किंवा कोणतंही नेपथ्य न वापरता तीन–चारच एकांकिका गेल्या तीन वर्षांत झाल्या. १९७६ साली बी. एम्. सी. सी. ची 'अर्थ काय...', इंजिनिअरिंगची 'म्हें हें हें ऽऽऽ,' तसंच यंदाच्या वर्षी बी. एम्. सी. सी. ची 'ओंडका' या एकांकिकांचा त्यात प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. अगदी bare स्टेजवर त्या सादर केल्या गेल्या. याच्या उलट एकांकिकेसाठी आवश्यक अशा सामानाची स्टेजवर दाटी झाल्याचंही दृश्य १९७६ सालच्या 'पैल तो गे काऊ'-मध्ये किंवा यंदा 'काचसामान! जपून वापरा'मध्ये दिसत होतं. टिळक आयुर्वेद

कॉलेजने तर त्यांच्या 'पिकनिक' या एकांकिकेत झाडं–झुडपंही भरपूर आणली होती. पुरुषोत्तम करंडक स्पर्धेमध्ये स्टेजवर जिवंत प्राण्याचं आगमन यंदा प्रथमच झालं असेल. स. प. कॉलेजच्या 'सुरस आणि चमत्कारिक' या एकांकिकेत एका 'विशाल' महिलेने चक्क लहानसा ससा घेऊन स्टेजवर प्रवेश केला आणि प्रेक्षकांचं लक्ष इतर पात्रांपेक्षा सशाकडेच अधिक लागून राहिलं. आबासाहेब गरवारे कॉलेजच्या 'अंधारवाडा' या एकांकिकेतही एक मेलेलं वटवाघूळ त्या वाड्यामध्ये टांगलेलं होतं. अर्थात ते खरं नव्हतं; पण एकंदरच पुरुषोत्तम करंडक स्पर्धेच्या स्टेज प्रॉपर्टीमध्ये पडलेली ही वैशिष्ट्यपूर्ण भर नोंद घेण्यासारखी आहे.

पार्श्वसंगीत हा एकांकिका सादर करताना वापरावयाचा महत्त्वाचा 'इफेक्ट' असतो. गेल्या तीन वर्षांत यामध्ये पाश्चात्य संगीताचा वापर वाढत चालल्याचं दिसतं. Escape, Tequila, For A Few Dollars More, Ventures, Berlin Melody, Baby Elephanta walk या काही लोकप्रिय ट्यून्स एकांकिकांमधून सर्रास वापरल्या जातात. त्याचबरोबर हिंदी सिनेसंगीताचाही वापर 'पाचर' (१९७५), 'गारदी' (१९७८) यासारख्या एकांकिकांमधून दिसतो. त्या प्रमाणात मग शास्त्रीय भारतीय संगीताचा वापर फारच थोडे जण करतात. १९७६ साली सादर केली गेलेली स. प. ची 'एकटा' ही त्यापैकी एक! भारतीय संगीतामध्येसुद्धा सतार, बासरी आणि संतूर ही वाद्यं जास्त प्रमाणावर स्वीकारली जातात.

पार्श्वसंगीताबरोबर प्रकाशयोजनाही एकांकिका परिणामकारक होण्यास मदत करीत असते; पण गेली दोन–तीन वर्षं काही विचार करून कल्पक प्रकाशयोजना केल्याचं क्वचितच जाणवलं. त्यातही लाल भडक प्रकाश लोकांना फारच आवडतो, असं दिसतं. कोणताही भय–परिणाम साधताना हा प्रकाश टाकला जातो. यंदा 'अंधारवाडा' या एकांकिकेत असा प्रकाश वापरला होता; पण त्याऐवजी जर जांभळा किंवा निळसर प्रकाश वापरला असता तर एकांकिकेची गूढता अधिक वाढली असती. निरनिराळे रंग आलटून–पालटून टाकणं म्हणजे प्रकाशयोजना नव्हे तर काल, स्थिती आणि भावना यांच्यातील बदलही त्याद्वारा सूचित व्हावेत अशी अपेक्षा असते. कारण प्रेक्षक कोणत्या प्रकाशात काय पहात आहे, याला एकांकिकेच्या परिणामकारकतेच्या दृष्टीने फार महत्त्व आहे.

यंदा काही चित्रांचा / पोस्टर्सचाही वापर प्रतिकात्मकतेसाठी केला होता. बी. जे. च्या 'सुलतान' या एकांकिकेत वापरलेलं चित्र म्हणजे 'मॉडर्न आर्ट'चा बावनकशी नमुना होता. त्यातून नेमकं काय सुचवायचं होतं ते चौथ्या रांगेत बसून, पाऊण तास पाहूनही मला कळलं नाही. (माझा दोष!) सिम्बॉयसिस लॉ कॉलेजच्या 'सत्य' या एकांकिकेतही 'तुम्हारी कसम'चं एक पोस्टर आणि 'Call Girl'चा एक कट–आउट लावला होता. ही दोन्हीही चित्रं अर्थपूर्ण होती. एकांकिकेला पोषक अशी होती. फक्त अशा तऱ्हेने चित्रं किंवा पोस्टर्सचा वापर करणाऱ्यांनी एक गोष्ट लक्षात ठेवायला हवी की, भरत नाट्य मंदिरातील प्रेक्षकांची शेवटची रांग स्टेजपासून सुमारे दोनशे फुटांवर असते.

पुरुषोत्तम करंडक स्पर्धा गेली चार–पाच वर्षं सलगपणे पाहिल्यावर जाणवलेले हे काही ठळक मुद्दे! त्यातही काहींची सविस्तर चर्चा केली आहे, तर काही वाचकांच्या विचारार्थ केवळ समोर ठेवले आहेत. जाता जाता एक गोष्ट सांगितलीच पाहिजे की, गेल्या तीन वर्षांचा आढावा घेताना, त्यातही १९७६ आणि १९७७ च्या एकांकिकांचा विचार करताना सगळा भार स्मरणशक्तीवरच आहे. तेव्हा चूकभूल देणे – घेणे!

–सतीश कामत

---

विदेशी चित्रपट । सदानंद बोरसे

## Silent Movie

### कान किटवणाऱ्या गोंगाटातील काही गप्प क्षण, छे, गुदगुल्या करणारे काही बोलके क्षण!

आजच्या बोलपटांच्या जमान्यात कुणी जर पुन्हा मूकपट काढायचा म्हणेल तर घड्याळाचे काटे उलटे फिरवू पाहणाऱ्या त्या माणसाला आपण वेड्यात काढल्याशिवाय राहणार नाही; पण मेल ब्रुक नावाच्या एकाने हा वेडेपणा केला, इतकंच नव्हे तर चांगला यशस्वीही करून दाखवला.

चित्रपटाची सुरुवात होते, तीच मुळी 'Hello'च्या दर्शनाने. शब्द कानावर न पडता, डोळ्यात शिरतो आणि त्यातील 'O'च्या निळ्या पोटातून आपण सरळ निळ्याभोर आकाशाखाली पसरलेल्या हॉलिवुडमध्ये चंदेरी चित्तरदुनियेच्या राजधानीत शिरतो. शिरल्या शिरल्या प्रथम भेटतं एक त्रिकूट– मेल फन (मेल ब्रुक), मार्टी एग्ज (मार्टी फेल्डमन) आणि डॉम बेल (डॉम डी लुई) आणि त्यांच्याबरोबर आपण पाहता पाहता 'Silent Movie' या नावाच्या एका निःशब्द फार्समध्ये जातो.

'बिग पिक्चर स्टुडिओ' या प्रचंड स्टुडिओला गर्तेतून वर आणण्यासाठी मेल फन हा चित्रसृष्टीतून बाजूला पडलेला दिग्दर्शक आणि त्याचे दोन साथी एका मूकपटाचा आराखडा सादर करतात आणि त्या चित्रपटासाठी अनेक बड्या ताऱ्यांशी आणि तारकांशी करार करतात, चित्र पूर्ण करतात आणि तो उदंड यश मिळवतो. या सगळ्या प्रकरणात तो स्टुडिओ ताब्यात घेऊ इच्छिणाऱ्या लोकांना शह देण्यासाठी या त्रिकूटाने लढविलेल्या क्लृप्त्या, त्या बड्या स्टार्सना गाठण्यासाठी केलेले प्रयत्न यांच्यातून जन्मणाऱ्या अनेक प्रसंगांच्या साखळीने हा चित्रपट भरलेला आहे.

रॉन क्लार्कच्या कथेवरून (?) किंवा कल्पनेवरूनच चित्रपटाचं फार्सिकल स्वरूप लक्षात येईल. संपूर्ण चित्रपटात हे स्वरूप सुरुवातीपासूनच कायम ठेवलेलं आहे. साध्या साध्या हालचाली, साधे प्रसंग सगळ्यांमधून

हा फार्स फुलत जातो. याची कित्येक उदाहरणं सांगता येतील.

१. स्टुडिओ चीफला भेटण्यासाठी आलेल्या मेल फनच्या हाताच्या बोटांचा 'कडकट्' हा आवाज शेकहँडमधून पास होत जातो.

२. फनला नवी कल्पना सुचल्याबरोबर त्याच्या मागचा दिवा लागतो.

३. माणसांच्याच काय पण फळांच्या, मिरपुडीच्या वजनाने सुद्धा तोल सोडणारी जेम्स कॅनची गाडी.

४. शेवटची MGM च्या सिंहाचं विडंबन ही आणि अशीच किती तरी उदाहरणं.

या सगळ्या प्रसंगांमध्ये अथवा हालचालींमध्ये अतिशयोक्ती अथवा अवास्तवता अथवा विरोधाभास यांच्यामुळे जोपर्यंत विनोद घडतात, तोपर्यंत ते चांगलेच दाद घेतात; पण नंतर नंतर विशेषत: पॉल न्यूमनच्या आगमनापासून चित्रपटात जे काही घडते, ते अत्यंत बालिश वाटू लागतं; त्यामुळे चित्रपट विनोदी उरत नाही, तर काही ठिकाणी हास्यास्पद ठरतो. विशेषत: शेवटी चित्रपटाच्या 'प्रिमिअर'च्या वेळी चित्रपटाची फिल्म गायब होणं आणि नंतर तिच्यासाठी शोधाशोध, पाठलाग हा प्रकारही विडंबनात्मक किंवा विनोदी न वाटता अत्यंत पोरकट वाटू लागतो. मात्र आधीच्या चित्रपटाचा बराच परिणाम असल्याने हा नंतरचा भाग अगदीच कंटाळवाणा वा असह्य होत नाही.

चित्रपट 'नि:शब्द' आहे, हे त्याचं आणखी एक वैशिष्ट्य. सर्व पात्रांची संभाषणं आवश्यक तेथे सब-टायटल्सनी दाखवली आहेत; पण याचा अर्थ हा चित्रपट खऱ्या अर्थाने मूकपट वा 'silent movie' आहे, असं मी तरी म्हणणार नाही. संपूर्ण चित्रपट हा एक फार्स आहे आणि अर्थातच फार्सिकल हालचालींना त्यात अत्यंत महत्त्व आलेलं आहे. या हालचाली आत्यंतिक बोलक्या बनविल्या आहेत त्या जॉन मॉरिसच्या संगीताने. हे संगीत आणि निरनिराळ्या प्रसंगांमध्ये वापरलेले आवाज शब्दांहूनही अधिक अर्थवाही आणि परिणामकारक बनले आहेत. आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक प्रसंगातील खरेखुरे वास्तव आवाज ऐकवलेले नाहीतच, ते शब्दांनी दाखविलेले आहेत. उदाहरणार्थ–फोनच्या घंटेच्या वेळी 'Ring Ring,' अथवा दारावरील घंटेच्या वेळी 'Ding Dong.' प्रत्यक्षात ऐकू येतात ते अभिप्रेत असलेले, कल्पनेतील आवाज. हे आवाज, पार्श्वसंगीत आणि हालचाली इतक्या जुळल्या आहेत की, संगीताच्या तालावर हालचाली बसवल्या आहेत की हालचाली ठरवून त्याप्रमाणे संगीत दिलं आहे, हे ओळखणं खरोखरीच कठीण आहे.

स्टुडिओ-चीफला भेटण्यासाठी जाताना फन, एग्ज व बेलने टाकलेली पावलं, फन व विलमाने केकवर केलेलं नृत्य; एग्ज आणि बेलच्या खेळण्यातून आजारी स्टुडिओ-चीफचा झालेला छळ; लीझा मायनेलीला शिलेदाराचे चिलखत व शिरस्त्राण घालून गेल्यानंतर होणाऱ्या त्यांच्या गोंधळात चालू असलेल्या त्या चिलखत–शिरस्त्राणाच्या पत्र्यांचा ठणठणाट. आवाज वा संगीताच्या सुरेख योजनेची अशी खूप उदाहरणं सांगता येतील.

चित्रपटाचा दिग्दर्शक आहे मेल ब्रुक. या धाडसी वेडेपणाबद्दल आणि वेडेपणाला वाव दिल्याबद्दल अनुक्रमे त्याचं आणि 'ट्वेंटीएथ सेंच्युरी फॉक्स'चं अभिनंदनच करायला हवं. शिवाय दिग्दर्शक म्हणून आणि चित्रपटातील मेल फनची भूमिका या दोन्ही कामगिऱ्या त्याने अफलातून बजावल्या. फार्सला आवश्यक अशा हालचालींबद्दल मी मघाशी लिहिलं आहेच. आवाजाबाबत या प्राण्याने वापरलेलं डोकंही अफाटच आहे. चित्रपटात शब्द नाही, याला एकच अपवाद. मार्सेल मर्सिआ हा जगद्विख्यात 'माइम' 'No,' एवढा एकच शब्द उच्चारतो. चित्रपटातील एकमेव शब्द सुप्रसिद्ध मूकाभिनयपटूने उच्चारावा, हे भन्नाटच. शिवाय नि:शब्द चित्र असल्याने ब्रुकने जास्तीत जास्त भर प्रसंगनिष्ठ विनोदांवर देऊन शब्दनिष्ठ विनोद शक्य तेवढे कमी ठेवले आहेत.

### अभिनेत्यांबद्दल

आपल्या आवाजाची आणि भाषेची, शब्दांची साथ नसतानाही प्रत्येकाने मनीचा आशय प्रेक्षकांपर्यंत यशस्वीपणे पोहोचवला याची दाद थिएटरमधून वारंवार उसळणाऱ्या हास्यांच्या फवाऱ्यांमधून मिळतेच. तरीही काहींचा उल्लेख करणे आवश्यक.

सर्वांत पहिला क्रमांक मेल ब्रुकचा स्वत:चा. चित्रपटातील सर्व प्रसंग त्याने आणि त्याच्या दोन जोडीदारांनी अक्षरश: जिवंत केले आहेत.

नंतर लक्षात राहतो तो मूकाभिनयसम्राट मार्सेल मर्सिआ. एक ते दीड मिनिटासाठी पडद्यावर असलेल्या या माणसाने दार उघडून खिडकी बंद करून, फोन उचलण्यापर्यंत माअिमचं जे सुरेख दर्शन घडवलं, त्यावर आपण केवळ फिदा आहोत. स्टेजवरील सवयीमुळे हा गृहस्थ दारापासून टेबलापर्यंत जाण्यासाठी पावले टाकतो; पण ती एका जागीच! पुढे जाण्याचा आभास निर्माण होतो, पण तो पुढे गेलेला नसतो. अशा प्रकारामुळे उडालेली त्याची गमतीदार तारांबळ आणि नसलेल्या वस्तू हाताळण्याच्या सवयीमुळे प्रत्यक्ष वस्तू वापरताना होणारी फजिती या माणसाने अप्रतिम उभी केली आहे.

याशिवाय स्टुडिओ–चीफचं काम करणाऱ्या कलाकाराचा उल्लेख टाळणे अशक्य. बर्ट रेनॉल्ड्स, जेम्स कॅन, लीझा मायनेली, ॲना बॅंकरॉफ्ट आणि पॉल न्यूमन या बड्या स्टार्सनी केवळ स्वत:च्या स्टायली मारीत स्वत:लाच उभे केले आहे.

'सायलेंट मूव्ही' हा एक थोर दर्जाचा कलात्मक चित्रपट आहे, असा कुणीच दावा करणार नाही; पण तो एक धमाल रीतीचा कमाल फार्स आहे आणि तो एकदा तरी प्रत्येकाने पाहायला आणि ऐकायलाही हवा, असं मला वाटतं. ◻

## The Exorcist

### मुलांनो, आता भ्यायचं बरं का!

'जादूटोना' या तथाकथित भीतिपटाची चिक्कार हेटाळणी आणि 'The Exorcist'ची भ्रष्ट नक्कल अशी यथेच्छ संभावना झाल्यानंतर पुण्यात प्रचंड हवा निर्माण झालेला 'The Exorcist' प्रदर्शित झाला आणि अक्षरश: 'बेटे से बाप सवाई' प्रमाणे भिकारपणात या चित्रपटाने 'जादूटोना' या आपल्या नक्कलपुत्रावरही मात केली.

Exorcist म्हणजे देवऋषी किंवा चेटूक करून भूत–पिशाच्च उतरविणारा भगत.

(ख्रिश्चन भगत म्हणा हवे तर.)

The Exorcist या विल्यम पीटर ब्लेट्टीच्या कादंबरीवरून दिग्दर्शक विल्यम फ्रेडकिनने तयार केलेला हा चित्रपट.

चित्रपटाची कथा सर्वतोमुखी आणि सर्वतोकानी असल्यामुळे ती पुन्हा कागदावर उतरवून सर्वतो डोळी करीत नाही. फक्त चित्रपटाची आणि मूळ कादंबरीची तुलना करण्यापुरता तिचा संदर्भ घेत जाईन.

या कथेतील एक मुख्य तुटलेला दुवा म्हणजे ते पिशाच्च (Pazuzu) रिगनच्याच मानगुटीवर का बसतं? दुसरा निखळलेला दुवा म्हणजे डेनिग्ज ब्रुकच्या खुनाचं कारण काय?

अगदी 'जादूटोना'मध्ये सुद्धा या दोन प्रश्नांची उत्तरे दिलेली आहेत; पण अेक्झॉर्सिस्टमध्ये मात्र शेवटपर्यंत हे दुवे निखळलेले राहतात.

असे निखळलेले दुवे असूनही कादंबरी वाचकाची चांगलीच पकड घेते; पण चित्रपट मात्र विनोदी, हास्यास्पद ठरतो, असं का?

याचं पहिले कारण म्हणजे चित्रपटमाध्यमाच्या मर्यादा लक्षात न घेता केलेली चित्रपटाची सदोष पटकथारचना. कादंबरीमध्ये प्रत्येक वर्णन जितकं चित्रमय, प्रत्येक बारकाव्यानिशी आणि योग्य जागांवर जोर देऊन उभे केले आहे, तितका आवाका चित्रपटात येऊ शकला नाही. शिवाय कादंबरीमध्ये या सगळ्या प्रकरणाचा अभ्यास करतानाचा फादर कॅरासचा approach अधिक बुद्धिनिष्ठ, सुसंगत, तर्कप्रतिष्ठित. तो प्रथम रिगन ही मनोरुग्ण आहे, असे गृहीत धरूनच तिचा अभ्यास करतो आणि मग त्याचा एकेक मुद्दा खोटा पाडणारे पुरावे मिळाल्याने एकेक शक्यता नाकारून शेवटी तिला पिशाच्च्याने पछाडले असल्याचे नक्की करतो. या प्रकारामध्ये सतत ते पिशाच्च आणि फादर कॅरास यांच्यात चाललेला झगडा, सतत वाढत जाणारा ताण आत्यंतिक जीवघेणा आहे. थोडक्यात, त्या पिशाच्चाची भयानकता जितकी रिगनच्या हिडीस बनत जाणाऱ्या रूपात आहे, त्याहून किती तरी पट अधिक भयंकरपणा तिच्या वागणुकीत आणि विचारांमध्ये आहे. कादंबरीमध्ये लेखकाने हा भयंकरपणा, त्यापुढे असलेली माणसाची असहाय्यता आणि त्यामुळे आलेल्या प्रचंड दबावाने शेवटी ईश्वराला केलेले आवाहन हे सारेच रिगन, तिची आई, फादर कॅरास आणि अन्य व्यक्तिरेखांच्या साहाय्याने सुरेख उभं केलं आहे. शिवाय मवाशी सांगितलेल्या बुद्धिवादी मार्गक्रमणामुळेही हे सगळं शक्य कोटीतील वाटतं.

चित्रपटामध्ये मात्र या ताणावर भर न देता हा सगळा भाग एका मोठ्या आसारीला गुंडाळला आहे आणि पलंग हलणे, खोली गार पडणे, अक्षरं उमटणं असल्या जादूच्या खेळावर अवास्तव भार ठेवला आहे. शिवाय या भीतिपटाची मुख्य भिस्त रिगनच्या चेहऱ्यावर. अत्यंत बेढब मेकअप केलेली रिगन मला तर भीतिदायक वा पिशाच्चाने पछाडलेली न वाटता नुकतंच धुळवडीत रंगून आलेलं सोंग वाटले. अपवाद फक्त तिचे डोळे, हिरवेगार कंच पाचूसारखे थंड डोळे. ते तेवढे मनात घुसत होते; पण बाकी सुजलेला पांढराफटक विद्रूप चेहरा, त्यावर जखमांच्या तांबड्या खुणा, निळी जीभ, हिरवी उलटी, काळे दात म्हणजे 'रंग उधळले चहूकडे अन् गेली भीती कुणीकडे?' असाच प्रकार.

शिवाय अंधारी धूसर खोली, निरनिराळ्या प्राण्यांचे आवाज, The Power of Christ compells you' म्हणून चाललेला तारस्वरातील आरडाओरडा असल्या प्रकारांना गल्लीतील पोरंसुद्धा घाबरत नाहीत आणि चित्रपटात तर याशिवाय काही नाहीच. बरं, त्या पिशाच्चाकडून काही अफलातून चमत्कार घडवले असते, तर निदान जादु-अी-दृश्यांनी भरलेला बालपट म्हणून एखाद्या आंतरराष्ट्रीय बालचित्रमहोत्सवात तरी निदान पाठवता आला असता; पण आधीच 'भीती, भय, पोटात गोळा' असा स्वतःच आरडाओरडा करून 'A' सर्टिफिकेट मिळवल्यानंतर 'मुलांनो, आता भ्यायचं बरं का!' असं सांगायचीही सोय नाही.

कामांच्या बाबतीत—

रिगनच्या आईचे काम करणारी अभिनेत्रीच फक्त अभिनेत्री.

रिगन झालेली लिंडा ब्लेअर 'Airport—75' मध्ये अक्षरशः दहा मिनिटांत चमक दाखवून, आठवण देऊन गेली होती; पण या चित्रपटात तिला इतका भेसूर मेक-अप केल्यानंतर फक्त पाहुणे, तेही ओकताना पाहणे एकूण असह्यच.

बाकीच्या व्यक्तिरेखा म्हणजे फक्त पुसट रेषाच. मूळ कादंबरीतील ठसठशीतपणा कुणालाच नाही.

थोडक्यात खूप अपेक्षा असलेला हा चित्रपट खूप निराशा करून गेला. □

---


अलिकडे आलेल्या भीषण महापुरामुळे
लक्षावधि देशबांधव निराधार झाले आहेत
त्यांना आपल्या मदतीची गरज आहे

सढळ हातांनी मदत करा!

खालील पत्त्यावर देणग्या पाठवा—

**पंतप्रधान राष्ट्रीय साह्य निधी**

साऊथ ब्लॉक, नवी दिल्ली (110 011)

# आपला प्राप्तीकर
## त्याची आकारणी कशी कराल ?

जर आपण एक व्यक्ती अथवा अविभक्त हिंदू कुटुंब असाल तर, खाली देण्यात आलेल्या दरपत्रकाचा आपणास उपयोग होईल.

१९७८–७९ सालासाठी प्राप्तीकर आकारणी आणि १९७८–७९ या आर्थिक वर्षातील आगाऊ कर भरण्याचे दर–पत्रक.

| एकूण प्राप्तीचा गट | | प्रत्येक व्यक्तीने अथवा अविभक्त हिंदू कुटुंबाने भरावयाचा कर. ( कॉलम ३ मधील लोक वगळून) | | | ज्या अविभक्त हिंदू कुटुंबातील एकाही व्यक्तीची एकूण प्राप्ती रु. १०,०००/–पेक्षा अधिक आहे, त्यांनी भरावयाचा कर. | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| पासून रु. | पर्यंत रु. | गटासाठी ठराविक रक्कम | अधिक | खाली दाखविण्यात आल्याप्रमाणे रक्कम | गटासाठी ठराविक रक्कम | अधिक | खाली दाखविण्यात आल्याप्रमाणे रक्कम |
| – | १०,००० | काही नाही | – | –* | काही नाही | – | –** |
| १०,००१ | १५,००० | काही नाही | + | रु. ८,००० वरील रकमेवर १५ टक्के. | काही नाही | + | रु. ८,००० वरील रकमेवर १८ टक्के. |
| १५,००१ | २०,००० | १,०५० | + | रु. १५,००० वरील रकमेवर १८ टक्के. | १,२६० | + | रु. १५,००० वरील रकमेवर २५ टक्के. |
| २०,००१ | २५,००० | १,९५० | + | रु. २०,००० वरील रकमेवर २५ टक्के. | २,५१० | + | रु. २०,००० वरील रकमेवर ३० टक्के. |
| २५,००१ | ३०,००० | ३,२०० | + | रु. ३५,००० वरील रकमेवर ३० टक्के. | ४,०१० | + | रु. २५,००० वरील रकमेवर ४० टक्के. |
| ३०,००१ | ५०,००० | ४,७०० | + | रु. ३०,००० वरील रकमेवर ४० टक्के. | ६,०१० | + | रु. ३०,००० वरील रकमेवर ५० टक्के. |
| ५०,००१ | ७०,००० | १२,७०० | + | रु. ५०,००० वरील रकमेवर ५० टक्के. | १६,०१० | + | रु. ५०,००० वरील रकमेवर ५५ टक्के. |
| ७०,००१ | १,००,००० | २२,७०० | + | रु. ७०,००० वरील रकमेवर ५५ टक्के. | २७,०१० | + | रु. ७०,००० वरील रकमेवर ६० टक्के. |
| रु. १,००,००१ आणि अधिक. | | ३९,२०० | + | रु. १,००,००० वरील रकमेवर ६० टक्के. | – | | – |

सरचार्ज ( अधिकर ) : वरील दराने प्राप्तीकराच्या अतिरिक्त, प्राप्तीकर रकमेच्या १५ टक्के अधिकर ( सरचार्ज ) भरावयास पाहिजे.

* जर एकूण प्राप्ती रु. १०,५१० पेक्षा अधिक नसेल तर, रु. १०,००० पेक्षा जेवढी रक्कम अधिक असेल त्या रकमेच्या ७० टक्क्यापेक्षा अधिक प्राप्तीकर असणार नाही.

** जर एकूण प्राप्ती रु. १०,६९० पेक्षा अधिक नसेल तर रु. १०,००० पेक्षा जेवढी रक्कम अधिक असेल त्या रकमेच्या ७० टक्क्यापेक्षा अधिक प्राप्तीकर असणार नाही.

**करांचा योग्य हिशोब करा आणि ताबडतोब कर भरा.**

निवेदक
डायरेक्टर ऑफ इन्स्पेक्शन
( रिसर्च, स्टॅटिस्टिक अॅण्ड पब्लिकेशन )
इन्कम टॅक्स डिपार्टमेंट
नवी दिल्ली – ११० ००१

davp 78 / 282